सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ११ जानेवारी २०२५ | वर्ष दुसरे | अंक २८८ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# कर्मवीर दादासाहेबांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहचवा : मुख्यमंत्री

चंद्रपूर, १० जानेवारी : तुलनेने अतिशय मागास असलेल्या कष्टकरी समाजात दादासाहेब कन्नमवार यांनी जन्म घेतला, मात्र स्वत:च्या मेहनतीवर त्यांनी आपले कर्तृत्व सिध्द केले. दादासाहेब हे ध्येयवादी नेते होते. राज्याचा आणि जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास घेऊन ते संपूर्ण जीवन जगले. अशा नेत्यांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढीपर्यंत पोहचविणे गरजेचे आहे, असे मनोगत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले.

प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृह येथे बेलार समाज संघटना व रौप्य महोत्सव समितीच्या वतीने आयोजित कर्मवीर मा.सा. कन्नमवार शतकोत्तर रौप्य महोत्सवी सोहळ्यात मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार विजय वडेट्टीवार तर प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, खासदार प्रतिभा धानोरकर, आमदार सर्वश्री किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे, सुधाकर अडबाले, माजी मंत्री शोभाताई फडणवीस, प्रभारी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, मनपा आयुक्त विपीन पालीवाल, आयोजन समितीचे राहुल कन्नमवार, सुर्यकांत खनके आदी उपस्थित होते. लोकनेते दादासाहेब कन्नमवारांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त आज येथे उपस्थित राहता आले, याचा अतिशय आनंद आहे, असे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दादासाहेब यांनी देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतला होता.

महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळकांच्या विचारांचा त्यांच्यावर मोठा प्रभाव होता. भारत – चीन युध्दाच्या वेळी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांना देशाच्या संरक्षणमंत्री पदाची जबाबदारी देण्यात आल्यानंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून मा.सा. कन्नमवार यांनी राज्याची सुत्रे सांभाळली. या पदावर ते १ वर्ष ४ महिने होते. युध्दाचा तो काळ होता. अशा परिस्थितीत आर्थिक सहाय्य करण्यासाठी दादासाहेबांनी जनतेला आवाहन केले. त्याकाळात चंद्रपूर जिल्ह्याने तसेच महाराष्ट्राने त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत देशासाठी सोने-नाणे, आर्थिक मदत दान केली. शिक्षण आणि आरोग्य हे अतिशय महत्वाचे विषय आहेत. प्रत्येक गावात आरोग्य केंद्र असावे, असा सर्वप्रथम विचार कर्मवीर दादासाहेबांनी मांडला. तसेच शिक्षणाच्या क्षेत्रातही त्यांनी अनेकांना प्रेरीत केले.

या राज्याच्या प्रगतीसाठी अतिशय मोठे योगदान दादासाहेबांनी दिले आहे. विधानसभेच्या राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या वतीने कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांचा गौरवग्रंथ प्रकाशित करण्यात येईल. पुढे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, सामान्य माणसांचा विकास करणे, हेच आपल्या सरकारचे सुध्दा ध्येय आहे. जिल्ह्याचा विकास करण्यासाठी सर्वपक्षीय लोकप्रतिनिधींनी एकत्र येऊन काम करावे. त्यामुळे जिल्ह्याच्या संदर्भात सर्व अडचणी सोडविण्यात येईल. तसेच ज्या मागण्या करण्यात आल्या आहेत, त्यासुध्दा पूर्ण केल्या जातील, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. मा.सा. कन्नमवार यांच्याकडे विकासाची दृष्टी : सर्वसाधारण कुटुंबात जन्म घेतलेल्या मा.सा. कन्नमवार यांनी आपल्या कर्तृत्वाने शिखर गाठले. कर्मवीर दादासाहेबांना विकासाची दृष्टी होती.

कर्मवीर दादासाहेब कन्नमवार आणि देवेंद्र फडणवीस हे दोन मुख्यमंत्री चंद्रपूर जिल्ह्याने दिले आहे. अनेक बाबतीत दादासाहेब आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्यात साम्य असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुध्दा दूरदृष्टीचे नेते आहेत. त्यांच्या पुढाकारातूनच समृध्दी महामार्गाचा विस्तार चंद्रपूर जिल्ह्यात होत आहे, असे आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. तसेच चंद्रपूर येथे होत असलेल्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कॅन्सर रुग्णालयाकरीता १०० कोटींची आवश्यकता असून राज्य शासनाने सदर निधी द्यावा. जिल्ह्यातील धानोरा बॅरेज पूर्ण करावा. कर्मवीर मा.सा. कन्नमवार यांची जयंती शासकीय स्तरावर जाहीर करावी. तसेच चंद्रपूरात ४०० एकरवर २८७ कोटी रुपये खर्च करून होत असलेला टायगर सफारी प्रकल्प मार्गी लावावा, अशा मागण्यासुध्दा आमदार जोरगेवार यांनी केल्या.

अध्यक्षीय भाषणात आमदार विजय वडेट्टीवार म्हणाले, विहिरी आणि घरे बांधणा-या कष्टकरी समाजातून आलेले दादासाहेब हे राज्याच्या सर्वोच्च पदी पोहचले. चंद्रपूर आणि गडचिरोली या दुर्गम जिल्ह्यात त्यांनी अनेक विकासकामांची पायाभरणी केली. चंद्रपूर येथे होत असलेल्या नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला कर्मवीर दादासाहेब कन्नमवार यांचे नाव द्यावे तसेच अल्प असलेल्या या समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ निर्माण करावे, अशी मागणी त्यांनी केले.

# डॉन छोटा राजन दिल्लीच्या एम्समध्ये सर्जरीसाठी दाखल

नवी दिल्ली : अंडरवर्ल्ड डॉन छोटा राजन दिल्लीच्या एम्समध्ये रुग्णालयात आहे. सायनसचा त्रास वाढल्यामुळे त्याच्या नाकावर शस्त्रक्रिया होणार आहे. या शस्त्रक्रियेनंतर काही काळ पुढील उपचारांसाठी तो एम्स रुग्णालयातच असेल. रुग्णालयातील ज्या खोलीत त्याला ठेवले आहे त्या खोलीबाहेर तसेच ती खोली ज्या मजल्यावर आहे तिथे पोलिसांचा बंदोबस्त आहे.

डॉन छोटा राजन दिल्लीच्या तिहार तुरुंगात होता. तब्येत बिघडल्यामुळे त्याला एम्समध्ये नेण्यात आले. डॉक्टरांनी परवानगी देईपर्यंत तो रुग्णालयातच असेल. नंतर त्याची रवानगी पुन्हा तिहार तुरुंगात होईल.

हॉटेल व्यावसायिकाच्या हत्येप्रकरणी छोटा राजनला शिक्षा झाली आहे. तो २००१ पासून तिहार तुरुंगात आहे. सध्या एम्समध्ये असलेल्या छोटा राजनच्या खोलीत फक्त उपचार करणारे डॉक्टर आणि निवडक वैद्यकीय कर्मचारी तसेच मोजके पोलीस यांच्या व्यतिरिक्त इतर कोणालाही प्रवेश करण्यासाठी परवानगी नाही. दाऊद इब्राहिम हा छोटा राजनचा प्रमुख शत्रू आहे. यामुळे रुग्णालयात असला तरी छोटा राजनच्या जीवाला असलेला धोका कमी झालेला नाही. छोटा राजनचा खरे नाव राजेंद्र सदाशिव निकाळजे असे आहे. त्याला २०१५ मध्ये इंडोनेशियातील बाली येथे अटक करण्यात आली. एकेकाळी छोटा राजन हा दाऊदचा हस्तक होता. पण १९९२ – ९३ दरम्यान मुंबईत साखळी बॉम्बस्फोट झाले, नंतर दंगल उसळली.

# भारत तटस्थ नसून शांततेच्या बाजुने- पंतप्रधान

## जगातील युद्धांवर पॉडकास्टमध्ये मांडली भूमिका

नवी दिल्ल, १० जानेवारी : जगात सुरू असलेल्या युद्धांच्या संदर्भात भारताची भूमिका तटस्थ नाही. तर भारत शांततेच्या बाजुने असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. एका पॉडकास्ट मुलाखतीत पंतप्रधानांनी हे मनोगत व्यक्त केले.



रशिया आणि युक्रेनममध्ये फेब्रुवारी २०२२ पासून युध्द सुरू आहे. यात लाखो लोक मारल्या गेले आहेत. पश्चिम आशियातील इस्रायल-हमास-इराण संघर्षामुळेही अभूतपूर्व मानवीय संकट निर्माण झाले आहे. भारत या आव्हानाकडे कसे पाहतो..? देश जगाच्या मित्राच्या भूमिकेत आहे की तटस्थ आहे. ? या प्रश्नावर, पंतप्रधान मोदींनी स्पष्ट केले आहे की भारत शांततेच्या बाजूने आहे.जागतिक शक्तींमधील प्राणघातक, हिंसक संघर्षादरम्यान भारताची भूमिका स्पष्ट करताना मोदी म्हणाले की, आज जगात भारताबद्दल विश्वास आहे. आमचे वागणे दुटप्पी नसून आम्ही पोटात एक आणि ओठात एक असे वागत नाही. या संकटकाळात आम्ही सातत्याने सांगितले आहे की, आम्ही तटस्थ नसून शांततेच्या बाजूने आहोत. माझा दृष्टिकोन शांतीचा आहे आणि त्यासाठी जे काही प्रयत्न केले जातील त्यांना मी पाठिंबा देईन असे मोदींनी सांगितले. रशिया-युक्रेन, इस्रायल, इराण आणि पॅलेस्टाईनलाही माझे हेच सांगणे असते की, शांततेतून प्रश्न सुटतो त्यामुळे शांतील पर्याय नाही. विशेष म्हणजे भारतीयांना जसा माझ्यावर विश्वास आहे की, हे देशाचे संकट योग्य पद्धतीने हाताळतील तसाच विश्वास या देशांना देखील आहे की, भारत जे बोलतो तीच त्यांची खरी आणि योग्य भूमिका आहे असे मोदींनी सांगितले.

# संभल : विहीरीच्या संदर्भात यथास्थिती ठेवा- सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली,१० जानेवारी : उत्तरप्रदेशच्या संभल येथील मशिदीच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या मशिदीसंदर्भात यथास्थिती कायम ठेवण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. यासंदर्भात संभल मशिद व्यवस्थापन समितीने दाखल केलेल्या याचिकेवर उत्तरप्रदेश सरकारला नोटीस बजावत सुप्रीम कोर्टाने हे निर्देश दिले आहेत.

यासंदर्भात सरन्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्या. संजय कुमार यांच्या खंडपीठाने सांगितले की, संभल येथे आढळलेल्या विहिरीच्या बाबतीत परवानगीशिवाय कोणतेही पाऊल उचलू नये. तसेच येत्या २ आठवड्यांच्या आत स्थिती अहवाल (स्टेटस रिपोर्ट) दाखल करावा. या प्रकरणी पुढील सुनावणी २१ फेब्रुवारीला होणार आहे. मशिदीच्या प्रवेशद्वाराजवळ असलेल्या खासगी विहिरीच्या संदर्भात यथास्थिती राखण्याची मागणी करत मशिद समितीने याचिका दाखल केली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने म्हंटले की, जर ही सार्वजनिक विहीर असेल तर ती सर्व लोकांसाठी खुली राहू द्या. तसेच विहीरीजवळ सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यास न्यायालयाने सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने विहिरीची पूजा करण्यासही परवानगी नाकारली आहे. संभल नगरपालिकेने शहर परिसरातील सर्व विहिरींचे पूजन करण्याची परवानगी दिली होती. सर्वोच्च न्यायालयाने फक्त शाही जामा मशिदीलगतच्या विहिरीवरील पूजा करण्यावर बंदी घातली आहे. उर्वरित विहिरींची पूजा करण्यास कोणतेही बंधन नसल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# दिल्ली विमानतळावर आढळली मगरीची कवटी

## कॅनडाहून आलेल्या प्रवाशाला घेतले ताब्यात

नवी दिल्ली: दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका प्रवाशाच्या बॅगमध्ये मगरीची कवटी आढळून आली आहे. हा प्रवासी कॅनडाहून आला असून विमानतळावर बॅगची तपासणी करताना ही कवटी आढळून आली. संबंधित व्यक्तीचे नाव जाहीर केले नसले तरी त्याला सुरक्षा अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले आहे.



यासंदर्भात अधिकाऱ्यांनी सांगितले की, कॅनडाहून भारतात आलेल्या एका ३२ वर्षीय तरुणाची बॅग तपासताना काहीतरी अणकुचीदार लागले. त्यामुळे त्याच्या बॅगची सखोल तपासणी करण्यात आली. यावेळी त्याच्या बॅगमधून मगरीच्या पिल्लाची कवटी सापडली. त्याच्याकडे असलेल्या बॅगेत एका क्रिमी रंगाच्या कपड्यामध्ये मगरीच्या पिलाची कवटी गुंडाळली होती. ही कवटी सुमारे ७७७ ग्रॅम वजनाची आहे अशी माहिती कस्टम अधिकाऱ्यांनी दिली आहे. यासंदर्भातील निवेदनात कस्टम अधिकारी म्हणाले की, भारतात संरक्षित असणाऱ्या मगरीची ही कवटी आहे.

भारतीय वन्यजीव कायद्याचा भंग केल्याचा व कस्टम कायद्याचा भंग केल्याचा ठपका संबधित युवकावर ठेवला आहे. संरक्षित असलेल्या प्राण्याच्या अवयवांची तस्करी करणे हा गुन्हा गंभीर स्वरुपाचा असून आता याबाबात कस्टम ऑफिस व वन्यजीव कार्यालय या दोन्हीच्या संयुक्तरितीने कारवाई केली जाणार आहे. ही मगरीची कवटी आता वन्यजीव कार्यालयाकडे हस्तांतरीत करण्यात आली असून. याची आता तपासणी केली जाणार आहे. भारतामध्ये २०११ ते २०२० या कालावधीत विमानतळावरुन वन्यजीवांच्या अवयवांची तस्करीच्या १४१ घटना उघडकीस आल्या आहेत. यामध्ये जवळपास १४६ प्रकारच्या वन्यजीवांची तस्करी करण्याचा प्रयत्न झाला होता. कासव, साप, पाली आदींचा यामध्ये समावेश आहे.

# दीपिका एलटीच्या चेअरमनवर भडकली

मुंबई : कर्मचाऱ्यांनी आठवड्याभरात ९० तास काम केले पाहिजे. जर रविवारी येऊन काम करणार असाल तर मला आनंदच वाटेल. मी स्वतः रविवारी काम करतो. किती वेळ घरी राहणार आणि पत्नीला निरखून बघत बसणार ? असे एल अँड टी कंपनीचे चेअरमन एस. एन. सुब्रह्मण्यन म्हणाले. सुब्रह्मण्यन यांच्या या वक्तव्यावर बॉलिवूड अभिनेत्री दीपिका पदुकोण संतापली. एल अँड टी सारख्या कंपनीच्या चेअरमन पदावर कार्यरत व्यक्तीकडून४ हे वक्तव्य अनपेक्षित आणि धक्कादायक असल्याचे मत दीपिकाने व्यक्त केले. सुब्रह्मण्यन यांच्या वक्तव्याविषयी दीपिकाने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. इन्स्टा स्टोरीच्या माध्यमातून दीपिकाने स्वतःच्या नाराजीला मोकळी वाट करुन दिली आहे.

दीपिकाने पत्रकार फैझ डिसुझा यांच्या पोस्टवर व्यक्त होत इन्स्टा स्टोरी प्रसिद्ध केली आहे. एवढ्या वरिष्ठ पदावर बसलेल्या व्यक्तीकडून आलेले वक्तव्य अनपेक्षित, धक्कादायक आणि चक्रावून टाकणारे असल्याचे मत दीपिकाने व्यक्त केले. हे वक्तव्य करणाऱ्या व्यक्तीचे मानसिक आरोग्य कसे असेल, असा प्रश्न पडल्याचे दीपिका म्हणाली.

कंपनीतील अंतर्गत कार्यक्रमाच्या निमित्ताने एल अँड टी कंपनीचे चेअरमन एस. एन. सुब्रह्मण्यन यांनी निवडक ड्ढ स्टाफशी संवाद साधला. याप्रसंगी बोलताना सुब्रह्मण्यन यांनी कर्मचाऱ्यांनी आठवड्याभरात ९० तास काम केले पाहिजे. जर रविवारी येऊन काम करणार असाल तर मला आनंदच वाटेल. मी स्वतः रविवारी काम करतो; असे वक्तव्य केले. अब्जावधी रुपयांचे उत्पन्न असले तरी रविवारी मी काम करतो, असे एस. एन. सुब्रह्मण्यन म्हणाले. कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना एस. एन. सुब्रह्मण्यन म्हणाले की, किती वेळ घरी राहणार आणि पत्नीला निरखून बघत बसणार ?

# केंद्रीय मंत्री अमित शहा यांची विखेनी घेतली सदिच्छा भेट!

## शिर्डी विमानतळावरून नाईट लॅण्डीग सुरू करण्याची केली विनंती

नगर : केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांची जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांची सदिच्छा भेट घेतली.राज्यात नव्याने स्थापन झालेल्या महायुती सरकार मध्ये मंत्री पदाची संधी मिळाल्यानंतर विखे पाटील यांची पहीलीच भेट होती.शिर्डी विमानतळावरून नाईट लॅण्डीग सुविधा तातडीने सुरू करण्याची तसेच नदीजोड प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून देण्याची विनंती मंत्री विखे पाटील यांनी केली आहे. डॉ सुजय विखे पाटील याप्रसंगी उपस्थित होते.



मागील अडीच वर्षात महायुती सरकारने सामान्य नागरीकांसाठी यशस्वीपणे राबवलेल्या योजनांना जनतेचे मोठे पाठबळ मिळाले असल्याचे सांगतानाच महसूल व दुग्ध व्यवसाय विकास विभागाने घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णय व कार्यान्वित झालेल्या योजनांची माहीती मंत्री विखै पाटील यांनी भेटीत झालेल्या चर्चे दरम्यान दिली.

विधानसभा निवडणुकीत महायुतीला मिळालेले यश आणि अहील्यानगर मधील दहा विधानसभा मतदारसंघात मिळालेल्या यशाच्या पार्श्वभूमीवर

मंत्री अमित शहा आणि ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्यात सविस्तर चर्चा झाली.या भेटी दरम्यान डॉ.सुजय विखे पाटील उपस्थित होते. महायुती सरकार मध्ये पुन्हा मंत्री पदाची संधी दिल्याबद्दल ना.विखे पाटील यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांचे आभार मानथले असून,विश्वनेते पंतप्रधान नरेंद्र मोदी जी यांच्या महत्त्वाकांक्षी आशा नदीजोड प्रकल्पाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी निधीची उपलब्धता करून देण्याची विनंती मंत्री विखे पाटील यांनी केली आहे.

शिर्डी विमानतळावरून नाईट लॅण्डीग सुविधा सुरू करण्याबाबत केलेल्या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देवून आजच केंद्रीय सुरक्षा दलाचे मनुष्यबळ उपलब्ध करून देवून पुढील काही दिवसांत नाइट लॅण्डीग सुविधा सुरू करण्याची ग्वाही मंत्री अमित शहा यांनी दिली असल्याचे ना.विखे पाटील यांनी सांगितले.

# सावरकर अवमान प्रकरणी राहुल गांधींना जामीन

## खटला सुरु असेपर्यंत सावरकरांबद्दल विधान न करण्याचे निर्देश

पुणे, १० जानेवारी – स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्या वक्तव्याविरोधात सावरकरांचे पणतू सात्यकी सावरकर यांनी पुणे सत्र न्यायालयात बदनामीचा खटला दाखल केला होता. या खटल्याच्या सुनावणीसाठी राहुल गांधींनी उपस्थित रहावे यासाठी त्यांना न्यायालयाकडून वारंवार समन्स बजावण्यात आले होते. अखेर आज राहूल गांधी या खटल्याच्या सुनावणीवेळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित झाले. यावेळी न्यायालयाने राहुल गांधी यांना २५ हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला. आता या खटल्याची पुढची सुनावणी १८ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी वादग्रस्त विधान केल्याप्रकरणी राहुल गांधींना पुण्यातील शिवाजीनगर न्यायालायात १९ ऑगस्ट रोजी हजर राहण्याचे आदेश दिले होते. या प्रकरणी गांधींनी न्यायालयात येऊन त्यांची बाजू मांडावी, असे न्यायालयाने म्हटले होते. मात्र, ते अनुपस्थितीत राहिल्यामुळे न्यायालयाने त्यांना समन्स बजावत पुन्हा न्यायालयात उपस्थित राहण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार त्यांनी आज ऑनलाईन उपस्थिती दर्शवत आपली बाजू मांडली. यावेळी न्यायालयाने राहुल गांधींना जोपर्यंत हा खटला सुरू आहे, तोपर्यंत सावरकरांबद्दल कोणतेही विधान करू नये, असे निर्देश दिले.

# माहूरगडावरील चक्क रस्त्यावर ठाण मांडून बसला बिबट्या; नागरिकांसह भाविकांमध्ये दहशतीचे वातावरण


**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १० जानेवारी**

माहूर गडावरील जंगल व्याप्त भागातील श्री रेणुका देवी मंदिर संस्थान ते श्री दत्त शिखर मंदिर संस्थान रस्त्यावर दिनांक ८ रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास श्री दत्त शिखर येथे देव दर्शनासाठी जात असलेल्या काही भाविकांना एक भलामोठा बिबट्या श्री दत्त शिखर संस्थान मंदिराच्या पायथ्याशी अगदी आरामात चक्क रस्त्यावर बस्तान मांडून आराम फर्मावत असलेल्या अवस्थेत दिसून आल्याने त्या भाविकांची मपाचावर धारण बसलीफ एरवी देवदर्शनाला आलेले भाविक देवाचे नामस्मरण म्हणून मदेवा दत्ता दत्ता , व मजयकारा माँ शेरावाली का!फ लावतात परंतु, देवदर्शनाआधीच समोर साक्षात बिबट्याचे दर्शन झाल्यावर मात्र ममाँ शेरावालीये तेरा शेर आ गया,उससे हमकों बचा! असा देवाला धावा करण्याची वेळ घाबरलेल्या भाविकांवर आली. भाविकांनी सदरील रस्त्याच्या मधोमध ठाण मांडून बसलेल्या बिबट्याचा मोबाईल द्वारे व्हिडिओ काढून

लगेच समाजमाध्यमांवर व्हायरल करून या बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी केली.माहूर वन विभागाकडे अद्यावत यंत्रना नसल्याने बिबट्याचा दिवसेंदिवस वावर वाढत असून, एखाद्या भाविकावर जीव घेणा हल्ला होण्याआधी वन विभागाने या बिबट्याला जेरबंद करावे अशी मागणी नागरिकांसह, गडावरील व्यावसायिक व येणाऱ्या भाविक भक्तांतून होत आहे.

मानव हा जरी विलक्षण बुद्धिमान प्राणी असला तरी,तो शक्तीच्या बाबतीत मात्र जंगली प्राण्यांच्या तुलनेत अतिशय कमजोर ठरतो.

भौगोलिकदृष्टीने निसर्गतः दुर्गम डोंगराळ व घनदाट जंगल वनराईने व्यापलेला भाग म्हणून माहूर तालुका ओळखला जातो.त्यामुळे सर्व प्रकारच्या वन्यप्राण्यांच्या मुक्त संचार याठिकाणी सुरू आहे असतो.त्यातूनच कधी शिकारीच्या शोधात तर कधी



पिण्याच्या पाण्याच्या शोधात वन्यप्राणी हे शेत शिवारात, अगदी गाववस्ती,शहरात व गडावरील मंदिर परीसरात देखील या वन्यप्राण्यांपैकी वाघ, बिबट,अस्वल, रानडुक्कर, कोल्हे, लांडगे सतत कुठेना कुठे नुसतेच आढळून येत नाहीत तर पाळीव जनावरे व मानवावर प्राणघातक हल्ले देखील करतायेत.

गेल्या आठवड्यात मोजे टाकळी परिसरात बिबट्याने एका गाईचा फडशा पाडला होता. किंबहुना बिबट, रानडुक्कर ,अस्वल या अतिशय हिंस्र वण्यप्राण्यांच्या पाळीव जनावरांसह मानवावरीईल जीवघेण्या हल्ल्याची आठवड्यातून एखादी तरी घटना नित्याचीच बाब झाली आहे. रानडुकराचे हल्ले तर नित्याचेच झाले असून शिकारही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. रानडुकरांसह इतर जनावरांची शिकार करण्यासाठी शिकारी गावठी बॉम्बची मदत घेत असून, रानडुक्कराची शिकार करण्यासाठी गावठी बॉम्ब लावून ठेवल्याने ते गावठी बॉम्ब रानडुक्कराने खाण्यासाठी चावल्यानंतर त्याचा तोंडांत स्फोट होऊन तो गतप्राण झाला असल्याची गत पंधरवड्याआधीची याच गडपरिसरात घडलेली घटना ताजे उदाहरण आहे. बिबट्याचा वावर तर चक्क माहूर शहारातील अनेक भागात कित्येकदा नागरीकांच्या नजरेस पडला आहे. नुकताच एका बिबट्याला सारखंनीं घाटात अज्ञात वाहनाने उडवून जीव घेतल्याची घटना घडली होती.विशेष म्हणजे त्या मयत बिबट्याचा अद्यापही शोध लागलेला नाही. माहूर तालुक्यातही अनेक बिबटे फिरत असून छोटे-मोठे शिकार करत आहेत.काही खाणे योग्य वण्यप्राण्यांची शिकारी शिकार करून त्याचे मांस विक्री केली जात असल्याचे सांगितले जात आहे. समाधानाची बाब म्हणजे बदल्याच्या भावनेने डूख धरुन जंगली जनावरांकडून अद्याप भाविकांवर हल्ला झालेला नाही.

यमाहूर आणि परिसरातील जंगलात तीन ते चार बिबटे मोकाट फिरत असून या बिबट्याकडून पाळीव प्राण्यावर हल्ले होत आहेत. अशा प्रकारच्या नोंदी शासन दरबारी ऑनलाईन होत असून, जंगली प्राण्याकडून शेत शिवारातील पिकांचे नुकसान करण्याचेही अनेक घटना घडत असून याचीही नोंद ऑनलाईन होत आहे.परंतु,आश्चर्य म्हणजे वन विभाग नुकसान भरपाई देऊन मोकळे होत आहे . एखाद्या नागरिकांवर, शेतकऱ्यावर किंवा भाविकावर या हिंस्र वण्यप्राण्यांच्या हल्ला होऊन आणखी अनर्थ घडण्याआधी वन विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माहूरला नवीन सुसज्ज वाहन देत अद्यावत यंत्रसामग्री देऊन बिबट्यासह रानडुक्कर व इतर हिंस्र वण्यप्राण्यांना जेर बंद करण्यासाठी वन कर्मचाऱ्यांचे विशेष पथक नेमावे अशी मागणी भाविकांतून होत आहे.

# छत्रपती संभाजीनगर

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क. ०५/२०२५

पु.ता. २१/२/२५

अर्जदार : १) रामदास चांगदेव म्हस्के, वय ३७ वर्ष, धंदा शेती, रा.मुरमी पो. जिकठाण ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) लखन चांगदेव म्हस्के, वय ३२ वर्ष, धंदा शेती, रा. मुरमी पो. जिकठाण ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) ज्योती भ्र. दिगंबर ढोले, वय ३५ वर्ष, धंदा घरकाम, रा. चंदिकापुर टेंभापुरी ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. के. अंबेकर गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी रहिवासी असुन अर्जदार क १ ते ३ हे आपसात सख्खे भाउ व बहिन आहेत. अर्जदार क १ ते ३ यांचे वडील नामे चांगदेव मनोहर म्हस्के हे दि. ०८/११/२०२४ रोजी मौजे मुरमी पो. जिकठाण ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले असुन मयताची पत्नी म्हणजेच अर्जदार क १ ते ३ यांची आई नामे पदमाबाई भ्र. चांगदेव म्हस्के हि दि. २७/०३/२०२१ रोजी मौजे मुरमी पो. जिकठाण ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. मयतांना अर्जदार क १ व २ हे मुले व अर्जदार क ३ हि विवाहीत मुलगी कायदेशीर वारसदार आहेत. तसेच अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयतांना इतर वारसदार नाही. मयत चांगदेव मनोहर म्हस्के व मयत पदमाबाई भ्र. चांगदेव म्हस्के यांना अर्जदार क १ ते ३ हे कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत चांगदेव मनोहर म्हस्के व मयत पदमाबाई भ्र. चांगदेव म्हस्के यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी तसेच तहसिल, तलाठी व ग्रामपंचायत इत्यादी शासकीय कार्यालयामध्ये कार्यवाहीसाठी प्लेन वारस प्रमाणपत्राची आवश्यकताआहे. म्हणुन अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. ०७/०१/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र.३९/२०२५

अर्जदार : १) देविदास चंद्रभान काळे, वय ५५ वर्षे, धंदा मजुरी, रा. येसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) फकीरचंद चंद्रभान काळे, वय ४३ वर्षे, धंदा मजुरी रा. बेसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) देशमुख चंद्रभान काळे, वय ३५ वर्षे, धंदा मजुरी रा. येसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) सुलताना भ्र.युसुफ शेख, वय ४० वर्षे, धंदा घरकाम रा. लिंबेजळगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण – बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. जी. बी. चकाण यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ३ हे नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.४ ही त्यांची बहिण आहे. अर्जदार क्र.४ हिने युसुफ शेख यांच्याशी अंतरधर्मीय विवाह केलेला असल्याने तिचे नाव सुलताना युसुफ शेख असे नमुद आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांचे वडील नामे चंद्रभान मामल्या काळे हे मौजे येसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवाशी होते ते दिनांक २६/०९/२०१६ रोजी मौजे येसगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. अर्जदार क्र.१ ते ४ यांची आई ही २० वर्षापूर्वी मयत झालेली आहे. मयत चंद्रभान मामल्या काळे यांना अर्जदार क्र.१ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदार यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे पश्चात कार्यालयीन शासकीय व इतर कामासाठी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुदद्धीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. सदर प्रकरणात पुढील तारीख दिनांक १७/०२/२०२५ रोजीची ठेवण्यात आलेली आहे. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. ए.आय. आवटी मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि. अर्ज क्र. ३८५/२०२४

अर्जदार १– सूर्यभान पि. दगडुबा काजे, २– देविदास पि. दगडुबा काजे, ३– राधाबाई नामदेव घुगे, ४– सुंदराबाई शामराव वाघ, ५) भिमराव दगडुबा काजे (मयत) वारस ५–१) हौसाबाई भिमराव काजे, ५–२) जयाजी पि. भिमराव काजे, ५–३) गंगाधर पि. भिमराव काजे, ५–४) अनिताबाई बापुसाहेब घुगे, ५–५) परिगाबाई नंदु घुगे, सर्व रा. देवपुळ, पो. वासडी, ता. कन्नड जि, औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ यु. ए. वारे यांच्या मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ते ४ हे आपसात सख्खे भाऊ– बहीन आहे, तसेच अर्जदार क्र. ५ भिमराव दगडुबा काजे हा त्यांचा मयत भाऊ असून अर्जदार क्र ५–१ ही त्यांची पत्नी असून अर्जदार क्र ५–२ ते ५–५ हे त्यांचे मुल व मुली आहे. अर्जदार क्र. १ ते ५ यांचे वडील तसेच अर्जदार क्र. ५–१ यांचे सासरे अर्जदार क्र. ५–२ ते ५–५ यांचे आजोबा नामे दगडुबा लक्ष्मण काजे हे होते ते दिनांक १२/१२/२०१२ रोजी राहत्या घरी मौजे देवपुळ येथे मयत झालेले आहे, तसेच अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या आई तसेच अर्जदार क्र. ५–१ ची सासु अर्जदार क्र. ५–२ ते ५–५ यांची आजी नामे जईबाई दगडुबा काजे या होत्या त्या पुर्वीच मयत झालेल्या आहे. तसेच अर्जदार क्र. ५ नामे भिमराव दगडुबा काजे हा मयत दगडुबा काजे व जईबाई काजे यांचा मुलगा होता तो देखील दिनांक०४/१२/२०१८ रोजी मयत झलेला आहे त्यांचे अर्जदार क्र. ५–१ ते ५– ५ हे वारस आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र देत आहे.

दगडूबा लक्ष्मण काजे हे मयत झाल्यामुळे अर्जदारांना शासकिय तसेच निमशासकिय, तलाठी, जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाची नोंद करण्यासाठी तसेच विविध योजनेचा लाभ घेण्यासाठी, मयताचे वारस असल्याची नोंद करण्यासाठी सदरील वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कोणासही काही उजर, आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर आपले विधिज्ञामार्फत हजर राहून उजर, आक्षेप सादर करावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास, अर्जदारांचे हक्कात वारस प्रमाणपत्र प्रदान करण्याचा आदेश पारीत करण्यात येईल.

सबब हे जाहीर प्रगटन. दिनांक २६/१२/२०२४

आदेशावरुन

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ४०८/२०२४

पुढील तारीख १२/०२/२०२५.

अर्जदार :– १. निशा भ्र. बळीराम राठोड, वय ४९ वर्षे, धंदा मजुरी/घरकाम, रा. आंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. रोमित पिता बळीराम राठोड, वय २७ वर्षे, धंदा शेत मजुरी, रा. आंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रोशनी भ्र. बाळू जाधव, वय २४ वर्षे, धंदा घरकाम, रा. लोहशिंगवे, ता. नांदगांव जि. जळगांव. ४. बाली भ्र. वाल्मिक चव्हाण, वय २३ वर्षे, धंदा घरकाम, रा. घोडेगांव, ता. चाळीसगांव जि. जळगांव. ५. रुतिका पिता बळीराम राठोड, वय २१ वर्षे, धंदा शिक्षण, रा. आंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ही मयत बळीराम मेरचंद राठोड यांची पत्नी असून अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. तसेच अर्जदार क्र. ३ ते ५ ह्या मयताच्या मुली आहेत. मयत बळीराम मेरचंद राठोड यांना अर्जदार क्र. १ ते ५ हे कायदेशीर वारस आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ५ यांचे वडील नामे बळीराम मेरचंद राठोड हे दि. २१/०७/२०२३ रोजी मौजे आंबा तांडा, ता. कन्नड येथे आजारपणामुळे मरण पावली आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत बळीराम मेरचंद राठोड यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे व त्यांचे मयत वडील नामे बळीराम मेरचंद राठोड हे मौजे आंबा तांडा येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०५/१२/२०२४ रोजी मौजे आंबा तांडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :– ०९/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

सिव्हिल एम.ए. क्र. ५८१/२०२४,

अर्जदार : १) काशिबाई भ्र. कारभारी गव्हाणे, वय ६० वर्षे, धंदा घरकाम रा. ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) बाबासाहेब कारभारी गव्हाणे, वय ४१ वर्षे धंदा मजुरी रा. ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद ३) संतोष कारभारी गव्हाणे, वय २७ वर्षे धंदा मजुरी रा. ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद ४) प्रल्हाद कारभारी गव्हाणे, वय २१ वर्षे धंदा मजुरी रा. ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद ५) चंद्रकला भ्र. भाऊसाहेब गवळी, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम रा. कासोडा ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. एस.आर. शिराळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार क्र.२ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र.५ ही त्यांची बहिण आहे व अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे कारभारी भाऊसाहेब गव्हाणे हे मौजे ईटावा ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २१/०९/२०२४ रोजी मौजे ईटावा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत कारभारी भाऊसाहेब गव्हाणे यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे सांगुन अर्जदार यांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप – उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०२/०१/२०२५ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ३९६/२०२४ — पुढील तारीख १९/०२/२०२५.

अर्जदार : १. रेशीबाई भ्र. सरीचंद जाधव, वय ७९ वर्षे, धंदा घरकाम, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. देविदास पिता सरीचंद जाधव, वय ५९ वर्षे, धंदा शेती, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. रेवा उर्फ रेवनाथ पिता सरीचंद जाधव, (मयत दि. २२/०१/१९८९ चे वारस) ३.१ कौसाबाई भ्र. रेवा उर्फ रेवनाथ जाधव, वय ५५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.२ माणिक पिता रेवा उर्फ रेवनाथ जाधव, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४. अर्जुन पिता सरीचंद जाधव, (मयत दि.३०/०५/२०१३ चे वारस) ४.१ चांगुनाबाई भ्र. अर्जुन जाधव, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद, ४.२ पवन पिता अर्जुन जाधव, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.३ रोशन पिता अर्जुन जाधव, वय २५ वर्षे, धंदा शिक्षण, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.४. दमिनी भ्र. कृष्णा राठोड, वय २७ वर्षे, धंदा घरकाम, रा. करगांव तांडा, ता. चाळीसगांव जि. जळगांव. ५. नकूल पिता सरीचंद जाधव, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. हिवरखेडा गौताळा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ६. रुखमनबाई भ्र. मांगुलाल चव्हाण, वय ६७ वर्षे, धंदा घरकाम, रा. जवहार कॉलनी, ओमकार कोचिंग क्लासेस जवळ, भानुदास नगर, औरंगाबाद. ७. सानोबाई भ्र. नरसिंग राठोड, वय ५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. सातकुंड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ८. निर्मला भ्र. पंडीत चव्हाण, वय ४६ वर्षे, धंदा घरकाम, रा. सुर्या लॉन्स समोर देवळाई गाव, सातारा, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद. ९. मंदाबाई भ्र. मोरसिंग राठोड, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. लहान बोढरे, ता. चाळीसगांव जि. जळगांव.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ९ हे मयत सरीचंद भावडू जाधव यांचे मुले होती व आहेत. मयत सरीचंद भावडू जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ९ हे कायदेशीर वारस आहे. मयत सरीचंद भावडू जाधव दिनांक ०७/१२/२०१३ रोजी मौजे हिवरखेडा गौताळा ता. कन्नड येथे मरण पावले आहे. मयत सरीचंद भावडू जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ९ अशी एकूण ९ आपत्य होती. त्यापैकी अर्जदार क्र. ३ रेवा उर्फ रेवनाथ पिता सरीचंद जाधव अर्जदार क्र. ४ अर्जुन पिता सरीचंद जाधव हे मयत झाले असून त्यांचे ईतर आपत्य हे हयात आहे. मयताचा मुलगा अर्जदार क्र. ३ रेवा उर्फ रेवनाथ पिता सरीचंद जाधव हा दि. २२/०१/१९८९ रोजी मौजे हिवरखेडा गौताळा ता. कन्नड येथे मयत झाला असून त्यांना अर्जदार क्र. ३.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. ३.२ हा मुलगा आहे. या व्यतिरिक्त मयत रेवा उर्फ रेवनाथ पिता सरीचंद जाधव यांना इतर कोणीही वारस नाही. तसेच मयतांचा मुलगा अर्जदार क्र. ४ अर्जुन पिता सरीचंद जाधव हा दि. ३०/०५/२०१३ रोजी मौजे हिवरखेडा गौताळा ता. कन्नड येथे मयत झाला असून त्यास अर्जदार क्र. ४.१ ही पत्नी आहे. अर्जदार क्र. ४.२ व ४. ३ हे मुले असून अर्जदार क्र. ४.५. ही विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयत अर्जुन पिता सरीचंद जाधव यांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्रं. १ ते ९ यांना मयत सरीचंद भावडू जाधव यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार क्रं. १ ते ९ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार कं. १ ते ९ हे व त्यांचे मयत वडील नामे सरीचंद भावडू जाधव हे मौजे हिवरखेडा गौताळा येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ९ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०२/११/२०२४ रोजी मौजे हिवरखेडा गौताळा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :– ०९/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. विदयामान दिवाणी न्यायाधिश (क स्तर) न्यायालय गंगापुर नि. छत्रपती संभाजीनगर**

दि.कि. अर्ज नं. ३७/२०२५ (मा. वाकचौरे साहेब कोर्ट)

अर्जदार : १) कुसुमबाई कडु पाटेकर वय ७६ वर्षे, धंदा–घरकाम २) दत्तात्रय कडु पाटेकर वय ४८ वर्षे धंदा शेती ३) पुंडलिक कडु पाटेकर वय ४६ वर्षे धंदा शेती तीघे रा. खादगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) इंदुबाई विजय औताडे वय ४४ वर्षे, धंदा–घरकाम रा. आगाठाण ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मा. न्यायालयात कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टनुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज श्री.ए.एस. करडे गंगापुर विधीज्ञ यांच्यामार्फत अर्ज सादर केला असुन अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहीवाशी असुन असुन अर्जदार नं. १ यांचे पती, अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडील नामे कडु बन्सी पाटेकर हे दिनांक २५/१०/२०२३ रोजी मौजे खादगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले असुन मयत कड्डु बन्सी पाटेकर यांचे आई नामे चंद्रभागा बन्सी पाटेकर व वडील नामे बन्सी मुक्ताजी पाटेकर हे यापुर्वीच मयत झाले आहे. मयत कडु बन्सी पाटेकर यांना अर्जदार हे कायदेशिर एकमेव वारसदार आहे अर्जदार यांना मयत कड्डु बन्सी पाटेकर यांच्या वारस कार्यवाही कामी मयत कड्डु बन्सी पाटेकर यांचे वारसप्रमाणपत्र हे कार्यालयीन व शासकीय कामासाठी आवश्यकता आहे. सदरील वारसप्रमाणपत्र देण्यास अर्जदारांच्या नावाने देण्यात यावे.

त्याअर्थी याबाबत आपला काही आक्षेप अथवा उजर असल्यास तीस दिवसाच्या आत स्वःता अथवा त्यांच्या विधीज्ञामार्फत या न्यायालयात सादर करावा नसता मुद्दतीनंतर वरील अर्जदाराच्या अर्जावर आपला कोणताही आक्षेप नाही असे गृहीत धरून पुढील कार्यवाही केली जाईल. करिता आज दिनांक /०१/२०२५ रोजी सही व शिक्कानिशी देत आहे

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — साहाय्यक अधिक्षक

मा. दिवाणी क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगाव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)**

## जाहीर प्रगटन

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. MAII/ 2025.

१/– मुमताज तय्यब देशमुख, वय ४० वीं, धंदा, घरकाम, रा. सोयगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर

२/– सोहेल तय्यब देशमुख, वय २४ वर्ष, धंदा शिक्षन, रा. वरीलप्रमाणे.

३/– सलमान तय्यब देशमुख, वय २१ वर्ष, धंदा शिक्षन, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

कुणीही नाही

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. राजेश अ.. गिरी, रा. सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत तय्यब राजमिया देशमुख यांचा दि. ०९.१०.२०२४ रोजी मौजे संयगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर येथे मयत असुन त्यांच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ३ एकमेव हे वारस आहेत, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ यांनी मयत तय्यब राजमिया देशमुख यांचे वारस असुन त्यांना मयत तय्यब राजमिया देशमुख यांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल. आजरोजी दि. ९/१/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे. पु. ता. २०/२/२०२५

आदेशावरुन,

क. लिपीक — सहा. अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगाव)

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. ४०२/२०२४

पुढील तारीख १२/०२/२०२५.

अर्जदार : – १. प्रताप पिता देवराव चव्हाण, वय ७९ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. किसन पिता देवराव चव्हाण, वय ७३ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह.मु. हिवरखेडा रोड, श्रीराम कॉलनी, कन्नड ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. बाबुराव पिता देवराव चव्हाण, वय ६७ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ह. मु. सदानंद नगर, सातारा परिसर, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद. ४. बारकू पिता देवराव चव्हाण (मयत दि.११/०३/२०१९ चे वारस) ४.१ लिलाबाई भ्र. मदन राठोड, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.२ भरत पिता बारकू चव्हाण, वय ६० वर्षे, धंदा व्यापार, रा. भारंबा तांडा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ४.३ बाळू पिता बारकू चव्हाण, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कनड जि. औरंगाबाद. ५. जगन पिता देवराव चव्हाण (मयत दि.२१/१०/१९९४ चे वारस) ५.१ नांदीबाई जगन चव्हाण, वय ६५ वर्षे, धंदा घरकाम, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.२ संजय पिता जगन चव्हाण, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, कन्नड जि. औरंगाबाद. ५.३ शेषराव पिता जगन चव्हाण, वय ४३ वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.४ एकनाथ पिता जगन चव्हाण, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. भारंबा तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ५.५ उषाबाई भ्र. शिवलाल राठोड, वय ५० वर्षे, धंदा घरकाम, रा. कोळवाडी, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर.

अर्ज : बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड. डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत देवराव भोजू चव्हाण व मयत हासकीबाई देवराव चव्हाण यांचे मुले होती व आहेत. मयत देवराव भोजू चव्हाण व मयत हासकीबाई देवराव चव्हाण यांना अर्जदार क्र. १ ते ५ हे कायदेशीर वारस आहे. मयत देवराव भोजू चव्हाण दिनांक २७/०३/१९९१ रोजी मौजे भारंबा तांडा ता. कन्नड येथे मरण पावले असून व मयताची पत्नी हासकीबाई देवराव चव्हाण हि सुद्धा दि.१२/१२/२००४ रोजी मौजे भारंबा तांडा, ता. कन्नड येथे मयत झालेली आहे. मयत देवराव भोजू चव्हाण व मयत हासकीबाई देवराव चव्हाण यांना अर्जदार क्र. १ ते ५ अशी एकूण ५ आपत्य होती. त्यापैकी अर्जदार क्र. ४ बारकु देवराव चव्हाण व अर्जदार क्र. ५ जगन देवराव चव्हाण हे मयत झाले असून त्यांचे ईतर आपत्य हे हयात आहे. मयतांचा मुलगा बारकु देवराव चव्हाण हा दि. ११/०३/२०१९ रोजी मौजे भारंबा तांडा ता. कन्नड येथे मयत झाला असून त्याची पत्नी जनसीबाई भ्र. बारकू चव्हाण ही सुद्धा दिनांक १२/०३/२०१८ रोजी मयत झाली आहे. त्यांना अर्जदार क्र. ४.१ ही विवाहित मुलगी असून अर्जदार क्र. ४.२ व ४.३ हे मुले आहेत. या व्यतिरिक्त मयत बारकु देवराव चव्हाणयांना इतर कोणीही वारस नाही. सोबत मयत अर्जदार क्र. ४ बारकु देवराव चव्हाण यांचे ग्रामपंचायत भारंबा तांडा यांनी दिलेले मृत्यू प्रमाणपत्र दाखल करीत आहे. तसेच मयतांचा मुलगा जगन देवराव चव्हाण हा दि. २१/१०/१९९४ रोजी मौजे भारंबा तांडा ता. कन्नड येथे मयत झाला असून त्यास अर्जदार क्र. ५.१ ही पत्री आहे. अर्जदार क्र. ५.२ ते ५.४ हे मुले असून अर्जदार क्र. ५.५. ही विवाहित मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयत जगन देवराव चव्हाणयांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्रं. १ ते ५ यांना मयत देवराव भोजू चव्हाण व मयत हासकीबाई देवराव चव्हाण यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार नं. १ ते ५ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे व त्यांचे मयत वडील नामे देवराव भोजू चव्हाण व आई हासकीबाई देवराव चव्हाण हे मौजे भारंबा तांडा तांडा येथे राहत असतांना मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ५ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०२/११/२०२४ रोजी मौजे भारंबा तांडा ता. कन्नड येथे घडले. त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक :– ०९/०१/२०२५.

आदेशावरुन

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायाधिश क. स्तर, कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब क. स्तर न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

Civil Misc. Application No. 30/2025

अर्जदार : १. अशोक आण्णाभाऊ वालतुरे, २. संतोष आण्णाभाऊ वालतुरे, ३. छाया कडुबाळ डिके, रा.जैनपुर, ता. नेवासा जि. अहमदनगर ४. कांताबाई भ्र.आण्णा उर्फ आण्णाभाऊ वालतुरे, अर्जदार नं.१, २, व ४ रा. नेवरगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही.जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बावत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार नं. १ ते ३ यांचे पिता आणि अर्जदार नं. ४ यांचे पती नामे आण्णाभाऊ उर्फ आण्णा बाजीराव वालतुरे यांचा दि. १५/१२/२००३ रोजी मौजे नेवरगाव, ता. गंगापुर जि. औरंगाबाद (छ. संभाजीनगर) येथे मृत्यु झाला आहे. मयत आण्णाभाऊ उर्फ आण्णा बाजीराव वालतुरे यांना अर्जदार नं. १ ते ४ हेच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतीरिक्त मयत आण्णाभाऊ उर्फ आण्णा बाजीराव वालतुरे यांना इतर कोणीही वारसदार नाहीत.

करीता उक्त अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने, त्यांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप–उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हि सायटेशन नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल.

करीता हि सायटेशन नोटीस माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ०८/०१/२०२५ रोजी दिले.

पु.ता.१८/२/२०२५

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापूर जि. औरंगाबाद**

दि.कि.अर्ज.क. ४०/२०२५

अर्जदार : १) वर्षा रविंद्र सुराशे, वय. २३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. मांजरी ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) वैभव रविंद्र सुराशे, वय. ०२ वर्षे, अ.पा.क आई अर्जदार क. १

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशल ॲक्ट कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारने या न्यायालयात त्यांच्या वारस प्रमाणपत्र मिळणेकामी त्यांचे विधीज्ञ ॲड. एस. एस. कसाने यांच्या मार्फत प्रस्तुतचा अर्ज सादर केला असुन अर्जदार क. १ चे पती तसेच अर्जदार क. २ चे पिता नामे रविंद्र अशोक सुराशे हे दि. १२/०८/२०२४ रोजी मौजे औरंगाबाद येथे अपघातात मयत झालेले असून ते मौजे मांजरी ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते. त्यांना अर्जदार क. १ व २ हे एकमेव कायदेशीर वारस असून या व्यतिरिक्त इतर कोणीही वारस नाही. मयतास अर्जदार क १ व २ हे एकमेव वारस आहे. अर्जदारांना मयत रविंद्र अशोक सुराशे यांच्या अपघाती मृत्युमुळे शासकीय निमशासकीय तसेच सरकारी मदत मिळविण्या करीता अर्जदारांना व इतर कार्यालयामध्ये मयताचे वारस असल्याबाबत वारंवार मागणी होत असते तसेच अर्जदार क. १ हीस विधवा म्हणुन शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार क. १ व २ हे मयताचे एकमेव वारस असल्याबाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असल्यास या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दीनंतरचा आलेला आक्षेप–उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे योग्य ते कायदेशीर आदेश पारित करतील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १०/०१/२०२५ रोजी दिले.

पु. ता. २५/०२/२०२५

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ३४/२०२५ — पुढील तारीख २०/०२/२०२५

अर्जदार : १. अन्नासाहेब मलकु माने पाटील वय. ६२ वर्ष धंदा. शेती २. आप्पासाहेब मलकु माने पाटील वय. ५९ वर्ष धंदा. शेती १ व २रा. १७–२, शांताई निवास, लक्ष्मी माता मंदिर परिसर, जामगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४३१११० ३. शीला भाऊसाहेब वाकडे वय. ५५ वर्ष धंदा. शेती रा. घर नं. ३३, बीड बाय पास रोड, एम.आय.टी. कॉलेज समोर, सातारा परिसर, छ. संभाजीनगर ता.जि.छ.संभाजीनगर ४३१००१

–: विरूद्धः–

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन ॲक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेकामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे व कथन केले आहे की,

असे की, असे की, अर्जदार नं. १ ते ३ यांचे वडिल मलकू त्रिंबक माने हे दि. १९/०८/२०२४ रोजी मौजे जामगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहेत. तसेच अर्जदार नं. १ ते ३ यांची आई नामे पुष्पाबाई मलकू माने हे देखील त्याअगोदरच दि. १०/०७/२०२२ रोजी मौजे जामगांव ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले असल्याने अर्जदार यांच्या शिवाय मयत मलकू त्रिंबक माने व मयत पुष्पाबाई मलकू माने यांना इतर दुसरे कोणीही वारस नाही.

असे की, मयत मलकू त्रिंबक माने व मयत पुष्पाबाई मलकू माने हे दोन्ही शेतमजूर होते व अर्जदार यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यासाठी मयत मलकू त्रिंबक माने व मयत पुष्पाबाई मलकू माने यांचे वारस प्रमाणपत्राची आवश्यक्ता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की मयत मलकू त्रिंबक माने व मयत पुष्पाबाई मलकू माने यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत मलकू त्रिंबक माने व मयत पुष्पाबाई मलकू माने यांचे वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल व मुती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ५६०/२०२४

प्रकरणात पु. ता. दि.२८/०१/२०२५

अर्जदार : जनार्धन चंद्रकांत गाकयवाह, वय ४२ वर्ष, धंदा मजुरी, रा. बुटटेवाडगांव लासुर स्टेशन ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. शिराळे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हा वरील नमुद ठिकाणचा कायमस्वरूपी राहणारा असुन अर्जदाराचे वडील नामे चंद्रकांत कोंडीराम गायकवाड हे दि.२३/११/२०२४ रोजी बुटटेवाडगांव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले असुन मयताची पत्नी म्हणजेच अर्जदाराची आई नामे परिगाबाई चंद्रकांत गायकवाड हि दि. ०४/०५/२०१२ रोजी मौजे बुटटेवाडगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे मयत चंद्रकांत कोंडीराम गायकवाड व मयत परिगाबाई चंद्रकांत गायकवाड यांना अर्जदार हा एकमेव मुलगा कायदेशीर वारसदार आहे अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयतांना इतर मुलगा किंवा मुलगी वारसदार नाही. मयत चंद्रकांत कोंडीराम गायकवाड व मयत परिगाबाई चंद्रकांत गायकवाड यांना अर्जदार हा एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत चंद्रकांत कोंडीराम गायकवाड व मयत परिगाबाई चंद्रकांत गायकवाड यांच्या मृत्यु मुळे अर्जदारास शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन. आज दि. १०/०१/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## आयोध्येतील श्रीराममंदिर प्रतिष्ठापनेचा वर्धापनदिन तिथीप्रमाणे ११ जानेवारीला साजरा करावा : संजयआप्पा बारगजे



छत्रपती संभाजीनगर : करोडो तास लाखो दिवस असंख्य महिने जवळपास ७६ लढाया,लाखो हिंदूच्या बलिदानानंतर आणि ४९६ वर्षाच्या संघर्षानंतर हिंदू समाजाचा आत्मसन्मान २२ जानेवारी २०२४ ला परत मिळाला.

आयोध्येतील प्रभूश्रीराम मंदिरात देशाचे पंतप्रधान मा.नरेंद्रजी मोदी पू.सरसंघचालक मोहनजी भागवत आणि हजारो पूजनीय संतमहंत आणि मान्यवरांच्या उपस्थितीत दि.२२ जानेवारी २०२४ ला बालरूपातील रामललाची प्रतिष्ठापना आयोध्येत झाली. भारतासह संपूर्ण जगात जगात जिथे जिथे हिंदु राहतात त्यांनी हा आनंदोत्सव विविध पद्धतीने साजरा केला.

प्रभू श्रीरामाच्या प्रतिष्ठापनेला तिथीप्रमाणे ११ जानेवारीला एक वर्ष पूर्ण होत आहे.शनिवार दिनांक ११ जानेवारी म्हणजे आज वर्धापनदिनी सर्व हिंदू बंधू-भगिनीनी जवळच्या मंदिरात एकत्र येऊन रामनामाचा जप करावा संकीर्तन करावे आणि सामूहिक आरती करुन प्रसाद वितरीत करावा तसेच सायंकाळी घराच्या बाहेर पाच दिवे लावावेत

याशिवाय ज्यांना जे जे शक्य असेल त्यांनी विविध पद्धतीने वर्धापन दिनाचा आनंद साजरा करावा असे आवाहन विश्व हिंदू परिषद देवगिरी प्रांत अध्यक्ष श्री संजय आप्पा बारगजे आणि मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे देवगिरी प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी केले आहे.

## पोस्ट बँकेत खाते काढणे आता अधिक सुलभ

अहिल्यानगर, दि.१० - भारतीय डाक विभागाने ग्राहकांसाठी पोस्ट ऑफिस सेव्हिंग्स बँक (पीओएसबी) डिजिटल स्वरूपात आणण्यासाठी पेपरलेस ई-केवायसी आणि आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरण सुरू केले आहे. यामुळे खाते उघडणे तसेच सुरक्षित आणि जलद व्यवहार करणे अधिक सोयीचे झाले आहे.

ग्राहक आता आधार बायोमेट्रिक प्रमाणीकरणाचा वापर करून खाते उघडू शकतात. खाते क्रमांक आणि बोटांचे ठसे वापरून ५ हजार रुपयांपर्यंत रक्कम काढणे तसेच खाते व्यवस्थापन करता येईल. यामुळे ग्राहकांची सही जुळण्याच्या अडचणी दूर होतील आणि व्यवहार अधिक सुरक्षित होतील.

डिजिटल पद्धतीमुळे लाडकी बहीण योजना, लेक लाडकी योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, मातृत्व योजना यांसारख्या थेट लाभ हस्तांतरणासाठी (डीबीटी) खात्याचा सहज उपयोग होणार आहे. याशिवाय, ग्राहक इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या खात्याला (पीओएसए) लिंक करून घरबसल्या पैसे जमा, काढणे, तसेच खाते तपशील मिळवणे आदी सेवांचा लाभ ग्राहकांना घेता येणार आहे.

ग्राहकांनी अधिक माहितीसाठी जवळच्या पोस्ट कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन अहमदनगर पोस्ट विभागाचे वरिष्ठ अधीक्षक बी. नंदा यांनी केले आहे.

## मिठातील आयोडिनच्या गुणांमुळे उंचावले जीवनमान - टाटा सॉल्टचे अग्रेसर स्थान

नांदेड - भारताने लोहाच्या कमतरतेमुळे होणाऱ्या आरोग्याच्या समस्यांना तोंड देण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. आयोडिन हे एक महत्त्वाचे मायक्रोन्युट्रियंट असून थायरॉइडच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावते. आयोडिनच्या कमतरतेमुळे आयोडिन डेफिशियन्सी डिसऑर्डरचा त्रास होऊ शकतो. वेगवेगळ्या वयोगटातल्या लोकांना विशेषतः लहान मुले व गरोदर स्त्रियांना या डिसऑर्डरचा त्रास होऊन त्याचे गंभीर दुष्परिणाम होऊ शकतात. आयोडिनच्या कमतरतेमुळे होणारा सर्वात गंभीर त्रास म्हणजे हायपोथायरॉइडिझम, ज्यामध्ये थायरॉइड पुरेसे हार्मोन्स तयार करण्यात अपयशी ठरतं. जर या आजारावर उपचार केले गेले नाही, तर ते जीवावर बेतू शकतं. यात थकवा, वजन वाढ, कोरडी त्वचा, थंडी वाजणे अशी लक्षणे दिसतात. गरोदर स्त्रियांना आयोडिनच्या कमतरतेमुळे मूल जन्मतः मृत असणे, गर्भपात होणे, पोटातल्या बाळाचा विकास नीट न होणे, मतीमंदत्व अशा समस्यांना तोंड द्यावे लागू शकते.

## भारत सरकार आणि आरबीआय ने आयडीएफसी फर्स्ट बँकेला प्रत्यक्ष कर संकलनासाठी अधिकृत केले

नाशिक - आयडीएफसी फर्स्ट बँकेने भारत सरकारच्या केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाच्या (सीबीडीटी) वतीने प्रत्यक्ष कर गोळा करण्यासाठी प्राप्तिकर पोर्टलसह त्याचे एकत्रीकरण जाहीर केले. डाउनलोड करण्यायोग्य चालान, सुलभ पेमेंट आणि त्वरित पेमेंट कन्फर्मेशनसह बँकेचे ग्राहक आता प्रत्यक्ष कर भरण्यासाठी त्रासमुक्त पेमेंट अनुभव घेऊ शकतात. बँक ग्राहक आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या वापरकर्त्यांसाठी अनुकूल रिटेल आणि कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्म वापरू शकतात किंवा रोख, धनादेश किंवा डिमांड ड्राफ्ट वापरून आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या कोणत्याही शाखेत कर भरू शकतात. विकासावर बोलताना, आईडीएफसी फर्स्ट बँकेचे रिटेल लायबिलिटीज कंट्री हेड- चिन्मय ढोबले म्हणाले, आम्ही एक युनिव्हर्सल बँक आहोत आणि युनिव्हर्सल बँकिंगचे प्रतिनिधित्व करण्यासाठी उत्पादने आणि सेवांचा संपूर्ण संच तयार करत आहोत. आयकर आणि जीएसटी भरणे या दोनच महत्त्वाच्या सेवा होत्या ज्या आमच्या प्रस्तावात उणीव होत्या. आम्हाला आनंद होत आहे की सीबीडीटी, भारत सरकार आणि आरबीआयच्या मान्यतेने, आम्ही आता सीबीडीटी, भारत सरकारच्या वतीने कर गोळा करण्यासाठी अधिकृत आहोत.

## हास्याचा धमाका घेऊन येत आहे 'ऑलमोस्ट कॉमेडी'

एव्हरेस्ट एंटरटेनमेंट आपल्या दर्जेदार व मनोरंजक आशयासाठी प्रसिद्ध आहे. प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी ते नेहमीच नवनवीन प्रयोग करत असतात. 'प्रेमाची गोष्ट', 'मी शिवाजीराजे भोसले बोलतोय', 'कॉफी आणि बरंच काही' 'बॉईज' यांसारख्या अनेक लोकप्रिय चित्रपटांद्वारे त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. आता प्रेक्षकांच्या मनोरंजनात आणखी भर घालण्यासाठी एव्हरेस्ट एंटरटेनमेंट एक धमाकेदार संकल्पना घेऊन येत आहे. प्रेक्षकांना हास्याच्या दुनियेत घेऊन जाण्यासाठी एव्हरेस्ट एंटरटेनमेंट सज्ज झाले आहे.

# भंडारदरा धरणातून चार आवर्तने सोडणार

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठकीत निर्णय

नगर - भंडारदारा प्रकल्पात उपलब्ध असलेल्या पाणी साठ्यातून उन्हाळ्याचे तीन आणि रब्बीचे एक आवर्तन करण्यावर जलसंपदा मंत्री (गोदावरी व कृष्णा खोरे महामंडळ) राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. निळवंडे कालव्यांना १५ जानेवारी पासून पाणी देण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

भंडारदारा प्रकल्पाच्या कालवा सल्लागार समितीची बैठक लोणी येथील जलसंपदा विभागाच्या विश्रामगृहात संपन्न झाली. याप्रसंगी खासदार भाऊसाहेब वाकचौरे, आमदार डॉ किरण लहामटे आमदार अमोल खताळ आ.हेमंत ओगले, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, नाशिक विभाग मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, अधीक्षक अभियंता राजेश गोवर्धने, स्वप्निल काळे, निळवंडे प्रकल्पाचे अभियंता बाळासाहेब शेटे, कैलास ठाकरे आदी उपस्थित होते.





भंडारदरा प्रकल्पात उपलब्ध असलेल्या पाण्यातून सध्या सिंचन बिगर सिंचनाचे आवर्तन सुरू आहे. येणाऱ्या काळात २० फेब्रुवारी ते २४ मार्चमध्ये पुढचे आवर्तन करण्याचे नियोजन असून,२४ मार्च ते ३० एप्रिल मध्ये दुसरे आवर्तन आणि शिल्लक पाण्यातून जूनमध्ये एक आवर्तन कसे होईल, याचेही नियोजन विभागाने केले असल्याची माहिती जलसंपदा मंत्री श्री.विखे पाटील यांनी बैठकीत दिली.

निळवंडे प्रकल्पात सहा टीएमसी पाणी साठा उपलब्ध असून कालव्यांना १५ जानेवारी पासून आवर्तन सोडण्याच्या सूचना त्यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना दिल्या. या आवर्तनातून पाझर तलाव भरून देण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

अतिक्रमणाच्या कारणाने चाऱ्यांच्या कामांना विलंब होत असून चाऱ्यांच्या भोवताली असलेले अतिक्रमण काढण्याचे काम तातडीने करण्यात यावे, अनेक ठिकाणी चाऱ्यांवर घर, जनावारांचे गोठे बांधण्यात आले आहेत. नकाशा प्रमाणे त्यांची मोजणी करण्यात यावी. चाऱ्या किंवा कालवे यांच्यावर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

शेतकऱ्यांनी वेळेत पाणी मागणीचे अर्ज भरावेत, निळवंडे चाऱ्यांच्या कामांसाठी निधी उपलब्ल करून देण्यात येणार असून ही काम एक वर्षाच्या आत पूर्ण करण्यात यावे, भविष्यात आपल्याकडे असलेल्या केटिवेअरचे रुपांतर बॅरेजमध्ये करून पाणी साठवण क्षमता वाढविण्याचा विचार करावा लागेल, असेही जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

जिल्ह्यातील पाण्याचे प्रश्न सोडविण्यासाठी प्राधान्यक्रम निश्चित करण्यात आला असून पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी तुटीच्या खोऱ्यात वळवितानाच भंडारदरा धरणात अतिरिक्त पाणी साठा निर्माण करावा लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्र राज्य व अहिल्यानगर जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेची जय्यत तयारी

### केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते १३ जानेवारी रोजी मैदानाचे भूमिपूजन होणार - आ. संग्राम जगताप

अहिल्यानगर : महाराष्ट्र राज्य व पहिल्यांदा जिल्हा कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा वाडिया पार्क येथे दिनांक २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी रोजी संपन्न होणार असून आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली नियोजनाची बैठक संपन्न झाली यावेळी पै. अनिल गुंजाळ, जिल्हा क्रीडा अधिकारी आमसिद्ध सोनलकर, क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरांगे, काका शेळके, युवराज करंजुले, अभिजीत खोसे, सुरेश बनसोडे, संभाजी पवार, दिलीप पवार, वैभव ढाकणे, संतोष ढाकणे, मळू गाडळकर, अतुल कावळे, मोहन गुंजाळ, निलेश हिंगे, दादा पांडुळे, सचिन जगताप, भरत पवार, सागर गुंजाळ, चेतन शेलार, संजय शेळके, सोनू घेबुड, मंगेश खताळ आदी उपस्थित होते

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, वाडिया पार्क मैदानामध्ये पहिल्यांदाच ६७ वी राज्य अजिंक्यपद व महाराष्ट्र केसरी स्पर्धा २९ जानेवारी ते २ फेब्रुवारी रोजी होणार आहे तरी १३ जानेवारी रोजी केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते मैदानाच्या कामाचे भूमिपूजन सकाळी १० वाजता होणार आहे तसेच कुस्ती स्पर्धेच्या उद्घाटनाचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन देण्यात आले आहे. देश व राज्यभरातून कुस्ती पाहण्यासाठी मोठ्या संख्येने कुस्तीप्रेमी येणार आहे तरी सुमारे ५० हजार जणांची बैठक व्यवस्था करण्यात येणार आहे या ठिकाणी लाल मातीचे व मॅटचे असे दोन मैदान तयार केले जाणार आहे, देशात महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचा नावलौकिक होईल अशी तयारी केली जात आहे, अहिल्यानगर जिल्हा हा कुस्तीपटूंचा म्हणून ओळखला जात आहे नवीन कुस्तीगीर निर्माण करण्यासाठी त्यांना चांगल्या दर्जाच्या सुविधा व मार्गदर्शन देण्यासाठी वाडिया पार्क मैदानामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जेचे मैदान निर्माण होणार आहे महिलाही आता क्रीडा क्षेत्रामध्ये नावलौकिक मिळवत असून श्रीगोंदा तालुक्यातील भाग्यश्री फंड या कन्येने नॅशनल कुस्ती स्पर्धेमध्ये बाजी मारली असून आपल्या जिल्ह्याला नावलौकिक मिळवून दिला आहे असे ते म्हणाले.

**आमदार संग्राम जगताप यांनी वाडिया पार्क मैदानात होणाऱ्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या नियोजनाची बैठक मैदानातील मातीत बसून घेतली असून कुस्तीगिरांना नियोजनाची जबाबदारी दिली आहे राज्यातून सुमारे साडे नऊशे कुस्तीपटू सामील होणार आहे, प्रत्येक जिल्ह्यातून माती व गादी गटातील 20 खेळाडू सहभागी होणार आहे असे ते म्हणाले.**

# पाप झाकण्यासाठी ओबीसीचा आसरा

## मनोज पा.जरांगे यांची मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका

तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९ :- मास्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या निषेधार्थ आम्ही करत असलेल्या आंदोलनामुळे मंत्री धनंजय मुंडे यांनी आरोपी वाल्मिकी कराड टोळीच्या साहाय्याने केलेले पाप उघडे पडत असून ते झाकण्यासाठी मुंडे ओबीसीचा आसरा घेत आहेत. षडीयंत्र करून मंत्री मुंडे हेच राज्यात प्रतीमोर्चे काढायला लावत असल्याची टिका मराठा संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे यांनी केली.मराठा आरक्षण प्रश्नी २५ जानेवारीचे उपोषण झाल्यानंतर आपण मंत्री धनंजय मुंडे यांचा जोरदार समाचार घेऊ असेही जरांगे म्हणाले.

छत्रपती शिवाजी महाराज चौकात आयोजित सरपंच संतोष देशमुख आणि परभणीचे सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यूच्या निषेधार्थ पैठणला महा जनआक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकात





या मोर्चाच्या सांगता झाली यावेळी मराठा संघर्ष योद्धा मनोज पाटील जरांगे बोलत होते. यावेळी आमदार सुरेश अण्णा धस, मयत सरपंच देशमुख यांची कन्या वैभवी संतोष देशमुख,तसेच देशमुख कुटुंबीय ,दीपकभाई केदार युवा सरपंच शिवराज भुमरे, चेअरमन सी.ए सचिन भैय्या घायाळ, माजी मंत्री पटेल, काजी करिमोतूल्ला,विकास पाथ्रीकर, चिमुकली हर्षा किशोर सदावर्ते यांनी आपले विचार व्यक्त केले मंचावर मा.नगराध्यक्ष सुरज लोळगे, तालुकाध्यक्ष लक्ष्मण औटे,रमेश पाटील,तालुकाध्यक्ष विनोद तांबे आदींची उपस्थिती होती. यावेळी बोलतांना आमदार सुरेश धस यांनी सरपंच देशमुख यांच्या शवविच्छेदनाच्या आठपाणी अहवालाची माहिती देत आरोपी कराड याचा मंत्री धनंजय मुंडे हे आका असल्याचे सांगत त्यांच्या टोळीच्या नावावरील संपत्ती, दाखल गुन्हे तसेच परळी पोलीस ठाण्यात केलेले गैरप्रकार समोर आणत पोलिसांवर जोरदार टीका करत राज्यात आता टीव्ही कलाकार पोलीस टीमची नियुक्ती करावी असे धस म्हणाले. देशमुख आणि सूर्यवंशी यांच्या हत्येच्या निषेधार्थ सुरू असलेले आंदोलन भटकवण्यासाठी राज्यात रिचार्ज पुढारी आणले जात असल्याचे ही आमदार धस यावेळी म्हणाले तर आमच्यावर कितीही गुन्हे दाखल करा आम्ही न्याय मिळे पर्यंत थांबणार नसल्याचे जरांगे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले. कावसनकर स्टेडियम ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अश्या या जनआक्रोश महामोर्चाला हजारोंच्या संख्येने आंदोलक सहभागी होते.यावेळी राष्ट्रगीताने या जनआक्रोष मोर्चाची सांगता करण्यात आली.

# जिल्हा बँकेची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे होणार स्वयंघोषित एजंटा पासून सावध रहा; जिल्हा बँकेचे अध्यक्ष आ. शिवाजीराव कर्डिले यांचे आवाहन

अहमदनगर -दि.१०- जिल्हा सहकारी बँकेची भरती प्रक्रिया परीक्षेच्या रूपाने आज पासून पुणे या ठिकाणी सुरू झाली आहे .बँकेची भरती प्रक्रिया पारदर्शकपणे व्हावी यासाठीच पुण्यासारख्या ठिकाणी ऑनलाइन सिस्टीमने ही प्रक्रिया पूर्ण होणार असून स्वयंघोषित एजंट पासून परीक्षार्थी व त्यांच्या जवळच्या नातेवाईकांनी सावध राहावे असे आवाहन जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी केले आहे.

जिल्हा बँकेसाठी गुरुवार पासून पुणे येथे भरती प्रक्रिया सुरू झाली असून ७०० जागांसाठी सुमारे २८ हजार अर्ज आलेले आहेत. आपल्या मुलाला अथवा मुलीला जवळच्या नातेवाईकाला या भरतीच्या माध्यमातून नौकरी मिळावी म्हणून गेल्या काही दिवसापासून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक यांच्याकडे कार्यकर्ते पदाधिकारी मित्र परिवार नातेवाईक यांची मोठी वर्दळ वाढल्याने बँकेच्या पदाधिकाऱ्यांची देखील यामुळे डोकेदुखी वाढली आहे. यासंदर्भात बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी ठोस भूमिका घेत भरती प्रक्रिया संदर्भात सविस्तर भूमिकाच बँकेच्या वतीने मांडली असून विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कार्यकर्ते हितचिंतक पदाधिकारी तरुण वर्ग सर्वांनीच प्रामाणिकपणे मोठे सहकार्य केले आणि म्हणूनच मोठ्या मताधिक्याने माझा विजय झाला त्याबद्दल सर्वांचे आभारी आहेच परंतु जिल्हा सहकारी बँक आशिया खंडातील सर्वात मोठी बँक असून या बँकेचा पारदर्शक कारभार सुरू आहे त्यामुळे होणारी भरती प्रक्रिया देखील पारदर्शकपणे व्हावी अभ्यासू हुशार गुणवंत विद्यार्थ्यांना या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून न्याय मिळावा हिच माझी प्रामाणिक इच्छा आहे.



तसेच उमेदवारांना परिक्षा देण्यासाठी पुण्यात जावा लागणार आहे कारण अहिल्यानगर जिल्ह्यात इतक्या उमेदवारांची परिक्षा घेण्याची सर्व तांत्रिक सुविधा उपलब्ध नाहीत. पाहिजे तेवढा परिक्षा घेण्यासाठी कम्प्युटर उपलब्ध नाहीत. त्यांना इथे परिक्षा घेतल्यास काही अडचणी निर्माण होऊ शकतात जसे की लाईट, इंटरनेट कनेक्टिव्हीटी इत्यादी सुविधा पुरेश्या प्रमाणात न मिळाल्यास अडचणी झाल्या असत्या असे कंपनीचे म्हणणे होते, त्यात तथ्य आहे. त्यामुळे या सर्व अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने पुण्यात परंतु नगरच्या जवळ परिक्षा घेण्याचे नियोजन कंपनी मार्फत केले गेले आहे. पुण्यासारख्या ठिकाणी संबंधित कंपनीच्या माध्यमातून ही भरती प्रक्रिया होणार आहे. ९, १०. ११, १२, १३ व १९ जानेवारीपर्यंत ही परिक्षा पार पाडणार आहे

ही भरती प्रक्रिया पारदर्शकपणे पार व्हावी यासाठी राज्य सरकारने त्यांच्या निकषास पात्र सर्व नियम अटी पुर्ण करणार्या सहा कंपन्यांचा पॅनल तयार करून बँकेस कळविला त्यानुसार बँकेने रितसर शासनाचे मार्गदर्शक सूचनानुसार कोटेशन मागवून त्यातील एका कंपनीला या भरती प्रक्रियेचे कामकाज देण्यात आले. नगर येथे भरती प्रक्रिया पूर्ण करायची म्हटले असते तर शनिवार-रविवार दोनच दिवस शाळांना सुट्टी असतात अशावेळी भरती प्रक्रिया करावी लागली असती त्यामुळे ही भरती प्रक्रिया पुढील अनेक दिवस सुरू राहिली असती. ज्या शिक्षण संस्था उपलब्ध आहेत त्यातील बऱ्याचशा शिक्षण संस्था बँकेच्या संचालक मंडळाशी सलग्न आहेत. त्यामुळे पुन्हा त्या ठिकाणी त्या शिक्षण संस्थेत भरती प्रक्रिया झाली असती तर गैरसमज वाढले असते.


तसेच भरती प्रक्रियेच्या ठिकाणी लाईट जनरेटर सुरक्षा सर्व व्यवस्था वेळेत उपलब्ध असणे देखील महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये बैठकीसह सर्व व्यवस्था त्या ठिकाणी संबंधित कंपनीने केलेली आहे. हुशार अभ्यासू गुणवंत विद्यार्थ्यांना निश्चित पणे या भरती प्रक्रियेमध्ये यश मिळेल असा विश्वास व्यक्त करत बँक भरती प्रक्रियेच्या नावाखाली काही स्वयंघोषित एजंट देखील तयार होतील ठराविक भाव फुटला असे कर्डिले यांनी सांगून त्यांनी पुढे सांगितले की, परीक्षार्थी विद्यार्थी अथवा त्यांच्या नातेवाईकांशी जवळीक साधून त्यांची फसवणूक करू शकतात अशा स्वयंघोषित एजंटापासून परीक्षार्थी विद्यार्थी व त्यांच्या नातेवाईकांनी सावध राहावे.

भरती प्रक्रियेमध्ये कुठल्या प्रकारची वशीलेबाजी होणार नसुन आर्थिक देवाण-घेवाण कोणाशी करू नये असे आवाहन देखील जिल्हा बँकेचे अध्यक्ष आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी यानिमित्ताने केले आहे. त्यांनी शासनाकडे या बाबत मागणी करताना जिल्हा बँकेच्या भरती प्रक्रियेतून बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक मंडळ यांना भरती प्रक्रियेपासून चार हात बाजूला ठेवावे. विनाकारण संचालक मंडळाला कुठल्याच प्रकारचा मनस्ताप नको अशा स्वरूपाची देखील मागणी बँक संचालक मंडळाच्या वतीने सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांना पुणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी केलेली आहे.

## संघ हीच जीवनगाथा

अलक (९)

### सीमोल्लंघन
### हिंदू राष्ट्रवाद



यवतमाळ व पुणे येथील राष्ट्रीय विद्यालयातून केशवने दहावीपर्यंतचे शिक्षण घेतले व नंतर १९१० मध्ये कलकत्त्याला नॅशनल मेडिकल कॉलेज मध्ये डॉक्टरी शिक्षणासाठी ॲडमिशन घेतली तिथून १९१५ साली डॉक्टर बनून नागपूरला परत आले, आता केशव खराखुरा डॉक्टर बनला होता. परंतु डॉक्टरी न केलेला डॉक्टर असे लोकमत तयार झाले होते. त्यातच त्यांचे थोरले बंधू महादेव यांचा प्लेगमुळेच मृत्यू झाला होता. देशात हिंदू-मुस्लीम ऐक्याचे नगारे झडत होते. वास्तविक हिंदुस्थानात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारशी, यहुदी अशा अनेक धर्माचे लोक रहात होते. या सर्वांची एकी हवी होती. पण महात्मा गांधींना हे पटले नाही. मुसलमान आक्रमक आहेत हे गांधींना मान्य होते म्हणूनच त्यांना प्रेमाने जिंकण्याचा प्रयत्न करत होते. आणि या चर्चेतूनच हिंदू राष्ट्रवाद उदयास आला हळूहळू संघाची उज्वल प्रतिमा डॉक्टरांच्या मनात फेर धरू लागली. या प्रतिमेला हिंदुत्वाचा शेला पांघरल्यानंतर ती अधिक तेजस्वी दिसू लागली. आणि संघाचा जन्म झाला. (क्रमशः)

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

# मेघना कीर्तिकर यांची प्रार्थना सभा संपन्न



मुंबई, दि. १० : शिवसेना ज्येष्ठ नेते, माजी खासदार गजानन कीर्तिकर यांच्या पत्नी कै.मेघना कीर्तिकर यांचे दिनांक ५ जानेवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले होते. त्यांची प्रार्थना सभा काल नेस्को संकुल, मुंबई प्रदर्शन केंद्र, हॉल क्र.'सी' ग्रॅन्डे, गेट नं. २, पश्चिम द्रुतगती महामार्ग, गोरेगाव (पूर्व) येथे सायंकाळी ६ ते ९ वा. या वेळेत आयोजित केली होती.

यावेळी सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, आप्तस्वकीय, नातेवाईक तसेच मित्रमंडळी, सामाजिक, शैक्षणिक, उद्योजक, बँकिंग, क्रीडा, आध्यात्मिक तसेच स्थानीय लोकाधिकार समिती महासंघाचे पदाधिकारी आदी विविध क्षेत्रातील आणि राज्यातील विविध भागातून आलेल्या इतर मान्यवरांनी यावेळी उपस्थित राहून कै. मेघना कीर्तिकर यांना श्रद्धांजली वाहिली. शिवसेना नेते व माजी खासदार गजानन कीर्तिकर, उपनेते अमोल कीर्तिकर, मुलगी गौरी पाठारे व हर्षदा मोरे, सून सुप्रिया कीर्तिकर यांचे सांत्वन केले.

यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, गृहराज्यमंत्री योगेश कदम, शिवसेना नेते विनायक राऊत, शिवसेना नेते चंद्रकांत खैरे, आमदार सुनील प्रभू, आमदार सुनील शिंदे, आमदार अतुल भातखळकर, आमदार राजहंस सिंह, माजी आमदार विलास पोतनीस, माजी आमदार बलदेव खोसा, माजी आमदार अशोक जाधव, कामगार नेते अभिजित राणे, अभिनेते जयवंत वाडकर आणि इतर मान्यवरांनी कीर्तिकर कुटुंबियांचे सांत्वन केले.

## जाहीर प्रगटन

**माननिय दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर गंगापुर यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज कं. १०/२०२५

अर्जदार - १. धनाबाई नारायण शिंनगारे रा. दहेगांव, ता. गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर २. मुरलीधर नारायण शिंनगारे रा. वरील प्रमाणे ३. मच्छिंद्र नारायण शिंनगारे रा. वरील प्रमाणे ४. ताराबाई ज्ञानदेव गादे रा. भाविनिमगांव, ता. शेवगांव, जि. अहमदनगर ५. हिराबाई दत्तात्रय गोरे रा. भेंडे बु., ता. नेवासा, जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

विषय - कलम २ बॉम्बे रेगूलेशन कायदयाप्रमाणे वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी ॲड. भगवान एस. शिंदे यांच्या मार्फत या मा. न्यायालयात अर्जदार यांनी वारसाचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला आहे, सदरील अर्जात अर्जदार यांनी म्हटले आहे की, असे की, अर्जदार कं. १ हि मयत नारायण खंडेराव शिंनगारे यांची पत्नी आहे, अर्जदार कं २ ते ५ हे मुले व मुली आहे. नारायण खंडेराव शिंनगारे हे दिनांक ०६/०७/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. अर्जदार अर्जासोबत मयताचे मुत्युप्रमाणपत्र व अर्जदार यांचे आधार कार्ड जोडत आहे. असे की, अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय योजनाचा लाभ घेण्यासाठी ते मयत नारायण खंडेराव शिंनगारे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे वारसाचे प्रमाणपत्राची अवश्यकता असल्यामुळे, त्याकामी त्यांनी मा. न्यायालयातुन कायदेशीर वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. असे की, मयत नारायण खंडेराव शिंनगारे यांना अर्जदाराशिवाय इतर कोणतेही कायदेशीर वारसदार नाहीत. अर्जदार यांनी या अर्जा व्यतिरिक्त कोणत्याही न्यायालयात ते मयत नारायण खंडेराव शिंनगारे यांचे वारसदार आसल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज दाखल केलेला नाही.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांना ते मयताचे कायदेशीर वारसदार आसल्याचे प्रमाणपत्र देण्यास ज्या कोणाचा उजर व आक्षेप आसेल अशानी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत त्यांचा उजर व आक्षेप या न्यायालयात नोंदवावा. मुदतीमध्ये कोणाचा उजर व आक्षेप न आल्यास अर्जदार यांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल, मुदतीनंतर आलेला उजर व आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही. पुढील तारीख ०७/०२/२०२५.

आज दिनांक ०४/०१/२०२५ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपिक | सहायक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क-स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ६११/२०२४ | प्रकरणात पु. ता. दि.१०/०२/२०२५

अर्जदार : १) कमलाबाई श. धर्मा गेलोत, वय ५० वर्ष, धंदा घरकाम, रा. जांभाळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद २) वर्षा भ्र. राजेश गिरी, वय ३८ वर्ष, धंदा घरकाम, रा. खापरखेडा पो. शीपुर जि. बुऱ्हाणपुर मध्यप्रदेश ३) उषाबाई भ्र. गगण गिरी, वय ३३ वर्ष, धंदा घरकाम, रा. खापरखेडा पो. शीपुर जि. बुऱ्हाणपुर मध्यप्रदेश

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एस. आर. शिराळे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क १ ते ३ हे वरील नमुद ठिकाणची कायमस्वरूपी राहणारी असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ व ३ यांची आई आहे म्हणजेच अर्जदार क २ व ३ हे हे अपसात सख्ख्या बहिनी आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ व ३ यांचे वडील नामे धर्म रामलाल गेलोत हे दि.२८/०९/२०१० रोजी जांभाळा ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन मयतास अर्जदार क १ हि पत्नी व अर्जदार क २ व ३ हया विवाहीत मुली कायदेशीर वारसदार आहेत. मयतास अर्जदारांशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत धर्म रामलाल गेलोत यांना अर्जदार हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतांना इतर कोणीही वारसदार नाही. मयत धर्म रामलाल गेलोत यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे करीता सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता जाहीर प्रगटन.

आज दि. ०८ / ०१ /२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक | सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## अग्रलेख...

# कालाय तस्मै नमः

काळाचे चक्र सतत फिरत असते. त्यामुळेच त्याचा एखादा बिंदू फिरून त्याच ठिकाणी येतो. वास्तविक भाषेत त्याला इतिहासाची पुनरावृत्ती झाली, असे म्हटले जाते. विशेषतः राजकारणातील घडामोडींचे सूक्ष्म निरीक्षण केले की, इतिहासाच्या पुनरावृत्तीचे असे अनेक दाखले समोर येतात. ते सहजासहजी लक्षात येत नाहीत, पण त्या घडामोडींचे पूर्वसंदर्भ लक्षात घेतले की, पुनरावृत्तीचा अनुभव घेता येतो. बैल म्हातारा झाला की त्याला बाजार दाखवायचा असतो, हे वाक्य सुमारे २० वर्षांपूर्वी महाराष्ट्राच्या राजकारणात प्रचंड गाजले होते. हाडाच्या शेतकऱ्यास अशा वाक्प्रचारांचा नेमका अर्थ ठाऊक असल्याने राजकारणातील बारकावे समजावून सांगण्याकरिता ग्रामीण भागात अशा वाक्यांचा वापर करणारे काही मुरब्बी नेते महाराष्ट्रात आहेत. म्हणूनच हे वाक्य ज्याला आठवते, त्याच्या मनात अगोदर शरद पवार यांचे नाव हमखास येते. ज्येष्ठ काँग्रेस नेते दादा जाधवराव यांच्या विरोधातील प्रचारात बोलताना शरद पवार यांनी जाधवरावांची तुलना म्हाताऱ्या बैलासोबत केली होती. त्यांना राजकारणातून निवृत्त करावे, असा संदेश त्या मतदारसंघातील मतदारांस देण्याकरिता पवार यांनी हा, शेतकऱ्यास सहज समजेल असा दृष्टान्त देणारा वाक्प्रचार खुबीने वापरला होता. दादा जाधवराव तेव्हा सत्तरीच्या उंबरठ्यावर होते आणि पवार यांनी त्यांची म्हाताऱ्या बैलासोबत तुलना केली होती. काळाचे चक्र पुढे सरकून पुन्हा त्याच टप्प्यावर आले आणि वयाच्या ८४ व्या वर्षी निवडणुकीच्या राजकारणात नव्याने शड्डू ठोकून उतरताना शरद पवार यांना म्हातारपणाचा दाखला द्यावा लागला. मी अजून म्हातारा झालो नाही, असे बजावण्यापासून, महाराष्ट्राला रुळावर आणल्याखेरीज हा म्हातारा स्वस्थ बसणार नाही, असा निग्रही बाणा त्यांना दाखवावा लागला. तेव्हा त्यांच्याच पक्षातील आणि त्या पक्षातून बाहेर पडलेल्या अनेकांस २० वर्षांपूर्वीच्या त्यांच्या त्या वाक्याची नक्कीच आठवण झाली असेल. पवार जे बोलतात त्याच्या नेमके उलटे करतात आणि त्यांना जे करावयाचे असते, त्याबद्दल ते कधीच बोलत नाहीत, असेही म्हटले जायचे. म्हणजे शरद पवार यांचे राजकारण काहीसे अनाकलनीय आहे, असे त्यांचे सच्चे पाठीराखेदेखील म्हणत. म्हणूनच त्यांच्या राजकारणाचे धडे गिरवून त्यांचे शिष्यत्व पत्करण्याकरिता अनेक जण त्यांच्या पुढेमागे करीत असत, हेही महाराष्ट्राने पाहिले आहे. उमेदीच्या काळात शरद पवार यांनी महाराष्ट्राच्या राजकारणास आपल्या दीर्घ अनुभवाच्या आधारावर एक कानमंत्रही दिला होता. भाकरी फिरविली नाही तर ती करपते, हा त्यांचा आवडता राजकीय सिद्धान्त होता. आता म्हातारा बैल आणि करपलेली भाकरी यांचे राजकीय संदर्भ लक्षात घेतले, तर काळाचे चक्र फिरून पुन्हा त्याच टप्प्यावर आले आहे, याविषयी कोणाच्याही मनात दुमत असणार नाही.

काळाच्या या चक्राची गती अलिकडे वेगवान झाली आहे. सुमारे १० वर्षांपूर्वी २०१४ च्या निवडणुकांच्या काळात शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या प्रगतीचे आणि सर्व क्षेत्रांतील आघाडीचे संपूर्ण श्रेय आपल्याकडे घेतले होते. 'ठोस निर्णय, ठाम कृती' ही राष्ट्रवादीची नीती आहे आणि तीच महाराष्ट्राची ताकद आहे, असा दावा करणाऱ्या जाहिरातींनी मुद्रित माध्यमांचे रकाने भरून गेले होते. आज शरद पवार यांच्यासोबत नसलेल्या व महायुती सरकारमध्ये दाखल झालेल्या नेत्यांपैकी अनेक नेत्यांची छायाचित्रेही त्या जाहिरातीत झळकली होती. राष्ट्रवादी काँग्रेसचे धोरण हे महाराष्ट्राच्या प्रगतीचे कारण आहे, असा दावा करणाऱ्या त्या जाहिराती आता काळाच्या चक्राबरोबर मागे गेल्या आहेत आणि 'ठोस निर्णय, ठाम कृती'चे नवे उदाहरण म्हणून अजित पवार यांच्या गटाकडे महाराष्ट्र पाहात आहे. शरद पवार यांच्या मुरब्बी राजकारणाची सद्दी आता संपत चालली असून, शरद पवार नावाच्या एका राजकीय पर्वाच्या अखेरीचा प्रारंभ सुरू झाल्याचे राजकारणात बोलले जाऊ लागले आहे. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला मिळालेल्या घवघवीत यशामुळे गाफील राहिल्याचा मोठा फटका पराभवाच्या रूपाने शरद पवार यांच्या पक्षासह संपूर्ण इंडिया आघाडीलाच बसल्यानंतर कालपरवा शरद पवार यांच्या गटाने मुंबईत घेतलेल्या आढावा बैठकीतील सूर पाहता, आता नव्या उमेदीने उभारी घ्यावी, असा काही आधार या गटाच्या हाती उरलाच नाही किंवा कसे, असे वाटण्याजोगी परिस्थिती दिसू लागली आहे. पक्षातील अभूतपूर्व फुटीनंतर लागलेली गळती हे त्याचे मुख्य कारण आहे, यात शंका नाही. आढावा बैठकीच्या निमित्ताने उपस्थित असलेले नेतेदेखील यापुढच्या काळात शरद पवार यांच्यासोबत राहतील किंवा नाही, याची खात्री खुद्द पक्षश्रेष्ठींनाही राहिलेली नाही, हेदेखील या निमित्ताने स्पष्ट झाले. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या वक्तव्यात हाच सूर उमटलेला दिसतो. बैठकीच्या निमित्ताने समोर बसलेल्यांपैकी अनेक जण तिकडे जाऊन हार-गुच्छ देऊन आलेले आहेत; त्यांना तिकडे म्हणजे अजित पवार यांच्या गटात जावयाचे असेल, तर त्यांनी खुशाल जावे, असा थेट सल्लाच जयंत पाटील यांनी दिल्याने, शरद पवार यांच्यासोबतच्या शिल्लक नेत्यांना आपले राजकीय भवितव्य घडविण्यासाठी योग्य मार्ग निवडण्याची मुभाच दिली गेली आहे, असेही स्पष्ट झाले. विधानसभा निवडणुकीत पक्षाला महाराष्ट्रात जेमतेम १० जागांवर विजय मिळविता आला, ही स्थिती पक्षाच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह उमटविणारी आहे, असा अप्रत्यक्ष संकेतही जयंत पाटील यांनी दिला. पक्षाची स्थिती याहून अधिक वाईट काय होणार, हा त्यांचा उद्विग्न सवाल पक्षाच्या भवितव्याची चिंता व्यक्त करणारा आहे.

शरद पवार यांच्या गटाच्या आढावा बैठकीतील हा निराशेचा सूर पाहता, त्यांच्या जुन्या राजकीय सिद्धांताची आठवण होणे साहजिक वाटते. भाकरी फिरविली नाही तर ती करपते, हे त्यांचे वाक्य आज पक्षाच्या सद्यस्थितीच्या संदर्भात नव्याने विचारात घेणे गरजेचे आहे. शरद पवार यांचा पक्ष ज्या कारणामुळे फुटला आणि अनेक निष्ठावंतांनी शरद पवार यांचे बोट सोडून अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील गटात प्रवेश केला, ते पाहता, या सिद्धान्ताची प्रचीती येते. भाकरी न फिरविता नेतृत्वाची सारी सूत्रे एका हातात एकवटलेली राहावी, यासाठी धडपड सुरू झाल्याच्या संशयातूनच अजित पवार यांनी पक्षातून बाहेर पडण्याचा मार्ग निवडला होता, हे आता गुपित राहिले नाही. शरद पवार यांचे वय झाले आहे, त्यांनी निवृत्तीचा मार्ग स्वीकारावा आणि नव्या नेतृत्वास संधी देऊन मार्गदर्शकाची भूमिका वठवावी, असे अजित पवार यांनी पक्षाबाहेर पडताना स्पष्ट केले होते. हीदेखील शरद पवार यांचीच राजकीय शिकवण असल्याचे आज अनेकांस पटले आहे. बैल म्हातारा झाला की त्याला बाजार दाखवायचा असतो, असे सांगणारे पवार स्वतः आज वयाच्या या टप्प्यावर राजकारणात सक्रिय आहेत. समाजाची स्मृती अल्पजीवी असते, असे म्हणतात. राजकारणाचा यावर ठाम विश्वासही असतो. तरीही काही घडामोडी, काही वक्तव्ये आणि काही नेते वेगवेगळ्या कारणांमुळे समाजाच्या कायमचे स्मरणात राहिलेलेच असतात. शरद पवार यांच्या गटात आज जे काही सुरू आहे, ते पाहता, विस्मृतीत गेलेल्या गोष्टीदेखील ताज्या होऊन पुन्हा आठवू लागतील, अशा टप्प्यावर काळाच्या चक्रानेच आणून ठेवल्या आहेत. शरद पवार यांच्या गटातील काही खासदार, आमदार व नेते अजित पवार यांच्या गटात दाखल होण्यासाठी आपला गाशा गुंडाळून तयार आहेत, अशी जोरदार चर्चा आणि ज्यांना जायचे आहे त्यांनी जावे, हा शरद पवार गटाच्या प्रदेशाध्यक्षांचा थेट इशारा या दोन बाबींची सांगड घातल्यास या भीतीची उकल होऊ शकते. असे काही घडू लागले की, पुन्हा एकदा निष्ठावंतांच्या गोटात शरद पवार यांच्या राजकारणातील अनाकलनीयतेची चर्चाही होऊ लागते. या गटाचे राजकीय भवितव्य आता अनिश्चित असल्यामुळे त्यांच्यासोबतच्या अनेक नेत्यांना आपल्या राजकीय भविष्याची आणि राजकीय अस्तित्वाची काळजी लागून राहिली असावी, असे बोलले जात आहे. शरद पवार यांनी आपल्या निष्ठावंतांची ही स्थिती ओळखली असावी आणि त्यांना त्यांचे भवितव्य घडविण्याच्या संधींची दारे खुली करण्याचा निर्णय घेतला असावा, अशीही चर्चा आहे. तसेच घडले, तर शरद पवार यांच्या अनाकलनीय राजकारणाची उकल करणे आता कोणासही अवघड राहिलेले नाही, हेच स्पष्ट होईल.

## दखल

# संगमावरील अपूर्व मेळा

**मधुरा कुलकर्णी**

नदीच्या काठाने जन्म घेतलेल्या मानवाने पुढे आपली संस्कृती आणि सभ्यताही प्रवाहाच्या साक्षीनेच वाहती ठेवली. काळागणती तिच्यात अनेक गोष्टींची भर पडत गेली. समाज बदलला. जगण्यात नवनवीन प्रवाह मिसळत गेले, आजही पूर्वापार असणाऱ्या परंपरा जपल्या जातात. किंबहुना नव्या झळाळीने, श्रद्धा, भक्तिपूर्वक त्यांचे पालन होताना दिसते. महाकुंभमेळा त्यातीलच एक. यंदा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारीदरम्यान आयोजित होणाऱ्या महाकुंभ मेळ्याकडे भारतवासीयांचेच नव्हे, तर समस्त जगाचे लक्ष लागले आहे. या निमित्ताने प्रचंड मोठ्या संख्येने एकत्र येणारे साधू-महंत, आखाड्यांमधील पूजक आणि भाविकांना पाहणे, शाही स्नानाचा आनंद घेणे, त्यांच्या वेगळ्या आणि आध्यात्मिक जगाचा परिचय करून घेत अभ्यास करणे हा जगासाठी औत्सुक्याचा विषय ठरतो आहे. त्यामुळेच महाकुंभाचे पर्व अनुभवण्यासाठी येणाऱ्या देशी-परदेशी लोकांची संख्या दरवर्षी वाढते आहे. आताही भाविकांना, अभ्यासकांना सामावून घेण्यासाठी तीर्थराज प्रयाग सज्ज असून परंपरेचे पाईक असणारा इथला समाज उच्च तंत्रज्ञानाचा हात धरून कसा पुढे जातो, खऱ्या अर्थाने नव्या-जुन्याचा संगम कसा साधतो याचे चित्र यानिमित्ताने जगापुढे साकारणार आहे.

महाकुंभ हे अमृतपुरुष भारताचे अनोखे स्वरूप आहे. या उत्सवाची पृष्ठभूमी पाहता इतिहास-पुराणांची अनेक प्राचीन पाने आपल्यासमोर उलगडतात. देवासुर, कद्रू-विनता यांच्यातील युद्ध आणि भगवान धन्वंतरीने दिलेल्या अमृत-कुंभाची प्राप्ती यासंबंधी अनेक रंजक कथांचे अध्याय कुंभाच्या कथांमध्ये आहेत. खरे तर महाकुंभ ही व्यक्तीच्या एकुणात एकात्मतेच्या विलक्षण अनुभवाची प्रयोगशाळा आहे. गंगा-यमुना-सरस्वतीचा संगम असणाऱ्या तीर्थक्षेत्र प्रयागराजमध्ये दर १२ वर्षांनी हा महान उत्सव होतो. आपल्या धार्मिक-पौराणिक भूगोलाची पवित्र भूमी असण्याबरोबरच तो आपल्या आध्यात्मिक सांस्कृतिक काळ-चेतनेचा चिरंतन पुरावाही आहे. यामध्ये आपल्याला ऋषी परंपरेने प्रेरित असणारा भारत पाहण्याची, अनुभवण्याची संधी मिळते. कुंभमेळ्यामध्ये आपण अखंड परंपरा पाहतो. प्रख्यात आचार्य, जगद्‍गुरू, महामंडलेश्वर आणि सर्व परंपरांचे संत-महंत येथे जमतात. त्यामुळेच पौराणिक महानता, आध्यात्मिक अनुभव, ऐतिहासिक वैभव, सांस्कृतिक दिव्यता आणि भौगोलिक भव्यता या सगळ्याची जोड २०२५ च्या महाकुंभाला मिळत आहे. हा योग भारताच्या स्वातंत्र्याचा अमृतकाळात येत असल्याने अधिक महत्त्वपूर्ण आहे.

अयोध्येच्या राम मंदिरात रामललाची प्रतिष्ठापना झाल्यानंतरचा पहिला महाकुंभ असल्यामुळेही याला विशेष महत्त्व आहे. थोडक्यात, महाकुंभ हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे जिवंत स्मारक आहे, असेही म्हणता येईल. त्रिवेणी नदीच्या काठावर महाकुंभ आयोजित केला जातो. त्याच ठिकाणी त्रेतामध्ये रामाने लोककल्याणासाठी वनयात्रेची सुरुवात केली होती. तिच्या काठावर, प्रेममूर्ती भरत यांनी पुरुषार्थ चतुष्टयाचा त्याग केला आणि भक्तीची विनंती केली. त्यामुळेच प्रयाग हे आपल्या सांस्कृतिक अस्मितेचे चिरंतन स्थान आहे. अयोध्या, मथुरा, काशी, हरिद्वार, केदारनाथ, विंध्याचल यासह भारतातील दिव्य तीर्थक्षेत्रे त्यांच्या आध्यात्मिक वैभवात पुनर्संचयित केली जात आहेत. त्यामुळे महाकुंभ एकात्मिक दृष्टी, समन्वित प्रयत्न आणि पूर्ण सहकार्याचा पुरावा ठरेल.

यंदाचा महाकुंभ धार्मिक दृष्टीनेच नाही, तर आर्थिक उलाढालीचेही मोठे केंद्र आहे. त्यामुळेच तब्बल ५६ दिवस चालणारा हा कार्यक्रम केवळ धार्मिक दृष्टिकोनातूनच नव्हे तर आर्थिक आणि व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातूनही एक अद्वितीय उदाहरण असल्याचे जाणून घ्यावे लागेल. महाकुंभच्या आयोजनासाठी राज्य सरकारने ५ हजार ४३५ कोटी ६८ लाख रुपयांचे मोठे बजेट ठेवले आहे. २०१९ मध्ये झालेल्या कुंभमेळ्याच्या ४,२०० कोटी रुपयांच्या बजेटपेक्षा हे खूप जास्त आहे. या कार्यक्रमासाठी सुमारे ७,५०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या रकमेत केंद्र सरकारच्या योगदानाचाही समावेश आहे. या वेळी केंद्राने २,१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महाकुंभ कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ४२१ प्रकल्पांवर काम सुरू आहे. त्यापैकी ३,४६१.९९ कोटी रुपयांच्या योजनांना आधीच मान्यता देण्यात आली आहे. यामध्ये पायाभूत सुविधांचा विकास, वाहतूक व्यवस्था, सुरक्षा आणि स्वच्छतेपासून भाविकांसाठी सुविधांच्या व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक बाबींचा समावेश आहे. एकूणच महाकुंभाचे बजेट वाढले आहे. १८८२ मध्ये महाकुंभावर केवळ २० हजार २८८ रुपये खर्च झाले होते. त्या वेळी मौनी अमावास्येला सुमारे आठ लाख लोकांनी महाकुंभात स्नान केले होते. तेव्हा भारताची एकूण लोकसंख्या २२.५ कोटी होती. १८९४ च्या कुंभमेळ्यावेळी भारताची लोकसंख्या २३ कोटी झाली आणि सुमारे १० लाख भाविकांनी कुंभात स्नान केले. या कार्यक्रमासाठी ६९,४२७ रुपये खर्च करण्यात आले होते. १९१८ च्या महाकुंभात संगमावर स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ३० लाखांवर गेली. त्याचे बजेट १.३७ लाख रुपये होते.

काळानुरूप केवळ भाविकांचीच संख्या वाढली नाही तर कार्यक्रमाचे बजेट आणि व्यवस्थेची पातळीही वाढल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होते. अर्थातच हा सरकारी खर्च झाला. त्यापेक्षा सुमारे २० पट जास्त उलाढाल होत असते, हेदेखील विचारात घ्यायला हवे. आता या धार्मिक-आध्यात्मिक सोहळ्याला प्रगत तंत्रज्ञानाची साथ मिळाली आहे. भाविकांसाठी उत्तम स्वच्छता, सुरक्षित स्नान घाट, राहण्याची तात्पुरती व्यवस्था, वैद्यकीय सुविधा, वाहतूक व्यवस्था या सगळ्यामध्ये त्याचे दर्शन घडते. महाकुंभाला येणाऱ्या कोट्यवधी भाविकांसाठी संगमाजवळ आधुनिक सुविधांनी सुसज्ज टेंट सिटी उभारण्यात आली आहे. वीज, पाणी आणि स्वच्छता या सगळ्यासाठीच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. शिवाय ड्रोन आणि सीसीटीव्हीच्या माध्यमातून मेळ्यावर लक्ष ठेवले जात आहे. महाकुंभ हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून प्रादेशिक आणि राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला मोठी चालना देतो. या कार्यक्रमामुळे पर्यटन, वाहतूक, खाद्य आणि पेय व्यवसाय, हॉटेल्स, लॉजिंग आणि स्थानिक हस्तकला उद्योगांना प्रचंड फायदा होतो. महाकुंभ २०२५ दरम्यान छोटे-मोठे दुकानदार, टॅक्सी आणि रिक्षाचालक, मार्गदर्शक, स्थानिक कारागीर यांच्या उत्पन्नात मोठी वाढ होणार आहे. अर्थात एवढा प्रचंड समुदाय एकत्र येत असल्यामुळे काही आव्हानेही उभी ठाकली आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर गर्दीचे व्यवस्थापन करणे, संसर्गजन्य आजाराची भीती वाढत असताना सार्वजनिक स्वच्छता राखणे, वीज आणि पाणी पुरवठा सुनिश्चित करणे, भाविकांची सुरक्षा हे विषय प्राधान्याने समोर येणारे आहेत.

नियोजनासाठी प्रशासनाने शेकडो पथके तयार केली आहेत. कुंभकाळात आरोग्य सेवाही मोठ्या प्रमाणात बळकट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत करता येईल. महाकुंभमध्ये उपचारांसाठी ६ हजार खाटा, १२५ रुग्णवाहिका आणि अशाच हाय-टेक आरोग्य सुविधा तयार आहेत. शेवटी महाकुंभ केवळ आर्थिक आणि प्रशासकीय दृष्टिकोनातूनच महत्त्वाचा नाही, तर त्यात भारताच्या समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरांचेही प्रतिबिंब आहे. हा भारताची प्राचीन संस्कृती आणि आधुनिकतेचा संगम असणारा उत्सव आहे. भारत आपला सांस्कृतिक वारसा कसा जिवंत ठेवतो आणि आधुनिकतेची जोड देऊन नव्या रूपात कशी सादर करतो, याचे जगाला औत्सुक्य आहे. महाकुंभ केवळ भाविकांनाच नाही, तर जगाला संदेश देणारा आहे. त्यामुळे तो उत्तम प्रकारे पार पाडण्याची जबाबदारी प्रत्येक भारतीयाने ओळखायला हवी.

## वेध

**संजय रामगिरवार**

# वाघ खेळण्याची गोष्ट नाही!

वाघ समोर उभा ठाकला की बोबडी वळते अशी माणसंही वाघ अडचणीस दिसला की त्याचा खेळ करतात, तेव्हा कमाल वाटते. लाखांदूर तालुक्यातील तई बु. गावालगतच्या झुडपात अडकून पडलेल्या वाघाला काही तरुणांनी दगड मारले तर काहींनी त्याच्यासोबत सेल्फी काढण्याची हिंमत केली. तो अचानक सापळ्यातून सुटला असता तर या लोकांचे काय झाले असते, याची कल्पना करून बघा! परवा उमरेड येथे पर्यटनादरम्यान वाघ व बछड्यांच्या समांतर जिप्सी गाड्या ठेवून त्यांचा मार्गच अडवण्याचा प्रकार झाला. छायाचित्र आणि चित्रफीत काढण्याच्या नादात आपण वाघाशी खेळ करतो आहे, हेही पर्यटक विसरतात. एवढेच नव्हे, तर ज्यांना अशा प्रसंगी कसे वागावे याचे प्रशिक्षण दिले असते ते जिप्सीचालक व मार्गदर्शकही या गैरप्रकाराचा आनंद घेतात, तेव्हा एकूण यंत्रणेच्याच संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. वाघाचे मार्ग अडवल्याचा प्रकार ताडोबासह अन्य व्याघ्र प्रकल्पांतूनही झाला आहे. थातूरमातूर कारवाईपलीकडे पुढे काहीच होत नाही आणि या प्रकाराची पुनरावृत्ती होतच राहते, हे दुर्दैव!

६ जानेवारी रोजी भंडारा जिल्ह्यातील तुमसर तालुक्यात झंझेरिया गावाजवळ एका वाघिणीचे चार तुकडे आढळले. याप्रकरणी तीन आरोपींना अटक झाली. विद्युत प्रवाह सोडलेल्या कुंपणात अडकून या वाघिणीचा मृत्यू झाला होता. त्यातून बाहेर काढण्यासाठी तिचे चार तुकडे केले गेले. चंद्रपूर जिल्ह्यातही असे प्रकार घडले आहेत. मानव-वन्यजीव संघर्ष आता जणू पाचवीलाच पूजला आहे. जेथे जंगल आणि वाघ तेथे मानवाशी संघर्ष अटळ आहे.




चंद्रपुरात सध्या सुरू असलेल्या 'वाईल्ड कॉन-२०२५' या दोन दिवसीय परिषदेचादेखील हाच ऐरणीवरील विषय आहे. 'संरक्षित क्षेत्रांच्या बाहेरील वन्यप्राण्यांच्या मुबलक संख्येवर नियंत्रणासाठी अभिनव आणि संवेदनशील उपाययोजना' या विषयावर भारतातील ही पहिली परिषद आहे. या परिषदेतील तज्ज्ञांच्या मंथनातून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचा मार्ग निघेल, अशी आशा राज्याचे नवनियुक्त वनमंत्री गणेश नाईक यांनी व्यक्त केली आहे. हा संघर्ष अगदी पुराणकालीन असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. ऋषिमुनींच्या आश्रमात आधी वाघांचा मुक्तसंचार होता. तेव्हा कोणते तंत्रज्ञान होते, याचा शोध घेतला पाहिजे, असेही ते गमतीने ते बोलले.

पण अशा परिषदा आणि संमेलनांतून या गंभीर समस्येचा मार्ग अद्याप तरी सापडला नाही. प्रत्यक्ष कृतीशिवाय तो सापडणारही नाही. मध्यंतरी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात याविषयी गावकऱ्यांना अलर्ट करणारे तंत्रज्ञान वापरले गेले, ज्याचे कौतुक देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले होते. पण याही पद्धतीचा किती लाभ झाला, याची आकडेवारी वनविभागाने अद्याप जाहीर केली नाही. वाघांनी मानवाच्या नरडीचा घोट घेतल्याच्या बातम्या शेकडोने प्रकाशित होतात. सोबतच विद्युत प्रवाह सोडलेल्या शेतशिवाराच्या कुंपणाला अडकून वाघाच्या मृत्यूच्या बातम्याही कमी नाहीत. कातडी व नखांसाठी शिकार अधूनमधून होत असते. याचाच अर्थ माणसं आणि वाघही प्रसंगी एकमेकांच्या जीवावर उठले असते. मागील काही दिवसांमध्ये तर हा प्रकार मोठ्या प्रमाणात पुढे येत आहे. विदर्भात तर तो जरा जास्तच आहे. यावर गंभीरतेने ठोस पाऊल उचलले जावे, याची गरज असतानाच चंद्रपुरात ही परिषद झाली. त्यातून काही होईल का, याची शाश्वती देता येत नसली तरी एक प्रयोग म्हणून त्याकडे पाहायला हरकत नाही.

गेली काही वर्षे वनमंत्री म्हणून सुधीर मुनगंटीवार यांनी हे प्रकरण संवेदनशीलपणे हाताळले. वाघ किंवा हिंस्र प्राण्यांच्या हल्ल्यात ज्यांचा जीव गेला त्यांच्या कुटुंबीयांना पुरेशी मदत मिळावी म्हणून त्यांनी त्या रकमेत मोठी वाढ केली. मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापरासाठी वनाधिकाऱ्यांना त्यांनी प्रोत्साहित केले. गावकऱ्यांना अलर्ट करण्याची योजना ही त्यांच्याच कार्यकाळात राबविली गेली. आपण जंगलात घुसलो की वन्यप्राणी गावात हा संशोधनाचा विषय असला, तरी वन्यप्राण्यांची तसेच माणसांचीही संख्या वाढली आणि जमीन मात्र मर्यादितच राहिली हे मानव-वन्यजीव संघर्षाचे मुख्य कारण आहे, असा नव्या वनमंत्र्यांचा निष्कर्ष आहे आणि चंद्रपूरच्या या परिषदेतूनच त्याचा मार्ग सापडेल, अशी त्यांनी व्यक्त केलेली आशा खरी ठरो आणि ही समस्या मिटो, अशी प्रार्थना आपण करू या....

९८८१७१७८३२


## प्रासंगिक

# भविष्यातला 'पोलाद पुरुष' देवाभाऊ

**मोरेश्वर बडगे**

देवेंद्र फडणवीस. राज्याचे मुख्यमंत्री. कुणी यांना 'चाणक्य' म्हणतं तर कुणी 'देवाभाऊ.' फडणवीस स्वतःला 'आधुनिक अभिमन्यू' म्हणतात. तब्बल पाच वर्षे महाविकास आघाडीने लावलेल्या चक्रव्यूहातून सहीसलामत बाहेर पडताना फडणवीस यांनी महाराष्ट्राला प्रचंड बहुमताचे महायुतीचे सरकार दिले. फडणवीसांच्या या कर्तबगारीने हतबल झालेले विरोधकही आता त्यांची आरती गाऊ लागले आहेत. फार मागे जायची गरज नाही. गेल्या सहा महिन्यातले दिवस आठवा. फडणवीस यांच्यावर हल्लाबोल केल्याशिवाय विरोधकांचा दिवस मावळत नव्हता. 'फडतूस', 'टरबुजा', 'तू राहशील किंवा मी' अशा शब्दात ललकारणाऱ्या 'शिल्लक शिवसेने'च्या सुप्रीमो उद्धव ठाकरे यांनी नागपूर अधिवेशनात फडणवीसांना भेटून पुष्पगुच्छांसह शुभेच्छा दिल्या तेव्हा शरद पवारांनीही स्वतःला चिमटे काढले असतील. 'सामना' या ठाकरे यांच्या दैनिक मुखपत्रानेही फडणवीसांची प्रशंसा करणारा अग्रलेख लिहिला. कालपर्यंत फडणवीसांवर तुटून पडणारे आज संक्रांतीपूर्वीच तीळगूळ का वाटत सुटले आहेत? फडणवीस बदला घेतील असे त्यांना वाटत असावे; मात्र 'आपण त्यांना माफ केलं, हाच आपला बदला' असे जाहीरपणे सांगून फडणवीसांनी प्रतिस्पर्ध्यांना निश्चिंत केले आहे. उद्धवसेनाच नव्हे तर सुप्रिया सुळे म्हणजे शरदसेनाही फडणवीस यांच्याशी जुळवून घेऊ पाहत आहे.

फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री झाले आहेत. या टर्ममध्ये नववर्षाची सुरुवात फडणवीसांनी गडचिरोलीला भेट देऊन केली. गडचिरोली म्हटले की, सामान्यांच्या मनात धडकी भरते. कारण नक्षलवादी जिल्हा म्हणून त्याची ओळख. सरकारी अधिकाऱ्यांच्या शब्दकोशात गडचिरोलीला बदली म्हणजे काळ्या पाण्याची शिक्षा. आज ती स्थिती नाही. नक्षलवादाचा उपद्रव तेथे जवळपास आटोक्यात आला आहे. फडणवीस तिकडे गेले त्या दिवशी ११ नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केले. पण फडणवीसांच्या दौऱ्याची देशभर चर्चा आहे ती त्यांनी या मागास जिल्ह्याला आपल्या अजेंड्यावर घेतल्याची. गडचिरोली जिल्ह्याला देशाची 'पोलाद राजधानी' बनवण्याचे व्हिजन फडणवीसांनी १० वर्षांपूर्वी पाहिले. त्या स्वप्नाला वेग देण्याचे त्यांनी योजिले आहे. या जिल्ह्यात भरपूर खनिज संपत्ती आहे. 'स्टील सिटी' म्हणजे 'पोलाद शहर' म्हटले की, आपल्याला झारखंडमधील जमशेदपूर आठवते. जमशेदपूरलाही मागे टाकेल एवढी क्षमता गडचिरोली जिल्ह्यात आहे. तेथे खनिज काढण्याचे खूप प्रयत्न झाले. पण नक्षलवादी तोडफोड करायचे. त्यात अनेकांचे जीव गेले. उद्योगपती तेथून खनिज काढायचे. मात्र उद्योग इतरत्र करायचे. त्याला तिथल्या लोकांचा विरोध होता. फडणवीसांनी सूत्रबद्ध नियोजन केले. गडचिरोलीचा वापर वसाहतीसारखा करायचा नाही, इथल्या या भागातच उद्योग काढायचा, असा शब्द उद्योगपतींकडून घेतला. त्यांना पोलिसांचे भक्कम संरक्षण दिले. स्थानिकांना विश्वासात घेतले. त्याचे चांगले रिझल्ट्स मिळताहेत. या जिल्ह्यात नजीकच्या भविष्यात एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होत आहे. ७७ वर्षांत प्रथमच या भागात बस धावली. भयमुक्त गडचिरोलीचे टार्गेट आहे. जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळावे यासाठी सध्या मंत्र्यांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. या पृष्ठभूमीवर फडणवीसांनी स्वतःहून गडचिरोलीचे पालकमंत्रिपद घेण्याची इच्छा बोलून दाखवली आहे. तुम्ही लिहून ठेवा, गडचिरोली हा भविष्यात महाराष्ट्राचा महत्त्वाचा पत्ता असेल. विदर्भाचा हा सुपुत्र भविष्यात 'स्टील मॅन' म्हणजे 'पोलाद पुरुष' म्हणून ओळखला जाईल.



फडणवीसांच्या विकासाच्या संकल्पना स्पष्ट आहेत. वेगळे राज्य मागून विकास होणार नाही. त्यासाठी विकासाची कास धरावी लागेल, नवनवी गुंतवणूक आणावी लागेल हा मूलमंत्र आहे. राज्यात पायाभूत सुविधांचा वेगाने विकास केला जात आहे. समृद्धी महामार्गासह राज्यातील पायाभूत सुविधांचे जाळे मजबूत करण्यावर फडणवीस लक्ष केंद्रित करीत आहेत. वर्षानुवर्षे रेंगाळलेले रस्ते, प्रकल्प मार्गी लावले जात आहेत. वाढवण बंदर पालघर जिल्ह्यात आहे. वाढवण बंदराचा प्रकल्प ३५ वर्षे जुना आहे. फडणवीसांनी हा प्रकल्प मार्गी लावला. मुंबईच्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टपेक्षा वाढवण बंदराची क्षमता तिप्पट आहे. ७६ हजार कोटी रुपयांचा हा प्रकल्प झाला तर या बंदराच्या साहाय्याने महाराष्ट्राचे राज्य सर्वात पुढारलेले राज्य बनू शकते. राज्यातले प्रकल्प गुजरातला गेले याची खूप चर्चा होते. पण राज्यात किती प्रकल्प आले, याची चर्चा होत नाही. गेल्या अडीच वर्षांत महाराष्ट्रात २२१ मोठे प्रकल्प आले आहेत. साडेतीन लाख कोटी ही गुंतवणूक असून दोन लाख रोजगार निर्माण झाले आहेत. पूर्वी मुंबई, पुणे इथेच उद्योग यायचे. आता संभाजीनगर, जालना, अमरावती ही शहरेही उद्योगपतींना आकर्षित करू लागली आहेत. अमरावतीत टेक्स्टाईल पार्क टेक ऑफ घेतो आहे. जालन्याला ड्राय पोर्ट येत आहे. कृषी सौर वाहिनी हा देशातला अभिनव प्रकल्प येत्या दोन वर्षांत पूर्ण टार्गेट आहे. तो झाला तर १६ हजार मेगावॅट वीजनिर्मिती क्षमता निर्माण होईल. मेट्रो प्रकल्प, बुलेट ट्रेन या सारख्या प्रकल्पांमुळे महानगरांना मोकळा श्वास घेता येणार आहे. 'लाडक्या बहिणी'सारख्या योजनांमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण येईल, अशी काहींना भीती आहे. पण फडणवीसांना बजेट छान कळते. केवळ आकड्यांची जादूगिरी न करता राज्याचे उत्पन्न कसे वाढेल, यावरही त्यांचा भर दिसेल. कुठल्याही मुख्यमंत्र्याला अधिकाऱ्यांच्या जोरावरच काम दाखवता येते. त्यांनी हाताशी चारित्र्यसंपन्न अधिकारी हेरून घेतले आहेत. मंत्र्यांचे पीए तसेच इतर अधिकारी यांना तावूनसुलाखून सेवेत घेतले जात आहे. महाराष्ट्रात हे प्रथमच घडत आहे. आतापर्यंत मंत्री आपापल्या आवडीचे पीए म्हणून घेत. आता या भरतीवरही मुख्यमंत्र्यांचे लक्ष आहे. २०१४ फडणवीस पहिल्यांदा मुख्यमंत्री झाले तेव्हा त्यांना कसे जमणार? असे बोलले गेले. पण मंत्रिपदाच्या कामाचा अनुभव नसताना त्यांनी आपली क्षमता सिद्ध केली. शरद पवार चार वेळा मुख्यमंत्री होते. पण त्यांनाही सलग पूर्ण पाच वर्षे मुख्यमंत्री राहता आले नाही. प्रशासकीय कौशल्याच्या जोरावर फडणवीसांनी हे कसब दाखवले. सर्वांना सोबत घेऊन काम करण्याचा त्यांचा पिंड आहे. त्यामुळे एकनाथ शिंदे आणि अजितदादा पवार या महायुतीमधील घटक पक्षाच्या नेत्यांशी त्यांचे छान ट्युनिंग आहे. सर्वात मोठा गुण म्हणजे सत्याशी तडजोड त्यांना जमत नाही. त्यामुळे कोणीही त्यांना मॅनेज करू शकत नाही. १० वर्षांत त्यांच्यावर एकही आरोप झाला नाही. 'मिस्टर क्लीन' या प्रतिमेच्या बळावर महाराष्ट्र नवी उत्तुंग झेप घ्यायला तयार झाला आहे.

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.) ९८५०३०४१२३

### सरकारी कार्यालयांतील सुविधा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय कर्मचाऱ्यांसाठी आचारसंहिता नुकत्याच जाहीर केल्या, त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. इंग्रजीमध्ये सरकारी कर्मचाऱ्यांना 'पब्लिक सर्व्हंट' (जनतेचे सेवक) म्हणतात. प्रत्यक्षात त्यांचे कार्यालयात वर्तन 'जनतेचे मास्टर' असेच असते. कार्यालयात उशिरा येऊन लवकर जाणे, सहकाऱ्यांशी गप्पा मारणे, चहा टपरीवर सतत जाणे, कामाकरिता आलेल्यांकडे दुर्लक्ष करणे असे सर्रास पाहायला मिळते. जनतासुद्धा 'चलता है' समजून या वाईट प्रथांकडे दुर्लक्ष करते. बरेचदा संबंधित कर्मचारी सुट्टीवर असेल तर त्याचे काम दुसरा कर्मचारी करत नाही, 'साहेब सुट्टीवर आहेत, नंतर या' असे सांगून सरळ बोळवण करतात. खरे म्हणजे असे जनतेशी वागणे, गुन्हा समजून वरिष्ठावर कारवाई व्हायला पाहिजे. कार्यालयात गरजू व वरिष्ठ नागरिकांना बसायचे सोय असावी, कार्यालयात मार्गदर्शक कर्मचारी असावा; जेणेकरून लोकांचा वेळ वाचेल व त्यांची गैरसोय होणार नाही. आपल्या महाराष्ट्र राज्याचा जर जलद विकास करायचा असेल वरील साध्या आचारसंहिता प्रगत देशांप्रमाणे लागू होणे व आळशी कर्मचाऱ्यांवर अंकुश असणे गरजेचे आहे.

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

● ● ● ●

### मतदान केंद्रांवर सुविधांमध्ये सुधारणा आवश्यक

महाराष्ट्रात नुकत्याच विधानसभा निवडणुका झाल्यात. नागपूर जिल्ह्यात जास्तीत जास्त मतदान व्हावे व ते शांततेत व्हावे या दृष्टीने प्रशासनाने योग्य कार्य केले त्याबद्दल नागपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचे अभिनंदन. मतदान केंद्रांवर येणाऱ्या मतदारांना कोणतीही गैरसोय होऊ नये याकरिता प्रशासनाने प्रयत्न केले, परंतु काही महत्त्वाच्या बाबींकडे दुर्लक्ष झाल्याचे जाणवले. नागपूर शहरातील दक्षिण-पश्चिम मतदारसंघातील मतदार केंद्र क्रमांक २३७, प्रगती हायस्कूल येथे मला काही त्रुटी आढळून आल्यात. मतदान झाल्यावर बाहेर जाण्याच्या दाराजवळ दिव्यांग लोकांकरिता पायऱ्याचे ठिकाणी सिमेंटचा स्लोप आहे. याचा उतार इतका जास्त आहे की, ज्येष्ठ व्यक्ती इथून बाहेर जाऊ शकत नाही. त्यामुळे खोलीच्या प्रवेशद्वारातूनच त्यांना बाहेर जावे लागते; परिणामतः तिथे गर्दी होऊन मतदान प्रक्रियेत अडथळा होतो. यावेळी मतदान केंद्रावर आत व बाहेर सीसीटीव्ही कॅमेरे व खोलीत एक एलईडी लाईट लावला होता. खोलीत प्रकाश चांगला होता, परंतु तो लाईट चुकीचे ठिकाणी लावला होता. त्यामुळे जिथे बॅलेट युनिट असते त्या कक्षात उजेड फार कमी होता. हिवाळ्याचे दिवसात लवकर अंधार होतो हे जाणून प्रशासनाने मतदान कक्षात पुरेसा प्रकाश राहील, याची खात्री करणे आवश्यक होते. परंतु ते न केल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांना बॅलेट युनिटवरील मतदार यांची नावे/चिन्हे शोधताना थोडा त्रास झाला. ज्याप्रमाणे प्रशासन जास्तीत जास्त लोकांनी मतदान करावे म्हणून प्रयत्नशील असते त्याचप्रमाणे प्रत्येक मतदाराचे मत त्याचे पसंतीचे ठिकाणी जावे याची प्रशासनाने दक्षता घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे. मतदार यादीची पडताळणी केल्यावर २५-२६ मृत मतदारांची नावे अजूनही यादीतून डिलीट केली नसल्याचे तसेच घर सोडून गेलेले मतदारांची नावे अजूनही यादीत असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे मतदान जास्त होऊनही ते कमी झाल्याचे दिसते व मतदारांची नावे डिलीट न केल्यामुळे नवीन मतदारांची घरापासून दूर असलेल्या मतदान केंद्रावर नोंद होते. आता काही दिवसांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत तेव्हा वरील त्रुटी राहू नये, ही अपेक्षा.

**मोहन पांडे**/नागपूर

● ● ● ●

## वाचक पत्रे

### यशस्वी जीवनासाठी स्वामी विवेकानंदांचे विचार

१२ जानेवारी हा 'राष्ट्रीय युवा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवशी स्वामी विवेकानंद यांची जयंती आहे. त्यांनी युवकांना आत्मसाक्षात्कार, देशप्रेम आणि परिश्रम यांवर भर देण्याचे आवाहन केले. त्यांच्या शिकवणीच्या आधारे, तरुण पिढीसमोर उभ्या असलेल्या समस्या आणि त्यावर उपाय याबाबत काही विचार मांडले आहेत, जे युवकांना सशक्त करण्यासाठी उपयुक्त ठरतात. हल्लीचे जीवन धकाधकीचे आहे, त्यातही स्वभावदोषांमुळेच अनेक समस्या निर्माण होतात, हे संशोधनातून सिद्ध झाले आहे. यावर मात करण्यासाठी स्वामी विवेकानंद सांगतात, मनुष्याचे मनच त्याच्या बंधनाचे आणि मोक्षाचे कारण आहे. व्यक्तिमत्त्वातील म्हणजेच स्वभावदोष हेच जीवनात अडथळे निर्माण करतात. त्यामुळेच ताणतणाव निर्माण होतो. परंतु आपण याच दोषांकडे दुर्लक्ष करतो. निर्मूलनासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे मनःशांती, समाधान आणि जीवनातील स्थिरता प्राप्त होऊन यशस्वी जीवन जगता येते. स्वामी विवेकानंदांच्या या विचारांना अनुसरून स्वभावदोष दूर करण्याचा प्रयत्न केल्यास जीवनात प्रत्येक टप्प्यात आनंद अनुभवता येईल.

**हृषीकेश हरदास**/वर्धा

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### ग्रामगीतेच्या माध्यमातून गावांचे परिवर्तन शक्य- डॉ.दिलीप शृंगारपुतळे

**परभणी,/प्रतिनिधी :** ग्रामगीता ही राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी समाजाला दिलेली मोठी देण आहे. ग्रामगीतेच्या माध्यमातूनच गावांचे परिवर्तन होऊ शकते, असे प्रतिपादन ग्रामगीतेचे अभ्यासक डॉ. दिलीप शृंगारपुतळे यांनी केले.

येथील चतुरंग प्रतिष्ठान परभणीच्या वतीने बुधवार ८ जानेवारी रोजी सारंग स्वामी विद्यालयात आयोजित केलेल्या शालेय व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी अध्यक्षपदी सारंग स्वामी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव धन्यकुमार शिवणकर तर प्रमुख उपस्थिती शाळेचे मुख्याध्यापक एन.व्ही. निलंगे, प्रा. कल्याण देशमुख यांची होती.

पुढे बोलतांना शृंगारपुतळे म्हणाले, समाजातील प्रत्योक समस्येवर ग्रामगीतेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी उपाय सुचवला आहे. जर प्रश्न आपण निर्माण केलेले असतील तर त्याची उत्तरेही समाज म्हणून आपल्या जवळच आहेत म्हणूनच ग्रामगीतेत शासन नावाचा एकही शब्द आढळून येत नाही. आपण सर्वांनी एकत्र येऊन या सर्व प्रश्नांवर उत्तरे शोधायची आहेत. ग्रामगीतेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे विचार अंगीकारल्यानेच गावांचे खरे परिवर्तन शक्य आहे, असे ते म्हणाले.

निकोप समाज निर्मितीसाठी शालेय विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार होणे गरजेचे आहे. यासाठी चतुरंग प्रतिष्ठानची ही व्याख्यानमाला अत्यांत उपयुक्त असल्याचे मत कार्यक्रमाचे अध्यक्ष धन्यकुमार शिवणकर यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन बी. एस. भिसे यांनी केले. या कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थी यांची उपस्थिती होती.

### बनावट खरेदीखत प्रकरणी गुन्हा दाखल करण्याचे आदेश

**मानवत,/प्रतिनिधी :** महामार्गालगत जमीन नसताना बनावट खरेदीखत करून फसवणूक केल्याप्रकरणी मानवत पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्याचे आदेश येथील न्यायालयाने दिले आहेत.

नागनाथ कचरू जंगाले यांनी ॲड. सुनिल जाधव यांच्यामार्फत न्यायालयात एक तक्रार दाखल केली. यात बाळासाहेब दत्तात्रय देशमुख यांनी स्वतःची जमीन ही महामार्गालगत नसताना खोट्या चतूर्सिमा दाखवत साजिद अली मोहम्मद ताहेर अन्सारी, साजिद अली अब्दुल सलाम बेलदार यांना खरबा येथील शेत गट नंबर ५० जमीन ११ डिसेंबर २०२३ रोजी खरेदीखत क्रमांक २२४०/२०२३ प्रमाणे खोटे खरेदीखत करून दिली. त्याा साक्षीदार म्हणून गोपाळ नारायण भिसे, मुस्तफा दादामियाँ शेख, ज्ञानोबा लक्ष्मण कच्छवे यांनी स्वाक्षरी केली. यामुळे सदर इसमांना ही जमीन हायवे लगत नसतानाही बनावट खरेदीखत करून दिले. त्याामुळे जंगाले यांची फसवणूक झाल्याने त्याांनी मानवत येथील न्यायालयात तक्रार दाखल केली. तसेच मानवत रेल्वे स्टेशनच्या उड्डाणपुलाचे काम झाल्यानंतर शासनाने अधिग्रहण केलेला पुरावा व बाळासाहेब तसेच त्याांच्या आईची जमीन हायवे लगत नसताना खोटे खरेदीखत करून दिले. अशाप्रकारचा ॲड. सुनील जाधव यांचा युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत आरोपींविरुध्द येथील ठाण्यात ६ जानेवारी रोजी गुन्हा नोंद करण्याचा आदेश दिला. फिर्यादीच्या वतीने ॲड. सुनील जाधव यांनी काम पाहिले, त्याांना ॲड. संजय हजारे, ॲड. भूषण मोकाशे, ॲड. श्याम कुन्हाडे यांनी सहकार्य केले.

### श्री तुळजाभवानी शुगर प्रा लि आडगाव दराडेचे- १ लाख मेट्रिक टन गाळप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** श्री तुळजाभवानी शुगर प्रा.लि. साखर कारखान्याने चालू गळीत हंगामात १ लाख मेट्रिक टन ऊसाचे गाळप पुर्ण केले आहे. कारखान्याकडून १० जानेवारी पर्यंत १ लाख मेट्रिक टन गाळप झाले आहे. गळीत हंगाम २०२४- २०२५ साठी गाळप क्षमतेचा विस्तार करून शेतक-यांचा ऊस वेळेत गाळपासाठी कारखान्याकडे यावा यासाठी आवश्यक सर्व यंत्रणा कार्यरत आहे. साखर व अन्य उपपदार्थ निर्मितीमधून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दर देण्यासाठी प्रयत सुरू असून श्री तुळजाभवानी शुगर प्रा.लि कारखान्याकडे आपला ऊस गाळपासाठी पाठवावा, असे आवाहन चेअरमन सौ भावनाताई बोर्डीकर यांनी केले आहे.



### मानवत येथील संशोधन प्रकल्पाची कुलगूरु यांच्याकडून झाली पाहणी

**मानवत,/प्रतिनिधी-** वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत जर्मन एजन्सी जीआयझेड, सन सीड प्रायव्हेट लिमिटेड आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारानुसार या संस्थाच्या संयुक्त विद्यमाने ग्री-फोटोव्होल्टेईक तंत्रज्ञान विकास व संशोधना करिता परभणी जिल्ह्यामध्ये मानवत जवळ ग्री-फोटोव्होल्टेईक संशोधन प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाला ९ जानेवारी रोजी कुलगुरु डॉ. इन्द्र मणि यांनी भेट देवून पाहणी केली. यावेळी त्याांच्या समवेत संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, वनस्पती जनुकीय विभागाचे प्रमुख डॉ. हिराकांत काळपांडे होते. या भेटी दरम्यानग्रीपीव्ही संशोधन प्रकल्पा मार्फत राबविण्यात आलेले पदव्युत्तर विद्यार्थ्यांच्या व इतर संशोधनातील केळी, तुर, जवस, हरभरा, घेवडा, साळ, झुकेनी,कांदा, कोबी, या विविध पिकांवर नव्याने प्रयोग राबविण्यात आलेले आहेत त्याची पाहणी केली. त्याांनी प्रकल्पाच्या शास्त्रजज्ञासोबत चर्चा करून संशोधनाबाबत मार्गदर्शन केले. ग्री पीव्ही संशोधन प्रकल्पामध्ये चालु असलेल्या संशोधना बद्दल समाधान व्यक्त केले. शेतीचा मोलाचा वाटा राहणार असे बोलून प्रकल्पातील सर्व शास्त्रज्ञ, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी यांना प्रोत्साहन दिले व भविष्यामध्ये ग्रीपिव्ही प्रकल्प असेच कार्य करत रहावे यासाठी त्याांनी शुभेच्छा दिल्या. या भेटीदरम्यान डॉ. गोदावरी पवार, डॉ विक्रम गुळवे, डॉ. सुनिता पवार, डॉ. बी एम कलालबंडी,जीआय झेडचे श्री अभिषेक शास्त्री तसेच अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# कृषी-पशुपालन यांची सांगड महत्वाची- डॉ.मणि

**परभणी,/प्रतिनिधी-:** शेती व्यवसायातील जोखीम आणि खर्च व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी आंतरपीक पद्धती, एकात्मिक शेती पद्धती तसेच कृषी-फलोत्पादन-पशुपालन याची सांगड घालावी लागेल, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. इंद्रमणि यांनी केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्प आणि हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ६ ते ०८ जानेवारी दरम्यान तीन दिवसीय अखिल भारतीय सम न्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाची १९व्या आणि हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रम ाची १२व्या राष्ट्रीय वार्षीक आढावा बैठकीचा यशस्वी सम ारोप ०८ जानेवारी रोजी झाला. यावेळी अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. इन्द्र मणि, मुख्य अतिथी म्हणून विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के पी गोरे आणि सन्माननीय अतिथी म्हणून माजी शिक्षण संचालक डॉ. उदय खोडके हे होते. व्यासपीठावर भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे माजी प्रमुख डॉ. वेणूगोपालन, भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या हैदराबाद येथील भारतीय संशोधन संस्थेचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के रमेश, हैद्राबाद येथील केंद्रीय कोरडवाहू शेती संशोधन संस्थेच्या अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे सम न्वयक डॉ. जे.व्ही.एन.एस. प्रसाद,संशोधन संचालक डॉ. खिजर बेग आणि कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाचे मुख्यशास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे आदींची उपस्थिती होती. बैठकीत अखिल भारतीय समन्वयीत कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाच्या १९ शिफारशी तर हवामान बदलानुरुप राष्ट्रीय कृषि उपक्रमाच्या ६ शिफारशी देण्यात आल्या. याचे सदरीकरण क्रीडाचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. के. गोपीनाथ यांनी केले. या शिफारशी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेस मंजुरीसाठी सादर केल्या जाणार असून या शिफारशींची चाचणी देशातील विविध ठिकाणच्या संशोधन केंद्राव्द्वारे केली जाणार आहे, अशी माहिती यावेळी दिली.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. इन्द्र मणि म्हणाले की, शेती उत्पादनासाठी पाण्याचा न्यायिक पद्धतीने उपयोग महत्वाचा असून कोरडवाहू शेतीमध्ये रबी आणि उन्हाळी हंगामात शेततळ्याचे अनन्य साधारण महत्व आहे. याबरोबरच कोरडवाहू शेतीतून तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक वेळा जमिनीत पेरलेल्या बियाण्याची रक्कमेचा परतावा देखील मिळत नाही. शेती व्यवसायातील जोखीम आणि खर्च व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. यासाठी आंतरपीक पद्धती, एकात्मिक शेती पद्धती तसेच कृषी-फलोत्पादन-पशुपालन याची सांगड घालावी लागेल. शेतकऱ्यांना शेतीमधून किती नफा मिळतो याचा देखील संशोधन करताना विचार करणे आवश्यक आहे. संशोधन केंद्राने दिलेल्या संशोधनाचा प्रभावी परिणाम आणि समांतर प्रसारण महत्वाचे आहे. शेतकऱ्यांनी शास्वत शेतीसाठी स्वतः शेतीमध्ये उभे राहून शेती करणे महत्वाचे आहे. यातून त्याांना शेती व्यवसायाचे मूल्यांकन देखील करता येते. विद्यापीठ 'शेतकरी देवो भवः' या भावनेतून कार्य करत असून विविध विस्तार कार्याच्या म ाध्यमातून नियमित शेतकऱ्यांशी संवाद साधत आहेँ असे नमूद करून त्याांनी शेतीच्या उज्वल भविष्यासाठी कृषी आणि संलग्न विभागातील सर्व शास्त्रज्ञांनी शेतकऱ्यांच्या नियमित संपर्कात राहावे व एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले.



डॉ. वेणूगोपालन म्हणाले की, हवामान बदलानुरूप शेती आणि पुनरुत्पादक शेती या दोन बाबी शेतीसंबंधी म हत्वाच्या आहेत. याचा सर्व स्तरावरून उल्लेख केला जातो. या दोन बाबीवरच प्रामुख्याने कोरडवाहूसह सिंचित शेतीमध्येही संशोधन करून योग्य शिफारशी देणे महत्वाचे आहे. यासाठी तसेच पुढील पाच वर्षातील कार्य करण्यासाठी या बैठकीमधून प्राप्त शिफारशी लाभदायक ठरणार असल्याचे नमूद केले. डॉ. के रमेश यांना कोरडवाहू क्षेत्रात कार्य करणारे शास्त्रज्ञांची कार्य कौतुकास्पद असल्याचे बैठकीत जाणवले. शास्त्रज्ञ कोरडवाहू शेतीमध्ये एकादया डॉक्टर प्रम ाणे योग्य वेळेस सल्ला देतात. याचा कोरडवाहू शेती विकास साधण्यास मदत मिळत असून कोरडवाहू शेती क्षेत्रात काम करण्यासाठी मोठा वाव आहे असे नमूद केले.

प्रास्ताविक संशोधन संचालक डॉ. खिजर बेग यांनी केले तर परभणी येथील कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पाची माहिती मुख्य शास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे यांनी दिली. सूत्रसंचालन डॉ. पपिता गौरखेडे, यांनी तर आभार हैदराबाद येथील क्रीडाचे मुख्य शास्त्रज्ञ डॉ. बी नर्सीम्लू यांनी मानले. बैठक यशस्वीतेकरीता मुख्यशास्त्रज्ञ डॉ. वासुदेव नारखेडे तसेच प्रकल्पातील शास्त्रज्ञ, डॉ आनंद गोरे, डॉ. मदन पेंडके, डॉ. पपिता गौरखेडे, डॉ गणेश गायकवाड, डॉ. रावसाहेब राऊत यांच्यासह सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी परिश्रम घेतले तर विविध समित्याांचे अध्यक्ष व सदस्य यांनी आयोजनात मोठा सहभाग घेतला.

**शास्त्रज्ञांनी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन ठेवून कार्य करावे....**

दिवसेंदिवस जमिनीची प्रत खालावत चाललेली असून यामध्ये सुधार करणे आवश्यक आहे. जमिनीतील अन्नद्रव्य आणि मातीचे नुकसान दिवसेंदिवस होत आहे. भविष्यात एकूण जमि नीच्या तिसरा भाग शेती करण्यास योग्य राहणार नसल्याची शक्यता आहे. यासाठी मृद व जल संधारण केंद्रस्थानी ठेऊन संशोधन कार्यक्रम आखावा लागेल. यासोबतच हवामान बदलामुळे जमीन आणि पिकांच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम होत आहे. याम ुळे सध्या उपयोगात असलेल्या तंत्रज्ञानामध्ये सुधार करण्यासाठी शास्त्रज्ञांनी बहुविद्याशाखीय दृष्टीकोन समोर ठेवून भविष्यात कार्य करावे लागेल, असे मत विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. के. पी. गोरे यांनी व्यक्त केले.



## त्या अपहार प्रकरणी आरोपीस सोमवारपर्यंत पोलिस कोठडीचे आदेश

**पूर्णा,/प्रतिनिधी :** येथील पंचायत समितीच्या अपहार प्रकरणात शुक्रवारी पुर्णा पोलिसांनी पंचायत समितीतील दुसऱ्या आरोपीस अटक केली असून त्याांना शुक्रवारी दुपारी पूर्णा न्यायालयासमोर हजर केले असता सोमवार पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश न्यायालयाने पारित केले आहेत.

पूर्ण पंचायत समितीमध्ये झालेल्या लाखो रूपायांच्या अपहार प्रकरणी पुर्णा पोलिसांनी पंचायत समितीतील वरिष्ठ सहाय्यक मंचक बापूराव भिसे यांना अटक करून शुक्रवारी दुपारच्या सुमारास पुर्णा न्यायालयात हजर केले असता सदरील आरोपीस न्यायालयाने सोमवार पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश पारित केले आहेत याप्रकरणी अद्याप सात आरोपी फरार असून यामध्ये दोन गट विकास अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

## मानधानी जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांची ऐतिहासिक स्थळांना भेटीगाठी

**जिंतूर,/प्रतिनिधी-** तालुक्यातील मानधानी येथील जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांना ऐतिहासिक स्थळांना भेट देऊन भौगोलिक ठिकाणाला भेटी देऊन पाहणी करून इतिहास जाणून घेतला आहे.

शैक्षणिक सहलीच्या माध्यम ातून विद्यार्थ्यांना ऐतिहासिक ठिकाणे दाखवणे तेथिल इतिहास प्रत्याक्ष माहीत करून घेणे यावेळी इतिहास अनुभवणे या हेतूने मानधानी येथील जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षकांनी पुढाकार घेऊन शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते या सहलीत रायगड किल्ला,म हाडचे चवदार तळे,मुरुड जंजिरा किल्ला,भंडारा डोंगर,जेजुरी गड यांच्यासह दिवेआगर येथील सम ुद्र किनारा आदी ठिकाणी भेटी



देण्यात आल्या रायगड किल्ला पुस्तकातून किंवा चित्रातून पाहणे वाचणे यापेक्षा स्वतः किल्ला पायी चालत जाऊन प्रतक्ष्य किल्ला व त्याांचा इतिहास कायमस्वरूपी स्मरणात राहत असतो हा इतिहास विद्यार्थी कधीच विसरू शकत नाही म्हणून शैक्षणी सहल सार्थकी ठरते या सहलीसाठी मुख्याध्यापक टी जी साबळे,धनंजय ईक्कर,माधव खुडे,जयानंद मत्रे, शिवाजी दराडे, शारदा वडकुते,त्रिवेणी पंडित, संजय बोंबले आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले या सहलीमध्ये शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला होता.

## शिवसेनेत खान यांच्यासह राष्ट्रीय काँग्रेसचे अनेक पदाअधिकारी दाखल

**मानवत,/प्रतिनिधी:** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून राजकीय पूनर्वसन करण्याचा शब्द मिळाल्याने सईद खॉन यांच्यासह राष्ट्रीय कॉंग्रेसचे पदाधिकारी शिवसेनेत दाखल विधानसभा निवडणुकीमध्ये शिवसेनेकडून पाथरी मतदारसंघात तिकीट न मिळाल्याने शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे प्रदेश अध्यक्ष सईद खान यांनी पदाचा राजीनामा देऊन रासपकडून विधानसभा निवडणूक लढविली होती.

सईद खॉन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ते निकटवर्तीय समजले जात असल्याने निवडणुकी झाल्यानंतर दोन महिन्यात सईद खान यांना राजकीय पूनर्वसन करण्याचा शब्द मिळाल्यानंतर मुंबईत सईद खान यांनी शिवसेनेत कार्यकत्यांसह प्रवेश करत घरवापसी केली आहे.

मानवत : नगरपालिका निवडणुकी च्या तोंडावर बाजार समिती माजी संचालक दिनेश कोक्कर, माजी नगर सेवक बालाजी कुऱ्हाडे, ॲड. सतिष चव्हाण यांच्यासह माजी नगरसेवक अ. रहीम अ. करीम, गोपाळ गौड, माजी स्वीकृत नगरसेवक बालाजी गोलाईत, शहराध्यक्ष शाम चव्हाण, सीमा सारडा, शैलेश वडमारे, व्यंकटेश चौधरी, किशोर चव्हाण, युनूस मिलनवाले, शैलेश कब्रूवार, जनार्दन कीर्तने, असेफ खान, अफरोज लाला, प्रदीप अग्रवाल यांनी सईद खान यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. पाथरी मतदारसंघात दोन वर्षात सईद खान यांनी शिवसेना पक्षसंघटना बांधणीचे काम केले होते. निवडणुकीत त्याांना महायुतीकडून शिवसेनेचे तिकीट मिळेल, अशी अपेक्षा होती. एकनाथ शिंदे यांच्याकडून त्याांना उम ेदवारीचा शब्द देण्यात आला होता. मात्र, महायुतीमध्ये जागा राष्ट्रवादीच्या वाट्याला आल्याने त्याांनी रासपकडून निवडणूक लढविली. यात त्याांचा पराभव झाला. ५५ हजार मते मिळवत त्याांनी राजकीय लक्ष वेधून घेतले. सईद खान यांची शिवसेनेत घरवापसी होणार, अशी चर्चा होती. मागील १५ दिवसांपूर्वी त्याांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती.

## राज्यस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षपदी लता गिल्डा

**सेलू,/प्रतिनिधी-** येथील राजस्थानी महिला मंडळाच्या अध्यक्षपदी लता गिल्डा यांची तर सचिव पदी उज्वला भाला यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. येथील बालाजी मंदिर महिला मंडळाची नूतन





कार्यकारणीची निवड करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मावळत्याा अध्यक्षा कांचन बाहेती सचिव पुष्पा तोष्णीवाल, उर्मिला बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत सहचिटणीस पदी ज्योती काबरा उपाध्यक्ष शर्मिला मालाणी,कोषाध्यक्ष किरण राठी यांची तर सदस्य म्हणून मीरा गिल्डा, मीना मालाणी, दीपा परताणी कीर्ती मंत्री, प्रिती राठी, अंकिता तोष्णीवाल, स्मिता गिल्डा, गीता करवा, पद्मा मंत्री, अश्विनी बिहाणी, दया दायमा, शितल दोडिया, विद्या व्यास, नेहा लोया ,रामेश्वरी लोया, रूपाली जाजू, पूजा तोष्णीवाल यांची निवड करण्यात आली.

# नगरपालिका निवडणूकीतही विकासासोबत राहा- माजी आ.बोर्डीकर

**सेलू,/प्रतिनिधी-** गत सहा वर्षांत शहरातील डि.पी.रस्त्यांना प्राधान्यक्रम देत त्यासोबत स्ट्रीट लाईट ,नाल्या, फ ुटपाथ इत्यादी विकासाचे कामे करण्यात आली असल्यामूळेच शहरातील नागरीक भाजपासोबत आहेत तसेच आगामी नगरपालिका निवडणूकीतही भाजपाच्या विकासासोबत जनतेने राहून आपल्या विचाराची पालिका निवडूण आणण्याची विनंती माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी बूधवार ८ रोजी शंकरलींगमंदीर देवस्थान सभागृह बांधकाम व फूले नगर येथे सिमेंट रस्ता भूमिपूजन प्रसंगी केली.



यावेळी देवस्थानचे अध्यक्ष अशोकआप्पा वाडकर,परभणी जिल्हा उपाध्यक्ष डॉ.ऋतुराज साडेगावकर, तालुका अध्यक्ष ॲड दत्ता कदम, शहाराध्यक्ष अशोक अंभोरे, शिवाजी खेडकर, भाऊसाहेब सोनवणे ,गणेश काटकर मुख्याधिकारी युवराज पौळ, न.प. अभियंता नागेश पैठणकर,धुळगंडे, बालासाहेब सरकाळे, दिनकर वाघ आदींची उपस्थिती होती.पूढे बोलतांना बोर्डीकर म्हणाले की,विकासाचे व्हिजन डोळ्यासमोर ठेवून आमदार मेघना बोर्डीकर यांनी गत पाचवर्षात कामे केली असल्याने समाजातील व्यक्तींनी भरभरून मतदान केले म्हणून आज आम दार मेघना बोर्डीकर राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली. आम्ही देखील तेवढ्याच ताकदीने उभं राहून शहारातील गरजा पूर्ण करण्यासाठी कटिबद्ध आहोत. समाजातील गरजा ओळखून त्याांना प्राधान्यक्रम दिला पाहिजे या मताचा मी आहे. कोणत्याही समाजाचं कामं करताना दुजा भाव न ठेवता सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रयत करणारं आहेत.

शहरातील रस्ते, नाल्या, फुटपाथ, स्ट्रीट लाईट, स्वच्छता यावर लक्ष केंद्रित करून शहरात विकास केला जाणार आहे. यासाठी आपण सर्वांनी हिंदुत्व हा विचार मनात ठेवून आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. देशात नरेंद्र मोदीतर महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस असल्यामूळे शहराचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आमच्या विचारांची नगर परिषद आमच्या ताब्यात द्या.व मग विकास कामे कशी होतात ती बघा असे अवाहन यावेळी माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक देवस्थानचे अध्यक्ष अशोकआप्पा वाडकर,सुत्रसंचलन सचिव प्रा . मिलिंद झमकडे, आभार निलेश मिटकरी यांनी मानले.याकार्यक्रमासाठी गणेश गोरे, अर्जुन बोरुळ, बाळू काजळे, सुनील चव्हाण, प्रकाश शेरे, ,कपिल फुलारी, दत्ताआप्पा मिटकर , बबन आप्पा झम कडे, राजेंद्रआप्पा नावाडे, राजेंद्रआप्पा महाजन, अरुणआप्पा सोळंके, वाल्मीक खुळे गणेश डेंगळे मोहन माने पप्पू शिंदे विठ्ठल कोकर, अशोक कोपुलवार, सुनील काळे, सुनील चव्हाण, गणेश ढेंगळे, आण्णा केवारे, शिवकुमारआप्पा नावाडे, कानडे आप्पा, निजलिंग तरवडगे आदींनी पूढाकार घेतला.

# ११ जानेवारी रोजी शिवमती कल्याणी देशमुख यांचे व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ प्रणित राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव समितीच्या वतीने ११ जानेवारी २०२५ रोची सायंकाळी ७ वाजता अंबड रोडवरील मातोश्री लॉन्स येथे शिवमती कल्याणी देशमुख यांचे व्याख्यात आयोजजित करण्यात आल्याची माहिती समितीचे अध्यक्ष सर्जेराव बोराडे यांनी दिली आहे.

यावेळी शिवमती कल्याणी देशमुख ह्या माँ साहेब जिजाऊ एक प्रेरणास्त्रोत्र या विषयावर व्याख्यान देणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीचे अध्यक्ष इंजि. सर्जेराव बोराडे, सचिव बबनराव गाडेकर, कार्याध्यक्ष किरण गरड, उपाध्यक्ष विनोद भांडवले, कोषाध्यक्ष प्रा.रमेश गजर, सहसचिव विजय ज–हाड, सहकोषाध्यक्ष दिपक काळे कार्यकारिणी सदस्य अ‍ॅड. धनशाश सोळुंके, विष्णु सोनुने ,लक्ष्मण बोंढारे प्रा. गजानन देशमुख, रविंद्र पाटील, रोहीत देशमुख, सिमाताई काकडे गंगाधरे, मंजुश्रीताई झोडगे, सुवर्णा राऊत, संदीप पाटील,सुधाकर पवार, प्रा.बद्रीनाथ घोंगे, ज्ञानेश्वर डुकरे, दौलतराव इंगळे, नंदकुमार कोलते, पंढरीनाथ शेळके, संदिप इंगळे, रघुनाथ खरात तसेच मार्गदर्शक आर. आर. खडके, संदीपान जाधव, संतोष गाजरे, सुनील आर्दड, विजय पांगारकर, विभावरी ताकट, विमलताई आगलावे, शितलताई तनपुरे, प्राचार्य चंद्रसेन कोठावळे, रोहित देशमुख, राजेंद्र गोरे सुभाष कोळकर, महेश नन्नावरे,आर. डी. पवार, काकासाहेब खरात, विजय वाडेकर कैलास खांडेभराड, दत्तात्रय कपाळे, ज्ञानेश्वर ताकट यांनी केले आहे. विशेष म्हणजे १२ जानेवारी रोजी मातृतिर्थ सिंदखेडराजा येथे जाणार्या जिजाऊ भक्तांसाठी दि. ११ जानेवारी रोजी सायंकाळी जालना येथे सुनील आर्दड यांच्या मातोश्री लॉन्स, अंबड रोड, जालना, किशोर पांगारकर यांच्या मंजुळादेवी मंगल कार्यालय, अंबड रोड, जालना व मराठा सेवा संघ कार्यालयाच्या मा. खा. भाऊसाहेब देशमुख सभागृहात राहण्याची व भोजणाची सोय करण्यात आली आहे.

### प्रयागराज कुंभमेळा साठी
## विशेष गाड्या सुरू करा– खासदार डॉ.कल्याण काळे

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



२०२५ चा प्रयागराज कुंभमेळा १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात यावा अशी विनंती करण्यात आली आहे. पौष पौर्णिमा, मकर संक्रांती, मौनी अमावस्या, वसंत पंचमी आणि महाशिवरात्री हे शाही स्नानाचे महत्त्वाचे दिवस आहेत. याप्रसंगी जालना जिल्हा व छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होऊ इच्छितात. मात्र येथून वाहतुकीची कोणतीही व्यवस्था नसल्याने भाविक वंचित राहतात. दोन्ही जिल्ह्यातून विशेष गाड्यांची व्यवस्था करावी, असं विनंतीचे पत्र जालना जिल्ह्याचे खासदार श्री.डॉ. कल्याण काळे यांनी रेल्वेमंत्री यांना दिले.

## संक्षिप्त

### संतोष भुतेकर यांना युवा पत्रकार पुरस्कार प्रदान



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दैनिक जगमित्रचे संपादक संतोष भुतेकर यांना प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या वतीने सोमवारी युवा पत्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र जालना जिल्ह्याच्या वतीने दर्पण दिनानिमित्त सोमवारी भारती लॉन्स येथे उद्योजक शिवरतन मुंदडा यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी आ. अर्जुनराव खोतकर, आ.संतोष पाटील दानवे ,आ.बबनराव लोणीकर ,आ.नारायण कुचे ,माजी आ. कैलास गोरंट्याल, भास्करराव पाटील दानवे, अंकुशराव देशमुख, लक्ष्मणराव राऊत, पंडितराव भुतेकर, बद्रीनाथ पठाडे , सिद्धिविनायक मुळे, शालिग्राम मस्के, ज्ञानेश्वर शेजूळ, विजयकुमार सकलेचा, प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्रचे राज्य सरचिटणीस महेश जोशी, जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, डॉ. प्रभु गोरे, प्रा. विजय कमळे पाटील यांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती. युवा पत्रकार पुरस्कार मिळाल्याने संतोष भुतेकर यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

### पोकॉ.संतोष सूपारकर यांचा गोरंटयाल यांच्या हस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनीधी**

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र ३५ व्य पोलीस क्रीडा स्पर्धेत जालना पोलिस दलातील पोकॉ.संतोष सूपारकर यांनी घवघवीत यश मिळवल्याबद्दल त्यांचा जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंटयाल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र पोलिस क्रीडा स्पर्धा नुकत्याच जालना येथे पार पडल्या. या स्पर्धेत जालन्यासह बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस आदी संघातील सुमारे ५०० पेक्षा अधिक खेळाडूंनी स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविला होता यामध्ये जालना पोलीस दलातील कर्मचारी थलेटिक्स खेळाडू संतोष सुभाष सुपारकर याने ८८ किलो वजनी गटात मध्ये वेटलिफ्टिंग व पावर लिफ्टिंग,१०० मिटर,२०० मीटर मध्ये प्रथम आणि द्रितीय पारितोषिक मिळविले.या यशाबद्दल त्यांचा जालन्याचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित कृष्णा पडूळ, योगेश पाटील, दत्ता घुले, गणेश दाभाडे, अमोल सरोदे, सागर पोटपत्रेवार आदीची उपस्थिती होती.

### चाचा नेहरु बाल महोत्सव उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय तीन दिवसीय चाचा नेहरु बालमहोत्सव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना यांच्यामार्फत दि.६ ते दि.८ जानेवारी २०२५ या कालावधीत पोलीस मैदान, जालना येथे उत्साहात पार पडला. बाल महोत्सवादरम्यान दि.६ जानेवारी रोजी मैदानी खेळ घेण्यात आले यात गोळा फेक, थाळी फेक, १०० मीटर धावणे, लिंबु चमचा, पोत्याची रेस, कबड्डी, लांब उडी स्पर्धा घेण्यात आली. दि.७ जानेवारी रोजी चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, कॅरम, बुध्दीबळ स्पर्धा घेण्यात आली. तर दि. ८ जानेवारी रोजी वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा तसेच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात येवून विजेत्या बालकांना बक्षिस वितरण करण्यात आले. कार्यक्रमासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती.कोमल कोरे, बाल न्याय मंडळ सदस्य, निरीक्षणगृह व बालगृहांचे अधिक्षक, शासकीय मुलींच्या निवासी शाळेच्या विद्यार्थिनी व शिक्षक, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच चारित्र्य संपन्न व्हावे –ए.पि.आय.ईंगेवाड

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदामाव/प्रतिनिधी**

शालेय जीवनात शिक्षणासोबतच बलोपासना करुन चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व घडवावे असे प्रतिपादन आष्टी पोलिस स्टेशनचे ए.पी.आय.श्री एस. एम. ईंगेवाड यांनी केले.

श्री समर्थ माध्यमिक विद्यालयात विद्यार्थीनीची सुरक्षितता या समुपदेशन कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना त्यांनी विद्यार्थीनी सोबत कोणत्याही प्रकारचे गैरवर्तण चालणार नाही अशा गैरवर्तनासाठी शिक्षा म्हणुन असलेला पोक्सा , कायदा सहज शब्दात समजुन सांगितला. संपुर्ण महाराष्ट्रात शालेय विद्यार्थीनीची सुरक्षितता या संदर्भात शासनाने दिशा निर्देश दिले आहेत त्याचाच एक भाग म्हणुन सदरील कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयात करण्यात आले होते. श्री ईंगेवाड यांनी



अनेक विषयावर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रशणाची ऊत्तरे देवुन प्रेरणा दिली. विद्यालयाचा संपुर्ण परीसर सि.सि.टि.व्ही च्या कक्षेत असल्यामुळे समाधान व्यक्त केले. विद्यार्थीनीच्या सुरक्षितते संदर्भात विद्यालय करीत असलेल्या कार्याचे कौतुक केले. प्रारंभी श्री सरस्वती देवता व भारत मातेच्या प्रतिमांचे पुजन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास मंडळाचे ऊपाध्यक्ष श्री तुळशीदास खवल , कोषाध्यक्ष प्रभाकर कादे , सरपंच हरीभाऊ खवल , तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष शिवाजी कादे , ग्रा.प. सदस्य सदुभाऊ खवल ,गणेशराव खवल , लक्ष्मण शिंदे , भिमराव शिंदे. बालासाहेब नखाते , भाऊसाहेब कादे , पंडीत मुंढे ,सुरेश शिंदे , गोरख वखरे , पो.का.देवळे साहेब व पो.का. शिंदे मोठ्या संख्येने विद्यार्थी ऊपस्थीत होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुरेश पाटोदकर तर सुत्र संचालन चत्रभुच खवल यांनी केले. सर्व कर्मचारी ऊपस्थीत होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी तालुकास्तरावर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

इयत्ता अकरावी व बारावी तसेच इयत्ता बारावी नंतरच्या व्यावसायिक तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश मिळालेल्या ज्या विद्यार्थ्याना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, अशा विद्यार्थ्यांना भोजन,निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाहभत्ता व इतर आवश्यक सुविधावर खर्च करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू केली आहे. विद्यार्थ्याचे उशीरा सुरु होणारे सत्र तसेच सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरापर्यंत वाढविल्याने अर्ज करताना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. १५ जानेवारी २०२५ पर्यत वाढविण्यात आली आहे. तरी जिल्ह्यातील विद्यार्थ्यानी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी ऑनलाईन अर्ज मुदतीत सादर करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

स्वाधार योजनेअंतर्गत तालुका नगरपंचायत, नगरपालिका हद्दीपासून ५ किलोमिटरच्या आत असलेल्या महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावी व बारावी तसेच बारावीनंतर व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्याना शासन निर्णयानुसार देय असलेली रक्कम मंजुर केली जाते.सदर योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्याच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रूपये २.५० लाखाच्या आत असणे अपेक्षीत आहे. अनूसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून सदर योजनेचा विस्तार तालुकास्तरावर करण्यात आलेला आहे. विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या, तालुक्याच्या ठिकाणी आहे. अशा शहरातील तसेच तालुक्यातील सदर विद्यार्थी रहिवासी नसावा. अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील विद्यार्थ्यास दहावी, अकरावी व बारावी या अभ्यासक्रमात किमान ५० टक्के गुण असणे अपेक्षीत आहेत. तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील दिव्यांगासाठी ४० टक्के गुण असणे अपेक्षीत आहे. या विद्यार्थ्याची महाविद्यालयातील उपस्थिती किमान ७५ टक्के असणे अपेक्षीत आहे. सन २०२४–२५ या वर्षासाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अर्ज ऑनलाईनद्वारे भरण्यात येत आहे. यापुर्वी दिलेल्या विहित मूदतीमध्ये ज्या पात्र विद्यार्थ्यानी https://hmas.mahait.org या पोर्टलवर ऑनलाईनद्वारे अर्ज केले आहेत, अशा विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करु नये. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## जलजिवन मिशन योजनेच्या पाण्यांच्या टाकीचे काम अर्धवट सोडुन गुत्तेदार फरार!

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यांतील माहोरा येथील जलजिवन मिशन अंतर्गत या योजनेचा कामाचा शुभारंभ मा.केंन्द्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे,आमदार संतोष पाटील दानवे यांच्या हस्ते या जल जिवन मिशन योजना अंतर्गत शुभारंभ २०२३,२०२४, ला साडे चार कोटी रुपये,योजना सुरू तर झाली. मात्र दोन वर्ष होत या योजनेला पुर्ण होत आलेलेली असुन पाण्याच्या टाकीचे काम प्रारंभ केला होता. मात्र गेल्या सहा ते. आठ, महिण्या पासुन या योजनेचे काम गुत्तेदाराने अर्धवट सोडुन गुत्तेदार दिसेनासे झालेले दिसुन येते. महाराष्ट्र शासना कडुन या योजना हेतु असा होता माहोरा गांवाचा पाणी प्रश्न कायमचा सोडवावा असा होता.मात्र गेल्या दोन वर्षापासुन दर कोस,दर मुक्काम असा योजनेचे काम सुरू होते. मात्र काम बंद होऊन गेले सहा महिने पासुन बंद असल्याने माहोरा करांना



संभाव्य उन्हाळा मध्ये पाणी टंचाई संकट येणार आहे. माहोरा करांना जलजिवन मिशन योजने अंतर्गत माहोरा करांना पाणी मिळेल की नाही ? असा प्रश्न निर्माण झाला आहे. अद्याप पर्यंत या जल जिवन योजने चे पाईपलाईनचे व विहिरी सुध्दा काम सुरू झालेले नाही ! व पाण्याच्या टाकीचे काम सुरू झाले होते. ते पण !काम अर्धवट सोडून गुत्तेदार पळालेली काय? असा प्रश्न ग्रामस्थाना पडला? आहे. या बाबत जिल्हा अधिकारी श्रीकृष्ण पांचळ, जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना, मा.केंन्द्रीय मंत्री रावसाहेब पा.दानवे, आमदार संतोष पाटील दानवे,यांनी महाराष्ट्र जलजिवन योजने चा शुभारंभ केलेले होता. मात्र अद्याप तरी या योजने कोणतीच हाल चाल झालेली दिसुन येत नाही. व हि योजना कुठल्या तळ्यावरुन योजना होणार या बाबत अस्पष्टता आहे.?जर येत्या २६ जानेवारी प्रर्यत या योजने कामा सुरूवात न केल्यास प्रजास सत्ताक दिनापासुन येथील ग्रामस्थ या योजने करिता जिल्हाधिकारी, तहसिल कार्यालय समोर उपोषण करणार असल्यांचे ही ग्रामस्थांनी बोलतांना सांगितले.

### विज्ञान प्रदर्शनासाठी विवेकानंद सेवा केंद्राच्या
## ४ शाळांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी गटशिक्षणाधिकारी कार्यालय पंचायत समिती परतुर अंतर्गत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये विवेकानंद सेवा केंद्र संचलित, विवेकानंद इंग्लिश स्कूल (उइडए) चा विद्यार्थी काव्य किशोर पाटील ध्रुव रघुनंदन झंवर, विवेकानंद पब्लिक स्कूल (डींरींश इेरीव) ची विद्यार्थिनी संचिता शिवाजी बोराडे, विवेकानंद प्राथमिक शाळेचा विद्यार्थी सोहम शशिकांत देशपांडे तसेच विवेकानंद माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी अदिती मोहन ढवळे या सर्वांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. तसेच विज्ञान शिक्षक बाळासाहेब मुंडे सर निलेश सरदार सर आकात मॅडम फाजगे सर या सर्वांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉ. एस. जी. बाहेकर साहेब ,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आदरणीय संदीप दादा बाहेकर, गटशिक्षणाधिकारी संतोष साबळे साहेब गट समन्वयक कल्याण बागल सर डॉ. स्मिता रोडगे मॅडम अशोक राठोड सर सर्व परीक्षक तसेच सर्व शिक्षकांना अभिनंदन केले आहे.


# नवोदयच्या पूर्व परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात

## पालकांची जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जवाहर नवोदय विद्यालयाच्या २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाची पूर्व पात्रता परीक्षा पारदर्शक होण्यासह कॉपीमुक्त व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने ठोस पाऊले उचलण्याची मागणी जालना तालुक्यातील पालकांनी मंगळवारी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवदेनात म्हटले आहे की, मागील काही वर्षांमध्ये जवाहर नवोदय पूर्व पात्रता परीक्षेत काही केंद्रांवर सर्रास



कॉपी करण्यात आल्याचा गंभीर प्रकार निदर्शनास आलेला आहे. आतापर्यंत ग्रामीण भागातील गुणवंत विद्याथ्र्यांचे जवाहर नवोदय या सारख्या विद्यालयांमध्ये प्रवेश मिळाल्याने भवितव्य उज्वल झालेले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्याथ्र्यांसाठी हे विद्यालय मोठा आधार आहे. मात्र, काही वर्षांपासून काही परीक्षा केंद्रांवर पूर्व परिक्षेत कॉपीसह इतर काही गैरप्रकार झाल्याचे आढळून आले आहे. अशा प्रकारांमुळे पात्र व होतकरू विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तरी केंद्रावर परीक्षक म्हणून जवाहर नवोदय विद्यालयाचे शिक्षक नियुक्त करावे, विशेष खबरदारी म्हणून जाफराबाद, भोकरदन, मंठा, रांजणी, तळणी या परीक्षा केंद्रांवर विशेष पथकांची नेमणूक करण्यात यावी यासह विविध मागण्या निवेदनात करण्यात आलेल्या आहेत. निवेदनाची प्रत परतूर तालुक्यातील आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांना देण्यात आली आहे. निवेदनावर विठ्ठल रामकिसन मोहिते (रा मोतीगव्हाण), बाबासाहेब नामदेव डोके (रा. बोरगांव), नामदेव विठ्ठल खरात (रा. नंदापुर), विलास लहु बोदरे (रा. भाटेपुरी), प्रकाश आसाराम म्हस्के (रा.उटवद), बाबासाहेब भिकाजी भोरे (रा. धांडेगाव), गजानन राधाकिसन ढाकणे (रा. ढगी), रामप्रसाद अचितराव भुतेकर (रा.पोखरी), छत्रभुज बाबासाहेब नाईनवरे (रा.पोखरी), सखाराम मारोती गाढेकर (भाटेपुरी), छत्रभुज गणपत उबाळे (रा.नंदापुर) विठ्ठल मधुकर इपर यांच्या सह्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माहूर तहसीलदारांची वाळू तस्करीविरोधात धडक मोहीम

- ९ महिन्यात ३० वाहने जप्त
- १५ लाखाचा दंड वसूल
- तब्बल ५० लाखाचा महसूल जमा

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १० जानेवारी**

जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, नांदेड व सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली,किनवट यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार किशोर यादव, माहूर यांनी आतापर्यंत गत नऊ महिन्यांमध्ये वाळू चोरी व तस्करी विरोधात धरपकड, जप्ती व दंडात्मक कारवाईचा बडगा उगारत धडाकेबाज कारवाया करत वाळू चोरी करणारी तब्बल ३० वाहने जप्त करून त्या माध्यमातून १५ लाखांचा दंड वसूल केला आहे.परिणामी वाळू चोरी शून्यावर आली असतानाच आणखी १५ वाहनांकडून १५ ते २० लाख रुपये दंडाची रक्कम वसूल करत जप्त वाळू साठ्याच्या लिलावातून २० लाख रुपयांचा महसूल जमा करून एकंदरीत ५० लाख रुपये शासन दरबारी जमा करत असल्याची अशाप्रकारची जिल्ह्यातील ही विक्रमी कार्यवाही ठरल्याने तहसीलदार यादव यांनी आपल्या सहकाऱ्यांसह वाळु चोरी विरोधात उघडलेल्या या धाडसी व धडक मोहिमेचे प्रशासनासह, नागरिकांमधून अभिनंदन करण्यात येत आहे.



शासनाकडून माहूर तालुक्यातील वाळू घाटांच्या जाहीर लिलावाचे कार्य विचाराधीन असल्याने ते दिर्घ कालावधीपासून रखडल्याने घरकुल बांधकाम करणारे लाभार्थी व इतर सर्वसामान्य गोरगरिबांना घर व इतर बांधकामासाठी स्वस्त वाळू मिळणे दुरापास्त झाले होते.या गोष्टीची जाणीव झाल्याने तहसीलदार किशोर यादव यांनी वाळू तस्करांनी नदीपात्रात वाळू चोरीच्या उद्देशाने जमा केलेल्या वाळूची जप्ती करून या जप्त वाळूचा गोरगरिबांना फायदा व्हावा यासाठी सहायक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्याकडे तसे प्रस्ताव पाठवले होते. तहसीलदार यादव यांच्या या जनकल्याणकारी प्रस्तावाची दखल घेत सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी तातडीने लिलाव जाहीर करून दिनांक ६ रोजी जप्ती घेणाऱ्यांना वाळूचे लिलावात बोली मंजूर करून त्यांना स्वस्त दरात गोरगरिबांना वाळू विक्री करण्याचे आदेश दिले असून, लवकरच तालुक्यातील ९ वाळू घाटांवर गोरगरिबांना आता स्वस्त दरात वाळू मिळणार आहे.

जिल्हाधिकारी डॉ.अभिजीत राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांच्या कणखर भूमिकेमुळे तहसीलदार किशोर यादव तथा महाकाल उर्फ नायब तहसीलदार कैलास जेठे, नायब तहसीलदार डॉ, राजकुमार राठोड यांनी वाळू चोरांची वाहने पकडण्याचा सपाटा लावत धडाकेबाज कारवाईची मोहीम हाती घेतली असल्याचे पाहून वाळू तस्करांचे धाबे दणाणले आहे.परिणामी आता वाळू तस्करी १००% बंद झाली असल्यामुळे नागरिकांना वाळू मिळणे दुरापास्त झाले होते. त्यामुळे सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली यांनी दिनांक १ रोजी पासून ते ११ पर्यंत मौजे लिंबायत शिवारात १६० ब्रास जप्त वाळूचा लिलाव प्रवीण चोले यांना दिला. यामुळे नागरिकांना सहजपणे वाळू मिळाली.सोबतच दिनांक ६ रोजी तालुक्यात ९ ठिकाणी वाळू साठे हराशीमुळे नागरिकांना आता आणखी स्वस्त दरात वाळू मिळणार असल्याने नागरिकांनी हर्राशी घेतलेल्यांशी संपर्क साधून वाळू उपलब्ध करून घ्यावी! असे आवाहन तहसीलदार किशोर यादव यांनी केले असून, त्यांनी जप्त केलेल्या वाहनातून सुमारे ५० लाख रुपये महसूल शासन दरबारी जमा होणार असल्याने त्यांनी केलेल्या या धडाकेबाज कारवायामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# श्री. गुरुगोबिंद सिंघजी जयंती मोठ्या उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १० जानेवारी**

श्री. गुरुगोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था विष्णुपुरी नांदेड येथे दि. ६ जानेवारी रोजी श्री . गुरुगोबिंद सिंघजी यांची जयंती (गुरुपूरब) मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

श्री गुरुगोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्र शिक्षण संस्था विष्णुपुरी नांदेड येथील या कार्यक्रमाची सुरुवात गुरु ग्रंथ साहिब या ग्रंथाचे एका सजलेल्या खास वाहनातून संस्थेच्या प्रांगणात मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी नांदेड भूषण संत बाबा बलविंदर सिंघजी, गुरुद्वारा लंगर साहेब ट्रस्ट, नगीना घाट, नांदेड तसेच मुख्य गुरुद्वारा येथील मित जत्थेदार ज्योतिन्दर सिंघजी, संस्थेचे नियमक मंडळाचे सदस्य तथा गुरुद्वारा नानकसर साहेबचे प्रमुख संत बाबा सुखविंदर सिंघजी व इतर अनेक पंचप्यारे, शिख समुदायातील वरिष्ठ संत, संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे, संस्थेचे नियमक मंडळाचे सदस्य डॉ. डी. डी. डोये, डॉ. जे. व्हि. मेघा, संस्थेतील विविध अधिष्ठाता, विभाग प्रमुख, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीस गुरु ग्रंथ साहिब या धर्म ग्रंथास पुष्पहार व पुष्प अर्पण करून यथोचित पूजन करण्यात आले. याप्रसंगी संत बाबा बलविंदर सिंघजी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना म्हणाले की, श्री. गुरु गोविंद सिंघजी यांच्या चरण स्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमीत त्यांच्याच नावाने असलेल्या तंत्र शिक्षण संस्थेत आपण शिक्षण घेत आहात. तुम्ही भाग्यवान आहात आपण चांगले शिक्षण घेऊन संस्थेचे नाव व आपले नाव उज्वल करा.

यावेळी कथाकार, भाई सरबजीत सिंघजी निर्मले यांनी आपल्या अभ्यासपूर्ण शैलीत श्री गुरुगोबिंद सिंघजी यांच्या चरित्रावर सखोल मार्गदर्शन केले. संस्थेचे संचालक डॉक्टर मनेश कोकरे यांनी गुरुगोबिंद सिंघजी यांच्या जीवनातील विविध पैलू वर प्रकाश टाकला श्री. गुरुगोबिंद सिंघजी यांनी सांगितलेली विविध तत्वे सांगून त्या तत्त्वाचे संस्थेच्या विद्यार्थ्यांनी व सर्वांनी पालन करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमानंतर सर्वासाठी लंगर (प्रसाद) चे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी शीख समुदायातील संत व नागरिक यांचेसह संस्थेतील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील विद्यार्थी सरदार हरजितसिंघ ढिल्लो, सरदार धन्नासिंघ ढकणे, इतर विद्यार्थी प्रतिनिधी, प्राध्यापक व कर्मचारी यांनी मोलाचे सहकार्य केले.

## संक्षिप्त वृत्त



### माजी सैनिकांचे शासकिय सेवेतील कार्य उल्लेखनीय आहे : आनंद देऊळगावकर

**मुदखेड**-प्रशासकीय सेवेमध्ये काम करताना मोठी तत्परता दर्शवावी लागते त्यातच अनेक जण शासकीय निमशासकीय सेवेमध्ये आपले कर्तव्य बजावतात तुलनात्मक दृष्टीने विचार केला तर माजी सैनिकांचे शासकीय सेवेतील कार्य हे उल्लेखनीय नियोजनबद्ध आणि प्रामाणिक पणाचे राहिले असून त्यांच्या देशसेवा आणि कर्तव्यनिष्ठता या बाबी कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी मराठवाडा माजी सैनिक फेडरेशन चे अध्यक्ष माजी सैनिक न.प. उपाध्यक्ष लक्ष्मणराव देवदे यांच्या वतीने माजी सैनिक संघटनेच्या प्रांताध्यक्षपदी नव्याने निवडून आलेले मंडळ अधिकारी हयून पठाण यांचा सत्कार व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांच्या सत्कार सोहळ्याप्रसंगी बोलताना केले. यावेळी नायब तहसीलदार मारोतराव जगताप, समीर पोहणे, काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष प्रतापराव देशमुख ,शहराध्यक्ष कैलास गोडसे ,तलाठी गोपाळ माने यांची प्रमुख उपस्थिती होती. भोकर तालुक्यातील पांढुर्णा येथील मूळ भूमिपुत्र हयून पठाण यांचा कौटुंबिक वारसा सैनिकाचा असून देशसेवेमध्ये त्यांचे मोलाचे योगदान असल्याचे गौरवोद्गार देखील मान्यवरांच्या वतीने यावेळी बोलताना व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रस्ताविकातून मुख्य संयोजक माजी सैनिक फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मणराव देवदे,यांनी आयोजनाची सविस्तर भूमिका विशद केली. यावेळी माजी सैनिक संघटनेचे तालुका अध्यक्ष चंद्रकांत लोलगे,देवराव चौदंते,मारोती गुंठे,जिल्हा मार्गदर्शक प्रभु घोंगडे,संघटक राजाराम हाळदे,जेष्ठ माजी सैनिक माधव पवार,शशिकांत मोडवान, चांद साब, वीर सैनिक संघटनेचे ग्रुप अध्यक्ष विकास बल्फेवाड,बालाजी गव्हाणे,तालुका संघटक सुनिल चौदंते,साईनाथ राठोड, साहेबराव वने विद्याधर तहकीक, शेख फारुख ,गोवींद तेलंगे देवीदास पवार फारुख शेख या माजी सैनिकासह ज्येष्ठ पत्रकार अजगर हुसेन, जयराम वने, पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, पत्रकार संतोष पाटील गाडे ,मनोज कमटे, प्रल्हाद मस्के अतिक अहमद, शेख शमशोदिन, धम्मदाता कांबळे, अब्दुल रजाक, साहेबराव गागलवाड, संतोष दर्शन वाड ,साहेबराव हौसरे, हाफिस कुरेशी ,यांच्यासह अन्य पत्रकार व कार्यकर्त्यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार संजय कोलते यांनी केले तर आभार राजाराम हळदे यांनी मानले.

### आर्य चाणक्य सेने तर्फे स्वेटर वाटप



**नांदेड**-आर्य चाणक्य सेना नांदेड यांच्या वतीने वेद विद्यालयामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना स्वेटर चे वाटप करण्यात आले श्री क्षेत्र कारंजा लाड वेदमूर्ती दिनेश गुरुजी व कळमनुरी येथे वेदमूर्ती प्रसाद पाठक गुरुजी या ठिकाणी अध्यापक आहेत या ठिकाणी वेद विद्यालयात शेकडो विद्यार्थी वेद पठण करून त्याचा अभ्यास करत आहेत . यावर्षी थंडी खूप मोठ्या प्रमाणात पडलेली असून पाठशाळेमध्ये लहान लहान मुले अध्ययन करत आहेत पाठशाळामध्ये पहाटे लवकर उठून स्नान संध्या वंदन करून वेध अध्ययन करण्यासाठी बसावं लागत असतं त्यामुळे त्यांचा थंडीपासून बचाव व्हावा या उद्देशाने कृष्णा बेरळीकर जिल्हाध्यक्ष आर्य चाणक्य सेना यांच्या वतीने स्वेटर व उबदार वस्त्रांचे वाटप करण्यात आले यावेळी पाठशाळेचे व्यवस्थापक अध्यापक व विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. वरील बातमी आपल्या सुप्रसिद्ध दैनिकात प्रसिद्ध करावी ही नम्र विनंती.

### प्रा. डॉ. संग्राम आंदे यांना साहित्य रत्न पुरस्कार प्रदान



**नांदेड**-मुखेड महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातील प्रा डॉ संग्राम आंदे यांना माणूसकी फाऊंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या तर्फे त्यांना हा पुरस्कार सुप्रसिद्ध साहित्यिक राजापूरे साहेब यांच्या हस्ते साहीत्य क्षेत्रातील सर्वच्च पुरस्कार साहित्य रत्न पुरस्कार बुलडाणा याठिकाणी प्रदान करण्यात आला. त्यांनी आतापर्यंत अनेक पुस्तकाचे लिखाण केले आहे अनेक अग्रलेख लिहिले आहेत अनेक पुरस्कार प्राप्त केले आहेत अनेक काव्यसमेलनात सहभाग आणि साहित्य क्षेत्रातील प्रभावी लेखन संशोधनात्मक लिखाणावर प्रभाव सर्व कार्याची दखल घेऊन साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च आदर्श साहित्य रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला हा पुरस्कार मिळाल्याबद्दल महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अडकीणे एस बी साहेब प्राचार्य डॉ मस्के सर प्राचार्य डॉ गोणे सर प्रा डॉ नेटके सर इत्यादी नी अभिनंदन केले आहे.

# चार आरोपींची निर्दोष मुक्तता

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १० जानेवारी**

मुदखेड तालुक्यातील मौजे वाडी मुक्ताजी येथे झालेल्या मारहाण प्रकरणातील चार आरोपींना मुदखेड न्यायालयाने निर्दोष मुक्त केले आहे.

सविस्तर माहिती अशी आहे कि तालुक्यातील मौजे वाडी मुक्ताजी येथे दि. १५ जुन २०१८ रोजी मारहाण झालेल्या प्रकरणात मुदखेड पोलिस ठाण्यात भादवी कलम ३२६,३२४,३२३,५०४,५०६,३४ अंतर्गत चार जणांनवर गुन्हा नोंदवून आरोची करून अटक करण्यात आली होती. या खटल्यात सरकारी पक्षाने एकुन आठ साक्षीदार तपासले असता त्यांना आरोपी विरुद्ध सबळ पुरावा सादर करण्यास सरकार पक्षाला अपयश आले.

पुराव्याअभावी गुन्हा सिद्ध न झाल्याने मुदखेड न्यायालयाने दि.८ जानेवारी २०२५ राजी यातील चारही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. या खटल्यात आरोपी गुलाब देशमुख, गोपीराज इंगोले, अवधुत इंगोले, व श्याम इंगोले, यांची बाजु अँड. माधव हाटकर यांनी प्रभाविपणे मांडली, अँड. हाटकर यांना अँड. तेजस्विनी मुंगल यांनी सहकार्य केले. सरकारी पक्षाचे सर्व आरोप फेटाळून लावत त्यांनी आरोची निर्दोष असल्याचे सिद्ध केले.



**नांदेड-मीमांसा फाउंडेशन, दैनिक समीक्षा, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मंथन क्रिएटिव्ह ग्रुप, पत्रकार प्रेस परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारिता पुरस्कार सोहळा २०२५ च्या वृत्तपत्र क्षेत्रातील तिसरा डोळा उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्कार छायाचित्रकार नरेंद्र गडप्पा यांना विधान परिषदेचे गटनेते आ. हेमंत पाटील व खा. प्रा. रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आ. बालाजी कल्याणकर, आ. आनंद बोंढारकर, आ. बाबुराव कदम कोहळीकर, हिंदुस्तान टाइम्स मुंबईचे सुरेंद्र गांगण, मॅक्स महाराष्ट्र मुंबईचे मनोज भोयर, जिल्हा माहिती अधिकारी प्रवीण टाके, संपादक रुपेश पाडमुख आदी उपस्थित होते.**

# हु. ज.पा. महाविद्यालयात वाचन संकल्प महाराष्ट्राचा अंतर्गत विविध स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. १० जानेवारी**

येथील हु.ज.पा.महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, मराठी विभाग, इंग्रजी विभाग, हिंदी विभाग आणि ग्रंथालय यांच्यातर्फे दि. ०१ ते १५ जानेवारी दरम्यान वाचन संकल्प महाराष्ट्राचा या पंधरवडा कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानिमित्ताने दि. १० जानेवारी रोजी महाविद्यालयामध्ये या तिन्ही विभागाद्वारे पुस्तक परीक्षण व लेखन स्पर्धा घेण्यात आली.

या स्पर्धेमध्ये सुरुवातीला महाविद्यालयातील प्रा. डॉ. उज्वला सदावर्ते यांच्या हस्ते जयवंतराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व त्यानंतर मंचावरील मान्यवरांचे ग्रंथ भेट देऊन स्वागत करण्यात आले त्यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व रूपरेषा ग्रंथपाल बोंबले राजू यांनी सांगितली तसेच अध्यक्षीय मनोगत महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.उज्वला सदावर्ते यांनी केले, त्यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथ वाचनाचे फायदे सांगून प्रत्येकाने पुस्तक वाचली पाहिजे वाचन संस्कृती जपली पाहिजे असा सल्ला दिला व विविध कादंबरी पुस्तकाविषयी नालंदा विद्यापीठातील ग्रंथालय विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच कार्यक्रमाचे आयोजक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, भाषा विभाग प्रमुख मराठी, हिन्दी, इंग्रजी व ग्रंथालय विभाग ग्रंथपाल व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने कार्यक्रमासाठी उपस्थित होते . कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.एल. एस. पवार यांनी केले तर आभार डॉ.आशिष दिवडे यांनी मानले.

# उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी केले संगमेश्वर पन्नासेचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**नायगांव,१० जानेवारी**

तालुक्यातील गडगा येथील सामाजिक क्षेत्रात योगदान देणाऱ्या वडीलांच्या पुण्याईची जाण ठेवीत सर्व साधारण परिस्थितीवर मात करीत संगमेश्वर पन्नासे ने जिद्द, चिकाटी अथक परीश्रमाच्या बळावर पहील्याच प्रयत्नात नगर विका स विभागात नुकतीच नौकरी मिळविली असुन. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली.अगोदर उपमुख्यमंत्री शिंदे यांचा यथोचित सत्कार करण्यास पुढे सरसावलेल्या संगमेश्वरचा उपमुख्यमंत्र्यांनी शाल, पुष्पगुच्छ देवून कौतुक केले.

तालुक्यातील गडगा येथील शिवसेना पक्षाचे(एकनाथ शिंदे गटाचे)सामाजिक कार्यकर्ते शिवाजी पन्नासे गेल्या अनेक वर्षापासून समाजातील मानवाच्या आरोग्यविषयक व विविध सामाजिक क्षेत्रात सातत्याने उपक्रम राबवितात. सध्या पुणे येथील महानगर विकास प्राधिकरण विभागात कार्यरत आहेत. नूकतीच काही दिवसांपूर्वी वडीलासमवेत



त्यांनी ठाणे येथील रक्त दान शिबीर कार्यक्रमात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. नियमानूसार त्यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे स्वागत करताना वडील शिवाजीराव पन्नासे यांनी हा माझा जेष्ठ चिरंजीव आहे असे सांगताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संगमेश्वरला पुढील यशस्वीतेसाठी अभिनंदन करुन शुभेच्छा देतो असे म्हणत शिंदे यांनी संगमेश्वर पन्नासेचे शाल, व पुष्प गुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी ठाण्याचे खासदार नरेश मस्के, आमदार रवींद्र फाटक, माजी मुख्यमंत्र्याचे सचिव मंगेश चिवटे, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तथा डॉ.श्रीकांत फाऊंडेशनचे राज्य कक्षप्रमुख नरहरी राऊत, डॉ. सिध्देश्वर पन्नासे आदींची उपस्थिती होती.

# माँ. जिजाऊ स्मारक परिसर साफ सफाई करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**कंधार,१० जानेवारी**

येथील जिजाऊ स्मारक परिसरात प्रचंड घाणीचे साम्राज्य झाले असून माँ. जिजाऊ स्मारकास झाडा-झुडपांचा विळखा झाला आहे. सदरील हि बाब गेली अनेक महिन्यापासून परिसरात घाणीचे साम्राज्य होत असून याकडे दुर्लक्ष होताना दिसत असल्याने हा परिसर साफ सफाई करण्याचे निवेदन मराठा सेवा संघाच्या वतीने ९ रोजी न.प. मुख्यधिकारी तथा प्रशिक्षणार्थी जिल्हाधिकारी अनुष्का शर्मा यांच्याकडे केली आहे.

येथील माँ. जिजाऊ स्मारक परिसरात मोठ्याप्रमाणात अस्वच्छता दिसत आहे. १२ जानेवारी हा दिवस माँ. जिजाऊ यांची जयंती असून या परिसरात सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील नागरिक अभिवादन करण्यास येतात त्यामुळे परिसरात स्वच्छता करून पथदिवे लावण्यात याव, विद्युत रोषणाई करावी अशी मागणी यावेळी मराठा सेवा संघाचे जिल्हा उपाध्यक्ष नामदेव कुटे, तालुका अध्यक्ष अंकुश कदम, बी.टी. कदम, रमेश लुंगारे, प्रदीप इंगोले, पांडुरंग कदम, केशव जाधव, माणिक कदम, बाबू पाटील, पांडुरंग गायकवाड आदी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत उमरी नगर परिषदेच्या कर्मचाऱ्यांचे घवघवीत यश



**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १० जानेवारी**

जिल्हास्तरीय नगरपरिषद/ नगरपंचायत क्रिडा स्पर्धा सांस्कृतिक महोत्सवात उमरी नगरपरिषद येथील कर्मचारी यांनी विविध स्पर्ध्येमध्ये क्रमांक मिळविला

जिल्हाधिकारी नांदेड अभिजित राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली नगरपरिषद प्रशासन विभागातर्फे दिनांक ३ ते ४ जानेवारी २०२५ रोजी जिल्हास्तरीय नगरपरिषद/ नगरपंचायत क्रिडा स्पर्धा सांस्कृतिक महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यामध्ये नांदेड जिल्ह्यातील विविध नगरपरिषदेतील कर्मचारी यांनी सहभाग नोंदविला आहे. त्यामध्ये उमरी नगरपरिषद कार्यालयातील कर्मचारी कु.कांचन पडलवार, करनिर्धारण अधिकारी यांनी रांगोळी या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. तसेच विनोद उत्तमराव सावंत, संगणक अभियंता यांनी पोहोण्यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे. तर शंकर प्रकाश माने, लिपीक यांनी लांब उडी या स्पध्येमध्ये प्रथम क्रमांक मिळविला तर माधव गणपत जाधव यांनी ४०० मीटर व १०० मी अंतरावर धावण्यामध्ये तृतीय क्रमांक मिळविला आहे.

सदर क्रीडा स्पर्धेत उमरी नगर परिषदेतील मुख्याधिकारी निलम कांबळे यांच्यासह लेखापाल बालाजी चवरे, विनोद सावंत, कैलास येमेलवाड, विशाल बाराते, कांचन पडलवाड, गणेश मदने, सचिन गंगासागरे, चंद्रकांत श्रीकांबळ, सूर्यकांत माळवतकर, गंगाधर पवार, शंकर माने, माधव जाधव, आकाश खंदारे, सुनंदा खंदारे, शहनाज बेग, मीरा सोनकांबळे आदी कर्मचारी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

# जलजिवन मिशन अंतर्गत होत असलेल्या बोगस कामाची चौकशी करा : काशिनाथ शिंदे

## आमरण उपोषण करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**इस्लापूर,दि. १० जानेवारी**

इस्लापूर येथे होत असलेल्या जलजिवन मिशन अंतर्गत च्या बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कायद्याचा बडगा उगारावा. अशी मागणी भाजपाचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी जलजिवन प्राधीकरण विभागाचे अधीक्षक अभियंता यांची प्रत्यक्ष भेट घेऊन केली असून, तात्काळ चौकशी होवून दोषींवर कारवाई न झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशारा शिंदे यांनी दिला आहे.

अधीक्षक अभियंता प्राधिकरण विभाग नांदेड यांना दिलेल्या निवेदनात शिंदे यांनी म्हटले आहे की, शासनाकडून हर घर जल चे उद्दिष्ट राबविण्यात येत असून, या



अंतर्गत इस्लापूर येथे सन २०२२ ला ७ कोटी ६७ लक्ष ८६ हजार रूपये खर्चाची प्रभावी पाणी पुरवठा योजना मंजूर झाली. दि. १४ जुलै २०२२ ला तांत्रिक मान्यता मिळून दि. २७ डिसेंबर २०२२ ला कार्यारंभ आदेश काढण्यात आला. या मध्ये अप्रोच चॅनल, आवक विहिर, जोड घर विहिर, जोडपूल,अशुद्ध पंपिंग मशीन, जलशुद्धीकरण केंद्र, शुद्ध जल पंपिंग मिशन, पाण्याच्या उंच दोन टाक्या, गावात पाईपलाईन, घरोघरी नळजोडण्या आदि महत्त्वपूर्ण कामे करणे अपेक्षित होते.

परंतू संबंधित यंत्रणेने शासनाच्या अंदाज पत्रकाला बासनात गुंडाळून हि सर्व कामे, जे की,पाईपलाईन अंदाज पत्रकात दिल्या प्रमाणे खोल न खोदता केवळ अर्धा एक ते दोन फूट खोल खोदून जमिनीत बुजविण्यात आली आली आहेत. घर घर नळ जोडण्या करण्यात आल्या नाहीत, जवळपास एक वर्षापुर्वी गावातील सर्व मुख्य रस्ते खोदून त्यात पाईप टाकले ते खड्डे बुजवून रस्त्याची दुरूस्ती केली नसल्याने सध्या या अंतर्गत रस्त्यावरून पायी चालणे ही अवघड होवून बसले आहे. वाहणे चालविणे तर जिवघेणे ठरत आहेत.

सदरील कामावर जल प्राधिकरण विभागाचा एक ही अभियंता येत नसल्याने ठेकेदार मनमानी पद्धतीने बोगस व निकृष्ट दर्जाचे काम उरकून जनतेच्या माथी मारल्या जात आहे. संबंधित ठेकेदार व कामचुकार प्राधिकरण विभागांच्या अभियंत्यांवर कायदेशीर कारवाई करावी. अशी मागणी भाजपचे जिल्हासचिव काशिनाथ पाटील शिंदे यांनी अधिक्षक अभियंता यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात केली असून, प्रशासकीय यंत्रणेकडून कारवाईस टाळाटाळ अथवा विलंब झाल्यास लोकशाही मार्गाने आमरण उपोषण करण्यात येईल. असा इशाराही काशिनाथ शिंदे यांनी दिला आहे.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, 'ज्ञानतीर्थ' परिसर, विष्णुपुरी, नांदेड.

**दीक्षान्त समारंभ सूचना**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा सत्ताविसावा दीक्षान्त समारंभ बुधवार दि. २९ जानेवारी, २०२५ रोजी सकाळी ११:०० वा. दीक्षान्त मंचावर विद्यापीठाचे कुलपती मा. सी.पी. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. या समारंभास सन्माननीय अतिथी म्हणून प्रा. मा. भूषण पटवर्धन, माजी उपाध्यक्ष विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली हे उपस्थित राहणार आहेत. तसेच विद्यापीठाचे मा. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या उपस्थितीत हा समारंभ संपन्न होणार आहे.
सदरील दीक्षान्त समारंभा संबंधीची विद्यार्थ्यासाठी आवश्यक असलेली सर्व माहिती विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in या संकेस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

स्वा/-
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

# निवडणुक खर्च सादर न करणारे १०४५ जण पाच वर्षासाठी निवडणुक लढविण्यास अपात्र

## जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचा निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

हिंगोली जिल्ह्यात ग्रामपंचायत निवडणुकीनंतर खर्च सादर न करणाऱ्या १०४५ जणांना पाच वर्षासाठी निवडणुक लढविण्यास अपात्र ठरविण्यात आले आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी नुकतेच काढले आहेत. त्यामुळे अपात्र लोकांना पुढील लढविणे कठीण होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील ५६३ ग्रामपंचायतीच्या निवडणुका जानेवारी २०२१ मध्ये झाल्या आहेत. या निवडणुकीत गावपातळीवरून विविध प्रभागातून उमेदवारी उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यानंतर निवडणुक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत उमेदवारांनी खर्च सादर करणे आवश्यक होते. मात्र जिल्ह्यातील १०४५ जणांनी निवडणुकीत झालेल्या खर्चाची माहितीच तहसील कार्यालयाकडे सादर केली नाही.

यामध्ये बहुतांश पराभूत उमेदवार असून निवडणुकीची मतमोजणी झाल्यानंतर त्यांनी पुन्हा खर्च सादर करण्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे प्रशासनाने त्यांना वेळोवेळी नोटीस पाठवून निवडणुक खर्च सादर करण्याबाबत सुचनाही दिल्या होत्या. मात्र नोटीसकडे संबंधित उमेदवारांनी दुर्लक्ष केल्याचे चित्र होते. त्यावरून प्रशासनाने त्यांना अंतिम नोटीस सादर करून सुनावणीसाठी हजर राहण्याच्या सूचना दिल्या. मात्र अनेकजण सुनावणीसाठीही गैरहजर राहीले. यानंतर जिल्हा प्रशासनाने १०४५ जणांवर खर्च सादर न केल्याच्या कारणावरून पाचवर्ष निवडणुक लढविण्यास अपात्र ठरविले आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी काढले आहेत. विशेष म्हणजे निकालाच्या दिवसापासून पाच वर्ष निवडणुक लढविण्यास अपात्र केल्यामुळे पुढील दोन वर्षात होणाऱ्या ग्रामपंचायत निवडणुकीत या उमेदवारांना सहभाग घेणे कठीण होणार आहे. खर्च सादर न केल्यामुळे पाच वर्षासाठी अपात्र ठरविण्यात आलेल्या उमदेवारांमध्ये औंढा नागनाथ तालुक्यातील २०८, कळमनुरी तालुक्यातील १४६, हिंगोली तालुक्यातील ११२, सेनगाव तालुक्यातील ३४५, वसमत तालुक्यातील २३४ जणांचा समावेश आहे.

# अहिल्यादेवी होळकर विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

## आ. नवघरे यांनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १० जानेवारी**

शिक्षण विभाग,वसमत व अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालय,वसमत यांच्या संयुक्त विद्यम ाने ५२ वे वसमत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन आयोजन करण्यात आले होते.

या विज्ञान प्रदर्शनाच्या उद्घाटन कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे अध्यक्ष प्रा. बी.डी.कदम तर उद्घाटक म्हणून आमदार राजुभय्या नवघरे, विशेष उपस्थिती म्हणून नायब तहसीलदार डॉ.डोणगावकर, गट शिक्षणाधिकारी सतीश काष्टे, संस्थेचे सहसचिव संदीप कदम, मुख्याध्यापिका सौ.सरिता शिवाजी पतंगे,केंद्र प्रमुख संदीप वाघमारे, पर्यवेक्षिका सौ. शामल मोघेकर,तर परीक्षक म्हणून प्रा. देशमुख,प्रा. श्री तोटेवार, प्रा. भारस्वाडकर, प्रा.श्रीमती भोसले उपस्थित होते.या वसमत तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटाचे ७०,माध्यमिक गटाचे २५,शिक्षकांचे १२ प्रयोग सहभागी झाले होते. आम दार राजूभय्या नवघरे यांनी प्रत्येक बालवैज्ञानिक यांच्या प्रयोगास भेट देऊन चर्चा केली.या विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक गटात सर्व प्रथम जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माळवटा, द्वितीय क्रमांक जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आंबा, तृतीय अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालय, वसमत व उत्तेजनार्थ म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाखारी गुणानुक्रमे ठरले. याच गटातून दिव्यांग मधून जवाहर बालक मंदिर,वसमत तर आदिवासी म्हणून अनुदानित प्राथमिक शाळा सिरली गुणानुक्रमे ठरल्या. माध्यमिक गटात प्रथम जिल्हा परिषद प्रशाला,वसमत, द्वितीय अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालय, वसमत,तृतीय बहिर्जी स्मारक विद्यालय, वसमत, उत्तेजनार्थ म्हणून निवासी हायस्कूल, बाराशिव गुणवंत ठरले. दिव्यांग गटात रमेश वडपुरकर माध्यमिक विद्यालय, खांदेगाव व आदिवासी गटात अनुदानित माध्यमिक आश्रम शाळा सिरळी गुणवंत ठरले.

शैक्षणिक साहित्य गटात प्राथमिक गटात जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कौठा तर माध्यमिक गटात बहिर्जी स्मारक विद्यालय,आंबा चोंडी व प्रयोग शाळा सहाय्यक / परिचर गटात मॉडर्न उच्च माध्यमि क विद्यालय,वसमत गुणवंत ठरले. सर्व गुणवंत बालवैज्ञानिक यांचे स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.या कार्यक्रमास सर्व केंद्रप्रमुख, विषयतज्ञ, अहिल्यादेवी होळकर कण्याविद्यालयाचे शिक्षक कर्मचारी वर्गाने परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिटकर एलाप्पा यांनी केले.

# दुसऱ्या दिवशीही अतिक्रमणधारकांवर पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**



शहरात वाहतुकीस अडथळा करणाऱ्या अतिक्रमण धारकांवर दुसऱ्या दिवशीही शहर पोलिस, वाहतुक शाखा आणि नगर पालिकेच्यावतीने कारवाई करण्यात आली. शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांच्यासह पालिकेचे कर्मचारी, वाह-तुक शाखेचे कर्मचारी यांनी शहरातील रस्त्यावर अतिक्रमण करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमण धारकांवर कारवाई करीत अतिक्रमण काढण्यात आले. येथील गांधी चौक, महावीर चौक, जवाहर रोड तसेच इतर ठिकाणी अतिक्रमण धारकांनी रस्त्यावर अतिक्रमणे केली होती. त्यामुळे वारंवार वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. प्रशासनाने याची गंभीर दखल घेत ही कारवाई सुरू केली आहे. रस्त्यावर कोणीही वाहने उभी करू नयेत, अतिक्रमण करू नये. अतिक्रमण केल्यास कारवाई करण्याचा इशारा प्रशासनाच्यावतीने देण्यात आला आहे.

# जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी घेतला गिरगाव आरोग्यवर्धिनी केंद्राचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

जिल्हाधिकारी अभिनव गोयल व मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी आरोग्यवर्धिनी केंद्र गिरगाव येथे भेट देऊन पाहणी केली.

तसेच यावेळी प्रामुख्याने एनक्यूएएस, कायाकल्प, आरसीएच पोर्टल, एनसीडी पोर्टल या सर्व आरोग्य विषयक कार्यक्रम ाचा आढावा घेत मार्गदर्शन केले. यामध्ये सर्व निर्देशांकानुसार (इंडिकेटर) शंभर टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्याचा सूचना बैठकीमध्ये देण्यात आल्या.

यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, गटविकास अधिकारी उमाकांत तोटावाड, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सुनील देशमुख, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडुरंग फोपसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संदीप काळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विनोद आतुरकर, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी मारोतराव पोले, जिल्हा गुणवत्ता आश्वासन समन्वयक डॉ. प्रशांत पुठावार, साथरोग तज्ञ डॉ. इनायत खान, सनियंत्रण व मूल्यांकन अधिकारी अमोल कुलकर्णी, वैद्यकीय अधिकारी डॉ. शशांक कदम, डॉ. वैजनाथ सूर्यवंशी, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. रविकुमार करवंदे, डॉ. कोमल एगडे, डॉ. शरद अडकीने, औषध निर्माण अधिकारी गणेश चव्हाण यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्राच्या गटप्रवर्तक व आशा वर्कर उपस्थित होत्या.



**हिंगोली– मकर संक्रांतीनिमित्त येथील बाजारपेठ फुलली असून मातीपासून तयार केलेले सुगडे, विविध प्रकारची वाण, रंगीबेरंगी सुगडे, ऊस, बोर, जांब, शेंगा आदी साहीत्य विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर आले असून खरेदीसाठी महिलांची गर्दी होत आहे. छाया– विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### माधुरी शास्त्री यांना योग रत्न पुरस्कार



हिंगोली– माधुरी शास्त्री यांना योग रत्न पुरस्काराने योग ऋषी स्वामी रामदेव यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. वीस वर्ष अखंड योग सेवेबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. पतंजली योग समितीच्या माध्यमातून हिंगोली, नांदेड, लातूर आणि वाशिम जिल्ह्यामध्ये केलेल्या कार्याची दखल घेत हरिद्वार येथे राष्ट्रीय कार्यकारणी बैठकीमध्ये उत्कृष्ट योग सेवेबद्दल योगरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. पतंजली योग समिती महिला पतंजली योग समिती भारत स्वाभिमान न्यास इतर योग संघटनांच्या वतीने ब्राह्मण संघटनांच्या वतीने विविध महिला संघटनेंकडून सम ाजातील सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रिडा स्पर्धा

हिंगोली– समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद हिंगोली च्या वतीने जिल्हास्तरीय दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन शहरातील संत नामदेव पो-लीस कवायत मैदानावर करण्यात आले. या स्पर्धेचे उद्घाटन अप्पर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, समाज कल्याण अधिकारी राजू एडके, सामाजिक न्याय विभागाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड, दिव्यांग विभागाचे राऊत आप्पा, सहाय्यक लेखाधिकारी प्रशांत मोरे, वैजनाथ तोंडसुरे, इबीतदार, नागेश गुठ्ठे, राजकुमार झगडे, अशोक पाटील, एम.के.शिंदे, आशिष पिंगळकर, एल.टी. मुंडे, लामतुरे, यांच्यासह इतरांची उपस्थिति होती. हिंगोली जिल्ह्यातील २० दिव्यांग शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

# दुचाकीवर मोठी रक्कम वाहतूक करू नये– पोलिस अधीक्षक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**

वाशिम येथील व्यापाऱ्याच्या सव्वा कोटी रूपयांच्या लुट प्रकरणांमध्ये हिंगोली जिल्ह्यातील पोलिस दलास सतर्कतेचे आदेश देण्यात आले असून व्यापाऱ्यांनी मोठ्या रकमा दुचाकीवर वाहतुक करून नये असे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.

वाशिम येथे एका व्यापाऱ्यास चाकूचा धाक दाखवून सव्वा कोटी रूपयांची रक्कम चोरट्यांनी पळवली. सदर घटनेतील आर-ोपी हिंगोलीकडे येण्याची शक्यता लक्षात घेऊन हिंग-ोली जिल्ह्यात गुरूवारी रात्रभर नाकाबंदी करण्यात आली होती. या नाकाबंदी दरम्यान शेकडो वाहनांची तपासणी करण्यात आली. मात्र चोरटे हिंगोलीकडे आलेच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्या-तील पोलिस दलाला सतर्कतेचे आदेश दिले आहेत. मुख्य मार्गावर तसेच वर्दळीच्या ठिकाणी गस्त ठेवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. याशिवाय सर्व आडत व्यापारी, कृषी बाजार व्यापारी तसेच मोठी रक्कम वाहतुक करणारे सर्व मोठे व्यापारी, सोनेचांदी व्यापारी, इतर मोठे दुकानदार यांनी मोठी रक्कम वाहतुक करतांना काळजी घ्यावी. मोठी रक्कम दुचाकीवर शक्यतो नेऊ नये. रक्कम नेतांना शक्यतो चारचाकी वाहनांचा वापर करावा, गाडीत किमान तीनचार लोक असावेत, तसेच रक्कम बँकेतून काढतांना आजुबाजुला कोणीही रेकी करीत आहे का याची खात्री करावी असे आवाहन पोलिस अध-ीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे. व्यापाऱ्यांनी कोणत्याही मदतीसाठी हिंगोली पोलिसांनी संपर्क करावा.

# वसमतमध्ये घरगुती सिलेंडरचा सर्रास काळ्याबाजारात वापर

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १० जानेवारी**

वृक्षतोड थांबविण्यासाठी व महिलांच्या सुविधेसाठी शासनही प्रत्येक गरजूंना व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील कुटुंबालां घरगुती गॅसचा लाभ मिळावा यासाठी शासनामार्फत उज्वला योजनासह विविध योजना शासन राबवत आहे परंतु वसमत येथील धनदांडगे गॅस एजन्सी चालक अधिक दराने गॅसचे सिलेंडर वाहन चालकास व हॉटेल चालकास दिले जात असल्याचे पहावयास मिळत आहे.

वसमत मध्ये घरगुती गॅसच्या टाक्या हॉटेलमध्ये दिसून येत आहे. हॉटेलमध्ये भल्या मोठ्या चु-लीला घरगुती गॅसची छोटीशी टाकी लावलेली दिसून येत आहे तर विविध वाहनात पेट्रोल किंवा डिझेल ऐवजी घरगुती गॅसच्या टाक्यांचा वापर होत आहे व हॉटेल चालकांना वाहन चालकांना सहज घरगुती गॅस उपलब्ध होत आहे. विशेष म्हणजे शहरांमध्ये रात्री बे रात्री देखील घरगुती गॅसचे सिलेंडर हॉटेल चालकाला व वाहनचालकाला सहज उपलब्ध होत आहे. घरगुती गॅसचा वापर गरजू ग्राहकांना करायचा असेल तर रीतसर ऑनलाइन पद्धतीने नोंदणी करावी लागत आहे परंतु हॉटेल चालकांना व वाहन चालकांना हे सहज उपलब्ध होत आहे. गोडाऊनमध्ये मोठ्या प्रमाणावर घरगुती गॅस सिलेंडरचा साठा उपलब्ध असतो. रात्री बे रात्री या टाक्या कोणाच्या आदेशाने देण्यात येते याचा शोध लावणे देखील तितकेच गरजेचे आहे. विशेष म्हणजे असे प्रकार घडत असेल तर विशेष पथक तयार करून संबंधित एजन्सी धारकावर कायदेशीर कारवाई केल्यास घरगुती गॅसचा काळाबाजार सहज थांबेल दुसरीकडे रीतसर नोंदणी करूनही योग्य वेळी गॅस उपलब्ध होत नसल्याने नागरिक त्रस्त झाले एजन्सी मार्फत घरपोच येणाऱ्या गाडीमध्ये वजन काटा नसतो.

# उमेद अभियानामार्फत खरेदीदार व विक्रेता यांचे संमेलन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० जानेवारी**



महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोंन्नती अभियान जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हिंगोली अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांनी उत्पादित केलेल्या माल-ाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने राज्य अभियान व्यवस्थापन कक्ष मुंबई यांच्या सूचनेप्रमाणे माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले आणि प्रकल्प संचालक नामदेव यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास-तरीय व विभागस्तरीय मिनी सरस विक्री प्रदर्शनी दिनांक ०६/०१/२०२५ ते १०/०१/२०२५ या कालावधीत जिल्हा परिषद कन्या शाळा पूर्ण मैदान या ठिकाणी आयोजीत करण्यात आले आहे.

दिनांक ०८/०१/२०२५ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी श्रीमती नेहा भोसले यांच्या म ार्गदर्शनाखाली प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्या अध्यक्षतेखाली विक्रम सारस्वत यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील खरेदीदार व विक्रेते यांचे संमेलन घेण्यात आले. या बैठकीप्रसंगी खरेदीदार म्हणून नितीन पाठमासे ध्रुती इंटरप्रायझेस, रामप्रसाद जाधव लोटस, नंदकिशोर येवते शिवकृपा ट्रेडर्स, महादेव कोतेवर नंदिनी गृह उद्योग, उमेश राऊत सिरसम, निलेश पांडे देवा ब्रोकर्स, देविकांत देशमुख देवकृपा ट्रेडिंग, प्रल्हाद बोरगड सूर्या फार्मर प्रॉडूसर कंपनी, इत्यादी खरेदीदार उपस्थित होते.

या प्रसंगी विक्रेते म्हणून हळदपावडर, मिरची पावडर, अगरबत्ती, विविध पापड, मशरूम, गहू, सोयाबीन, ज्वारी, हळकुंड, तूर विविध डाळी,यासारखी विविध प्रकिऱ्या केलेले पदार्थ व अन्नधान्या उत्पादक/ विक्रेते उपस्थित होते. या बैठकीमध्ये नामदेव केंद्रे यांनी प्रास्ताविक करून सर्व खरेदीदार यांना उमेद अभियाना मार्फत आपल्या मागणीनुसार विविध उत्पादने पुरवठा करू शकतो याची शाश्वती देऊन मार्गर्शन केले तसेच विक्रम सारस्वत जिल्हा अभियान व्यवस्थापक यांनी पॅकेजिंग व लेबलिंग वर भर देऊन पुरवठा करण्याबाबत म ार्गदर्शन केले तसेच लक्ष्मी मुटकुळे, वर्षा मसुरे, रेखा कावरखे यांनी आपल्या उद्य-ोगाची यशोगाथा सांगून मार्केट उपलब्ध करून दिल्याबद्दल समाधान व्यक्त केले या बैठकीचे सूत्र संचालन राजू दांडगे तालुका अभियान व्यवस्थापक यांनी केले आभार राम मेकाले जिल्हा व्यवस्थापक विपणन यांनी केले. या बैठकीसाठी आयोजनासाठी ओमप्रकाश गलांडे जिल्हा व्यवस्थापक,मिलिंद कुकडे तालुका अभियान व्यवस्थापक, विष्णू खाडे, लक्ष्मण सातपुते, संतोष भोसकर व सर्व तालुका व्यवस्थापक, प्रभाग समन्वयक यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat

# छत्रपती संभाजीनगर



## बिडकीन येथील वरद हॉस्पिटल अँड आयसीयु तर्फे दर्पण दिनानिमित्त पत्रकार बांधवांचा गौरव सत्कार



बिडकीन दि १० जानेवारी : पैठण तालुक्यातील बिडकीन येथील वरद हॉस्पिटल अँड आय सी यु च्या वतीने दि ६ जानेवारी रोजी दर्पण दिनानिमित्त बिडकीन पत्रकार बांधवांचा सत्कार करण्यात आला,वरद हॉस्पिटलच्या वतीने पत्रकार बांधवांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली, या कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षस्थानी पैठण तहसीलदार सारंग चव्हाण, होते तर प्रमुख पाहुणे म्हणून बिडकीन सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांची उपस्थिती होती कार्यक्रम सुरुवातीला आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून पुजन करून दीप प्रज्वलन करुन अभिवादन करण्यात आले, वरील मान्यवरांचे डॉ. सुरेश जंगले व जागृती जंगले, यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, या कार्यक्रमास उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, व आरोग्य तपासणी रिपोर्ट देण्यात आले, यावेळी वरद हॉस्पिटलचे संस्थापक डॉ सुरेश जंगले व डॉ जागृती सुरेश जंगले यांनी हॉस्पिटल विषयी माहिती देऊन मनोगत व्यक्त केले, तसेच तहसीलदार सारंग चव्हाण व सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांनी पत्रकार बांधवांना मोलाचे मार्गदर्शन केले, यावेळी तहसीलदार सारंग चव्हाण,सपोनि निलेश शेळके, मंडळ अधिकारी रविंद्र जोशी, स्थानिक गुन्हा शाखेचे एस एस कदम,डॉ. सुरेश जंगले, डॉ जागृती जंगले, डॉ श्याम हिवरकर, ज्येष्ठ पत्रकार नंदकुमार वैद्य, अरुण देविदास,हसन चाऊस, विजय शेजुळ,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष अली इनामदार, उपाध्यक्ष गणेश सोनवणे, उपाध्यक्ष इलियास शेख, सचिन रवि गायकवाड,अलिम शेख, कलिम इनामदार,किरण औटी, फिरोज मिर्झा, विष्णू लगाने , आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती, तसेच वरद हॉस्पिटल अँड आय सी यु चे सर्व कर्मचारी यांनी यावेळी परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल गरड यांनी केले तर आभार प्रदर्शन निलेश राजपुरे यांनी केले कार्यक्रम संपन्न नंतर स्नेहभोजन आयोजन करण्यात आले होते.

## कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल येथे स्नेहसंमेलन संपन्न



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१० जानेवारी

कै.बाबुरावजी काळे मराठी स्कुल सोयगाव मध्ये वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.बुधवार रोजी वक्तृत्व स्पर्धा तसेच फॅन्सी ड्रेस स्पर्धा व रांगोळी स्पर्धा,काव्य वाचन स्पर्धा घेण्यात आली काव्य संमेलनाचे उद्घाटक सोयगाव येथील कवीवर्य माणिक सोनवणे यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.त्याचप्रमाणे शाळेतील ४० विद्यार्थ्यांनी या काव्यवाचनात सहभाग घेऊन आपल्या कविता सादर केल्या या काव्यवाचनाचे परीक्षक कवीवर्य माणिक सोनवणे व प्रा.डॉ. साईराज तडवी यांनी परीक्षण केले.आणि विद्यार्थ्यांना कवी माणिक सोनवणे यांनी त्यांची पाऊसपाणी ही गाऊन सादर केली तसेच शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.या वेळी शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलिस,उपमुख्याध्यापक सागर घाटे,मार्गदर्शक प्रा.डॉ. दादासाहेब पवार,संस्था प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे,मनिषा पाटील,शाळेतील शिक्षिका व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.या काव्य वाचनाचे सुत्रसंचलन सागर घाटे यांनी केले तर आभार ज्ञानेश्वर एलिस यांनी मानले.

## सुरक्षितता बाळगण्यात आहे 'हिरोगिरी': दिलीप स्वामी



छत्रपती संभाजीनगर, दि.१०(जिमाका):- वेगमर्यादेचे उल्लंघन करुन स्टंट करण्यात हिरोगिरी नसून;सुरक्षितता बाळगून वाहने चालविण्यात खरी हिरोगिरी आहे,अशा शब्दात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी युवक युवतींना आवाहन केले.

रस्ता सुरक्षा अभियान २०२५ चा प्रारंभ आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात रस्ते सुरक्षा अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, महामार्ग सुरक्षा पथकाच्या पोलीस अधीक्षक रुपाली दरेकर, प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय काठोळे, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी मनिष दौंड, राज्य परिवहन महामंडळ विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर, पोलीस उपायुक्त वाहतुक शिलवंत नांदेडकर, अधीक्षक अभियंता एस.एस. भगत, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. शशिकांत ढिकले आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी म्हणाले की, सुरक्षा केवळ रस्त्यावरच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आवश्यक आहे. समन्वय,सतर्कता आणि संयम अंगी बाळगला की सुरक्षित जीवनाचे समाधान लाभते. रस्ते सुरक्षिततेसाठी वाहनांची देखभाल दुरुस्ती वेळेवर करणे, वाहतुक नियमांचे पालन, व्यसनमुक्त राहण्याने आपला व आपल्यासोबत इतरांचाही प्रवास सुरक्षित होतो. 'वाहनाचे स्टेअरिंग हे डेअरिंग दाखविण्याची जागा नाही', याचे भान वाहन चालवितांना असले पाहिजे. अपघात कमी करण्याचा संकल्प यानिमित्ताने सगळ्यांनी करावा. रस्त्यावर सुरक्षितता बाळगण्यात हिरोगिरी आहे, असे आवाहन त्यांनी केले.

### प्रत्येक अपघात टाळता येतो- डॉ. विनयकुमार राठोड

प्रत्येक अपघात हा थोड्याशा खबरदारीने, काळजीने, उपाययोजनांनी टाळता येऊ शकतो. केवळ हलगर्जीपणा, अतिआत्मविश्वास, अनाठायी धाडस यामुळेच अपघात होत असतात. प्रत्येकाने खबरदारी बाळगली तर प्रत्येक अपघात टाळता येऊ शकतो,असे प्रतिपादन पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी केले.

प्रास्ताविकात विजय काठोळे म्हणाले की, आपल्या जिल्ह्यात गेल्या वर्षभरात ६७० मृत्यू हे रस्ते अपघातात झाले आहेत. हे सर्व मृत्यू आपण टाळू शकलो असतो. केवळ हेल्मेट न वापरल्याने त्यातील अनेक मृत्यू झाले आहेत. 'परवाह अर्थात केअर', असे या वर्षीच्या अभियानाचे ब्रीद वाक्य आहे,असे त्यांनी सांगितले. रुपाली दरेकर, डॉ. देशमुख यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माहिती पत्रकाचे प्रकाशन करण्यात आले तसेच प्रबोधनपर चित्रफितींचे प्रदर्शनही करण्यात आले. सविता पवार यांनी सूत्रसंचालन केले.

## जैन टॅगच्या प्रदर्शनीचे उद्घाटन संपन्न



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - महिला सक्षमीकरण करण्यासाठी जैन टॅग या महिला ग्रुप तर्फे आज या प्रदर्शनीचे उदघाटन अग्रेसन भवन सिडको येथे आशु दर्डा, आल्पा जैन, पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, मिस्टर फुड राईटचे संचालक संदिपसिंग सी.ए.रैपाली बोथरा, मनिषा भंसाली, पंचायत चे माजी अध्यक्ष ललीत पाटणी, विश्वस्थ महावीर ठोले यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कार्यकमाचे सुत्रसंचालन रिना ठोले यांनी केले. तर स्वागत गित किर्ती पाटणी यांनी गायले. कार्यकमाचे प्रोजेक्ट चेअरमेन जैन टॅग अध्यक्षा श्श्वेता कासलीवाल, जयश्री लोहाडे, पुर्वा कासलीवाल व श्श्वेता गंगवाल हया होत्या.

या प्रदर्शनीमध्ये महिलांनी घरैन बनुन आलेल्या पदार्थाचे प्रदर्शन लावले होते. जैन टॅग व्दारा नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी योजना राबविल्या जातात. त्याच अंतर्गत महिलांनी घरी बनविलेल्या वस्तुला चालना मिळावी प्रसिध्दी मिळावी या हेतुने हे प्रदर्शन लावण्यात आले होते. या प्रदर्शनासाठी सर्व स्तरातील समाज बांधवांना मोफत प्रवेश ठेवण्यात आला होता.

या प्रदर्शनामध्ये ७० महिलांनी आपला सहभाग नोदविला होता. या प्रदर्शनीमध्ये नवजीवन मतीमंद मुला मुलींनी बनविलेल्या सस्तुचे सुध्दा पदर्शन यावेळी लावण्यात आले होते. यावेही आशु दर्डा यांनी सांगीतले की, जैन टॅग या ग्रुपचे कार्य अत्यंत प्रशंसनीय आहे. व नेहमी सामाजिक व जनकल्याणारी योजना राबवतात. या बददल त्यांचे कौतुक करैन अभिनंदन केले.

यावेळी शर्मिला गांधी प्रमोद पाटणी, अॅड.अनिल कासलीवाल, पदम गंगवाल, समिर ठोले, अनुज दगडा, राहुल पांडे, राजेश कासलीवाल, शैलेश पहाडे, सचिन लोहाडे यांच्यासह समाज बांधवांची उपस्थिती होती. कार्यकम यशस्वी करण्यासाठी जैन टॅगच्या अध्यक्षा श्श्वेता कासलीवाल, उपाध्यक्ष पुर्वा कासलीवाल, सचिव जयश्री लोहाडे, कोषाध्यक्ष श्श्वेता गंगवाल, जैन टॅगच्या संरक्षिका अनुपमा दगडा, दिपीका बडजाते यांच्यासह रिचा कासलीवाल, याशिका पांडे, स्वाती कासलीवाल, छाया कासलीवाल, रचना पहाडे, नेत्रजा कासलीवाल, मिताली काला, राणु सेठी, सिमा बडजाते, सारिका बडजाते, किर्ती पाटणी,उज्वला पाटणी, सपना पाटणी, पुजा झांजरी आदींनी परिश्रम घेतले.

## सनातन प्रतिष्ठानचे पदाधिकारी शिंदेंसेनेत



तभा वृत्तसेवा

कन्नड :- शहरातील सनातन प्रतिष्ठानच्या युवकांनी दि.०९ रोजी आनंद दिघे आश्रम ठाणे येथे शिवसेनेत प्रवेश केला आहे

खासदार संदीपान भुमरे,जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत, आमदार संजना जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सनातन प्रतिष्ठानच्या युवकांनी प्रवेश केला आहे,आगामी काळातील निवडणुकीत युवकांची फौज असलेल्या सनातन प्रतिष्ठानचा मोठा फायदा महायुतीला होऊ शकतो, सनातन प्रतिष्ठानच्या माध्यमातून शहरासह तालुक्यात युवक जोडलेले आहेत,हे युवक सामाजिक कार्यात अग्रेसर भूमिका बजावतात त्यामुळे त्यांचा फायदा आगामी निवडणुकीत होण्याची चिन्हे आहेत, सनातन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष संदेश पवार,संतोष बनकर , अक्षय केवट , गितेश क्षीरसागर , फैसल शेख, अरबाझ शेख, विशाल खरात,गणेश घुगे , अभिषेक राठोड, रोहन डोंगरे , अवधुत कुंभारे , रोहित महाजन, तन्मय नलावडे,रुपेश राठोड सह युवकांनी प्रवेश केला आहे

## सिल्लोड येथे अनेक वर्षाची परंपरा कायम; दर एकादशीला निघते महिलांची भक्त फेरी



सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.८, सिल्लोड शहरात दर एकादशीला महिला भाविक भक्तांच्या वतीने काढण्यात येणाऱ्या प्रभात फेरीला अनेक वर्षांची परंपरा आहे. ही परंपरा आजही कायम असून एकादशीच्या दिवशी डोक्यावर तुळशीवृंदावन, हातात वीणा, टाळ मृदंगाच्या नादात भल्या पहाटे महिलांची ही भक्त फेरी निघते. सडा रांगोळीने या भक्त फेरीचे स्वागत गावकरी करतात. आधुनिक युगातही ही परंपरा कायम असून दिवसागणिक या फेरीमध्ये महिला भगिनींची संख्या वाढत आहेत.

सिल्लोड शहरातील जुन्या गावात पारंपरिक सण उत्सव आजही मोठया उत्साहाने साजरा केला जाते. त्यात बालाजी उत्सव, श्री म्हसोबा महाराज यात्रा , पोळा यासारख्या सण उत्सवाचा उल्लेख करावा लागेल. त्यात दर एकादशीला कीर्तन व विविध प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात येतात.

दर एकादशीला महिला भाविक भक्तांची प्रभात फेरी निघते. पूर्वी जुन्या गावातील श्री म्हसोबा गल्लीतील गणपती मंदिर ते संत सावता महाराज व विठ्ठल रुखमाई मंदिर पर्यंत ही फेरी निघायची यात आता बदल झाला असून एकादशीला श्री म्हसोबा महाराज मंदिर जवळील विठ्ठल रुखमाई मंदिर ते दुर्गामाता मंदिर ते पुढे माऊली मंदिर पर्यंत ही फेरी मार्गस्थ होवून येथे भजन कीर्तन व आरतीने समारोप होतो. सूर्योदयाच्या आधी अतिशय प्रसन्न वातावरणात ही भक्त फेरी निघते. अलीकडच्या काळात या प्रभात फेरीचे व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. हे पाहून अनेक महिला या फेरीत सहभागी होत आहे. महाराष्ट्राची संस्कृती व वारकरी परंपरा कायम ठेवण्यासाठी तसेच भावी पिढीला याची ओळख व्हावी यासाठी इतर महिलांनी देखील या भक्त फेरीत सहभागी व्हावे असे अवाहन भक्त फेरीतील महिलांनी केली आहे.

ही परंपरा कायम ठेवण्यासाठी नानुबाई देविदास सोनवणे, कचराबाई भाग्यवंत, सुरेखा काळे, अल्काबाई वाघ , सुमनबाई वाकडे, नंदाबाई गायकवाड, रेखाबाई जाधव, अरुणा वैद्य, लक्ष्मीबाई शिंदे, लताबाई भाग्यवंत, मीना जाधव, मुक्ताबाई काकडे, पद्मबाई बन्सोड लिलाबाई बोलकर, दगडाबाई, वैशाली सोनवणे, वंदना बन्सोड, कौससाबाई , सखुबाई पंडित, अनिता कुदळ, अरुणा वरपे, सुलाबाई जाधव, बाळूबाई, शारदा गाढवे, ताराबाई कुदळ, सविताबाई कुदळ, नंदाबाई सूर्यवंशी, संगीता भाग्यवंत, सुशीला सोनवणे, विमल जाधव, लता साळवे, गुणाबाई बन्सोड, दशाबाई, सुमनबाई दुधे , अनिता बोलकर, कल्याणी वाकडे, नंदाबाई सोनवणे यासह अनेक महिला परिश्रम घेत आहे.

## लोककलावंत विष्णु मापारी यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार प्रदान



तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.९ जानेवारी

सामाजिक,सांस्कृतिक,लोककला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था संघ नाशिक यांचे वतीने समाजप्रबोधनकार विष्णु विनायकराव मापारी व सिता विष्णु मापारी सोयगाव यांना- २०२५ चा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार भाजपा सह मुख्य प्रवक्ता तसेच वृत्त निवेदक अजित चव्हाण व पत्रकार संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.महेंद्रजी देशपांडे यांचे हस्ते नाशिक येथे प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमाला महाराष्ट्र,गुज रात,मध्यप्रदेश,राजस्थान,कर्नाटक व आंध्र प्रदेश या राज्यांतील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार देण्यात आला.सोयगाव येथील कृषीभूषण अरुण सोहनी,समाजसेवक डिगांबर वाघ,समाजसेवक दत्तु रोकडे,संजय बोरसे यांनाही पुरस्कार देण्यात आला.त्याबद्दल सोयगाव नाट्य पंढरी मध्ये नागरीक महिला विशेषतः युवा वर्गा तर्फे त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. सोयगाव पोलीस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल, पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर,सर्व पोलीस बांधव यांचे वतीने सत्कार करण्यात आला.तसेच सोयगाव शहरातील महिला मंडळ,पौर्णिमा बचतगट,जय भोले मित्र मंडळ नारळीबाग,अध्यक्ष तथा पत्रकार शेख गुलाब मामु,जागरण गोंधळ मंडळातर्फे प्रभाकर महाराज धनगर,अनिल इंगळे,सुनील गुजर,समाजसेवक संजय शहापुरकर,वैद्यकीय अधीक्षक डॉ.दिनाजी खंदारे,सुनिल वानखेडे,नगरसेवक दिपक पगारे,किशोर मापारी,अशोक खेडकर,गजानन कुडके,अमोल मापारी ह.भ.प.सुधन्वा महाराज केनेकर,दुर्गादास केनेकर यांनी अभिनंदन केले आहे.

## पुत्रदा एकादशी निमित्य पैठणला मोठी गर्दी



तभा वृत्तसेवा

पैठण दि १० :- वर्षाची पहिली एकादशी असलेल्या पुत्रदा एकादशी निमित्य शांतिब्रम्ह श्री संत एकनाथ महाराज समाधीचे दर्शन तसेच गोदावरीत स्नान करण्यासाठी आज हजारो भाविकांनी दक्षिण काशी पैठणला भेट दिली असून एकादशीला जोडून शुक्रवारचा आठवडी बाजार आल्याने बाजारपेठेत मोठी गर्दी झाली.

एवढ्या थंडीत सकाळ पासूनच मोक्षघाटावर स्नानासाठी भाविक सरसावले.त्यानंतर नाथ समाधी मंदिर तसेच गावातल्या नाथ दर्शनासाठी भाविकांच्या मोठ्या रांगा लागल्या. अभ्यंग स्नान, काकड आरती, अभिषेक, पद्मपुजन,एकादशीची विशेष पूजा,हरिपाठ ,संध्याकाळची आरती अशी आज मंदिरात पूजेची दिनचर्या होती. एकादशी जोडून मकर संक्रांती सणाचा आठवडी शुक्रवारी बाजार आल्याने यानिमित्त महिला भगिनिंची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

## वृत्तपत्र विद्या विभागाचे आचार्य अत्र्यांचे स्वप्न बामु ने साकार केले

### मध्यमतज्ज्ञ डॉ. वि. ल. धारूरकर यांचे प्रतिपादन



छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी आचार्य अत्रे यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या नावाने मुंबई विद्यापीठात वृत्तपत्र विद्या अभ्यासक्रम मराठी माध्यमात सुरू करण्याची शिफारस केली होती. परंतु , आचार्य अत्रे यांचे स्वप्न १९७३ साली मराठवाडा विद्यापीठाने साकार केले. तेव्हाचे कुलगुरू आर. पी. नाथ यांनी मराठवाडा विद्यापीठात मराठी भाषेत वृत्तपत्र विद्या पदवी अभ्यासक्रम सुरू केला आणि पत्रपंडित स. मा. गर्गे हे या विभागाचे पहिले प्रमुख बनले, असे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील निवृत्त विभाग प्रमुख तसेच माध्यमतज्ज्ञ डॉ. वि. ल. धारूरकर यांनी व्यक्त केले. ते आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे जीवन व कार्य या विषयावर बोलत होते.

सोमवारी, ६ जानेवारी रोजी सिडकोतील कै. नारायणराव उजळंबकर वाचनालयात पत्रकार दिनानिमित्त आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ. धारूरकर पुढे म्हणाले, बाळशास्त्री जांभेकर हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व होते. ते कुशाग्र बुद्धीचे संपादक होते. त्यांनी मराठी पत्रकारितेमध्ये 'दर्पण ची सुरुवात करून एक दीपस्तंभ प्रस्थापित केला. जांभेकर हे विज्ञाननिष्ठ पत्रकार होते. त्यांनी स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केला तसेच महाराष्ट्रात प्रथमतः त्यांनी ख्रिश्चन झालेले श्रीपाद शेषाद्री व नारायण शेषाद्री परळीकर यांचे शुद्धीकरण करून त्यांना पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश दिला. जांभेकरांचे कर्तृत्व अष्टपैलू होते. ते भाषा प्रभू होते. त्यांचे दहापेक्षा अधिक भाषांवर प्रभुत्व होते. शिवाय फ्रेंच, लॅटिन, ग्रीक इत्यादी भाषा त्यांना अवगत होत्या. जांभेकरांनी महाराष्ट्रातील शैक्षणिक विकासाचा पाया घातला. ते बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीचे सेक्रेटरी होते तसेच त्यांनी तरुणांसाठी सोशल अँड सायंटिफिक सोसायटीची स्थापना केली. दादाभाई नौरोजी, भाऊदाजी लाड, यासारख्या त्यांच्या शिष्यांनी पुढे इतिहास घडविला. बाळशास्त्री जांभेकरांनी कोकणातील सहा प्राचीन शिलालेख मराठी भाषेत भाषांतर करून त्यावर संशोधनपर लेख रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई जर्नलमध्ये प्रकाशित केले. ज्ञानेश्वरी ची पहिली प्रत संपादन करून प्रकाशित केली. कुलाबा वेधशाळेचे ते पहिले संचालक होते. जांभेकरांच्या संकल्पनेतील महाराष्ट्र कसा होता, याचेही चित्रण त्यांनी आपल्या भाषणात केले आहे. जांभेकरांनी दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक १८४० मध्ये प्रकाशित केले. य. दि. फडके यांनी जांभेकरांचे वर्णन आद्य समाजसुधारक असे केले आहे. जांभेकरांच्या प्रतिभाशाली आणि पुरोगामी बुद्धिमत्तेमुळे मराठी पत्रकारितेचा भक्कम पाया घातला गेला असेही डॉ. धारूरकर म्हणाले. सोमवारी, ६ जानेवारी रोजी सिडकोतील कै. नारायणराव उजळंबकर वाचनालयात पत्रकार दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात विशेष व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी डॉ. धारूरकर लिखित मराठी पत्रकारितेचा दीपस्तंभ : आचार्य बाळशास्त्री जांभेकर या ग्रंथाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन जेष्ठ पत्रकार स. सो. खंडाळकर यांच्या हस्ते करण्यात आले. खंडाळकर म्हणाले, डॉ. धारूरकर यांचा व्यासंग आणि त्यांच्या अभ्यासाचे प्रतिबिंब या ग्रंथात उमटले आहे. पत्रकारिता हे एक सेवाकार्य आहे आणि पत्रकारांनी अधिकाधिक लोकांचे कल्याण साधण्यासाठी प्रयत्न करावेत, तोच पत्रकारितेचा धर्म आहे.

राजश्री बाविस्कर व उदय सुरंगळीकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रारंभी सुनंदा डबिर यांनी स्वागत गीत सादर केले. या प्रसंगी विजय जोग, डॉ श्यामसुंदर कुडे, शिवाजीराव रामरूले, शरद डबिर, रमाकांत जगत, डॉ. धनवले, जयकुमार भोयरेकर, जी. आर. शिरसे, डॉ. कुलकर्णी, डॉ. सपकाळ, दुर्गादास टाकळकर, दौलतराव म्हस्के, डॉ. सपकाळ आदी उपस्थित होते. अशोक उजळंबकर यांनी सूत्रसंचालन, तर राजश्री बाविस्कर यांनी आभार प्रदर्शन केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## सोयगाव येथे भाजपतर्फे सदस्य नोंदणी अभियान सुरू



सोयगाव,दि.१० जानेवारी : संघटन पर्व सदस्य नोंदणी अभियान २०२४-२५ अंतर्गत भाजपाचे घर चलो अभियान भाजपा प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व महाराष्ट्र प्रभारी रवींद्र चव्हाण,सुहास शिरसाठ भाजपा जिल्हाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर ग्रामीण यांच्या सुचने नुसार भारतीय जनता पार्टीच्या वतीने सोयगाव शहरात भारतीय जनता पक्षाच्या वतीने पदाधिकाऱ्यातर्फे सोयगाव बसस्थानक परिसरात ऑनलाइन सदस्य नोंदणी अभियान राबविण्यात आले.यावेळी गावातील अनेक तरुण युवक,महिलांनी या सदस्य नोंदणी अभिनयानात सहभाग नोंदविला.यावेळी भारतीय जनता पक्षाचे सोयगाव शहर अध्यक्ष तथा माजी उपनगराध्यक्ष योगेश पाटील,वसंत बनकर,सुनील गवांडे,मंगेश सोहनी,प्रमोद पाटील,मयूर मनगटे,आदींनी या अभियानात सहभाग नोंदविला होता.

## वेरूळ आश्रम येथे भारतीय जनता पार्टीची सदस्य नोंदणी



खुलताबाद प्रतिनिधी .वेरूळ येथील कैलास आश्रम ह. भ. प.अभयानंदगिरीजी महाराज,धारेशवर आश्रम धामणगाव येथील ह. भ. प. भरतगिरीजी महाराज यांची भारतीय जनता पार्टीची सदस्य नोंदणी करताना भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर नलावडे तालुका सरचिटणीस सतीश दांडेकर शहर अध्यक्ष परसराम बारगळ,, गणेश हजारी, भाजपा ज्येष्ठ नेते प्रभाकर थोरात, सुखदेव पाटील ठेंगडे, , लक्ष्मण मिसाळ, ज्ञानेश्वर भालेराव, प्रभाकर मिसाळ,लक्ष्मण थोरात, भगवान जातोडे, उल्हास मिसाळ, विनोद ढीवरे, कडुबा साळवे, किसान मिसाळ, विलास काळे,सागर मातकर,संतोष गोमलाडू, बाळू सोनवणे, भाजप कार्यकर्ते उपस्थित होते

## मोतीलाल चुडीवाल यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी - श्रीरामपूर येथील दिगंबर जैन समाजाचे माजी अध्यक्ष, पीपल्स बँकेचे माजी अध्यक्ष व साधना मेडिकलचे संचालक मोतीलाल फकिरचंद चुडीवाल (वय ८७) यांचे अल्पशा आजाराने बुधवार दि.८ जानेवारी निधन झाले. त्यांच्यावर गुरूवार दि.९ जानेवारी श्रीरामपूर येथील अमरधाम स्मशानभूमीत अत्यंसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन भाऊ, दोन मुले, तीन मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. भरत व सचिन यांचे ते वडील होते. तसेच छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी साधना व अर्पणा यांचे ते सासरे होते.

### महापुरुषांचे विचार आपल्या भविष्यासाठी प्रेरणादायी : तहसीलदार कडवकर

## जिजामाता महोत्सवास उत्साहात सुरुवात

तभा वृत्तसेवा

कन्नड:- दि.०९ जानेवारी - जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कै. काशिनाथ पाटील जाधव प्राथमिक विद्यालयात चार दिवसीय जिजामाता महोत्सवास उत्साहात सुरुवात झाली.

जिजामाता महोत्सवाचे यंदाचे २२ वे वर्ष आहे

या महोत्सवाचे उदघाटन तहसीलदार विद्याचरण कडवकर तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ सचिव सागर जाधव यांनी केले.

या महोत्सवा दरम्यान शिक्षक विद्यार्थी, पालक मेळाव्याचे ही आयोजन करण्यात आले होते उपस्थित विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना तहसीलदार विद्याचरण कडवकर साहेब म्हणाले की आपण महापुरुषांच्या विचारांचे पाईक बनणे हे आपल्या भविष्यासाठी प्रेरणादायी असणार आहे.

कार्यक्रमाचे संयोजक तथा जिजामाता परिवाराचे सचिव सागर जाधव यांच्या पुढाकाराने शाळेचे गुणवंत विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील गुणवंतांचा जिजाऊ परिवाराच्या वतीने सन्मान करण्यात आला. यात प्रा.मनोज मोकासे कैलास आमले,डॉ. संजय गायकवाड, साईदास राठोड,सचिन निकम ,संजय जाधव ,मिनाक्षी शिंदे, चंद्रकला ताई शिंदे, संकेत मांदाडे, सोनाली मोरे, चैताली जाधव, सचिन लोखंडे, नितीन मुरकुंडे या सत्कारमूर्तींचा तहसीलदार विद्याचरण कडवकर, प्राचार्य विजय भोसले व सागर जाधव यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला, यावेळी तेजराव निळ, केंद्रप्रमुख बाजीराव ताठे शिवनारायण जैस्वाल, प्रा.योगिराज सोमवंशी सतीश शर्मा, प्रशांत जालनापुरकर,रवींद्र पाटील, अनिल एडके, रवींद्र प्रदीप सनसे,यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश जंजाळ तर आभार प्रदर्शन सचिन भामरे यांनी केले, कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रदीप भोकन ,दीपक जाधव , प्रवीण दाभाडे,जगमोहन मुंडवाडकर ,ज्ञानेश्वर नायकुडे, दत्तात्रय गायके लक्ष्मण पांडव भगवान म्हैसमाळे योगेश कुमावत, सुरज हिरे,सुनीता दापके सुनीता बाविस्कर सीमा राठोड ,रिना काळे, सुभाष जाधव संतोष आग्रे यांनी सहकार्य केले.

## वानरांसह नीलगाय, रानडुक्करांचाही उपद्र्याप



सोयगाव,दि.१० जानेवारी : सोयगाव सह तालुक्यातील परिसरात वन्य प्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असून पिकांचे मोठे नुकसान होत आहे.त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाला असून वन विभागाने लक्ष देण्याची मागणी होत आहे. खरीप हंगामापासून सोयगाव परिसरात रानडुक्कर,वानरे, नीलगाय,लांडगे,लालतोंडी माकडे आदींचा वावर अधिक वाढला आहे.या वन्यप्राण्यांना हाकलण्याचा प्रयत्न केला तर ते अंगावर धावून येऊन दुखापत करीत आहेत.याबाबत अनेक शेतकऱ्यांनी वन कर्मचाऱ्यांना प्राण्यांचा बंदोबस्त करावा,अशी मागणी केली आहे.परंतु रबी हंगाम सुरू झाला तरी अजूनही वन विभागाने लक्ष दिले नाही.परिणामी पिकांच्या नुकसानीत भर पडत आहे.

**नुकसानग्रस्त पिकांच्या पंचनाम्याची मागणी** - रबी हंगामात हरभरा,ज्वारी,गहू,मका,सूर्यफूल आदी पिके बहरात आली आहेत. परंतु वन्यप्राणी पिकांची नासाडी करीत आहेत.वारंवार मागणी करुनही वन कर्मचाऱ्यांचे मात्र या भागाकडे दुर्लक्ष होत आहेत. सोयगाव सह परिसरात रब्बीच्या पिकांचे मोठे नुकसान झालेले आहे.याबाबत पिकांचा पंचनामा करावा,अशी मागणीही शेतकऱ्याने केली आहे.

## मंत्री पंकजा मुंडे यांचा जिल्हा दौरा

छत्रपती संभाजीनगर - राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन विभागाच्या मंत्री पंकजा मुंडे शनिवार दि.११ रोजी जिल्हा दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम याप्रमाणे- शनिवार दि.११ रोजी सकाळी ८. ०० वा. परळी वैजनाथ येथून मोटारीने छत्रपती संभाजीनगर कडे प्रयाण. १०:४५ वा. छत्रपती संभाजीनगर येथे आगमन. ११:०० वा. छत्रपती संभाजीनगर व लातूर विभागातील पशुसंवर्धन विभागाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर. दुपारी १२:३० वा. छत्रपती संभाजीनगर विभागातील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांची आढावा बैठक स्थळ : जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर. ०३.०० वा. छत्रपती संभाजीनगर येथून मोटारीने शिर्डी, जि.अहिल्यानगरकडे प्रयाण.

## कृषी उत्पन्न बाजार समिती जागेचा व्यवहार थांबवा तहसिलदार यांना दिले निवेदन

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१० जानेवारी - कन्नड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेचा व्यवहार थांबवण्याची मागणी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब मोहिते यांनी कन्नड तहसिलदार, दुय्यम निबंधक व सहनिबंधक(सहकार) यांना निवेदन देऊन केला आहे. कन्नड तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची सर्व्हे ७ / मधील ३ एकर १० गुंठे व सर्व्हे ८ मधील ३० गुंठे अशी एकूण चार एकर जमीन बाजार समितीने तालुका प्रक्रिया संस्थेस भाड्याने ९९ वर्षाच्या दिर्घ मुदतीच्या ७ सप्टेंबर १९७२ मध्ये दिली होती. जमीन भाडेतत्वावर दिल्याने मालकी हक्क बाजार समितीचा



आहे.या ४ एकर जागेच्या काही जमिनीवर जिनिंग प्रेसिंगने काही गोडाऊन बांधकाम व मशीनरी खरेदीसाठी औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून ६ लाख रुपये कॅश क्रेडीट कर्ज व मार्च १९९२ मध्ये मध्ये मुदतीचे ४ लाख २२ हजार रुपये कर्ज घेतले होते. जिनिंग प्रेसिंगने घेतलेल्या कर्जाची रक्कम मोठ्या प्रमाणावर झाली आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीने आपली ४ एकर आगा ताब्यात घेण्यात यावी यासाठी समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ठराव घेण्यात आला, परंतु कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती व काही संचालकांनी गुरुवारी ९ जानेवारी २०२५ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय नोंदणी मुद्रांक येथे भाडेपट्टा, विक्री साठी गेल्याचे समजले आहे. औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक याच्याबरोबर २७ गुंठे जमिनीच्या एकरकमी परतफेड ( ओटीएस) न करता सदर २७ गुंठे जमीन नोंदणी कार्यालयात विक्रीसाठी गेल्याचे व नोंदणी कार्यालयात काही संचालकात हातापाई व झटापट झाल्याचे कळल आहे. सदर जमीन नोंदणी करण्यासाठी बहुतांश संचालकाचा विरोध असुनही समितीच्या प्रोसेडिंग मध्ये मध्ये नोंद झाली किंवा ठराव पास झाला की नाही असे बरेच संचालक खाजगीत बोलतात कारण सभेचे वृत्तांकन प्रोसेडिंग समिती मध्ये उपलब्ध नसल्याचे कळते. नोंदणी कार्यालयात होत असलेला व्यवहार चौकशी होईपर्यंत थांबवण्याची विनंती निवेदनात केली आहे. या निवेदनावर शेतकरी सेनेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब मोहिते, तालुकाध्यक्ष संजय मोटे, गणेश शिंदे, अर्जून पवार,रईस सौदागर आदींच्या सह्या आहेत.

## ग्राहकसेवेच्या दर्जात सुधारणा करून वीजबिल वसुलीस प्राधान्य द्या; अरविंद भादिकर यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर : वीज ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा देऊन छत्रपती संभाजीनगर परिमंडलात वीजबिलांची १०० टक्के वसुली करावी. तसेच वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करून ग्राहकाभिमुख विविध योजनांची कामे वेगाने करा, असे निर्देश महावितरणचे संचालक (संचालन) अरविंद भादिकर यांनी दिले.

महावितरणच्या परिमंडल कार्यालयात शुक्रवारी (१० जानेवारी) झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी मुख्य अभियंता पवनकुमार कछोट, अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे (शहर), संदीप दरवडे (ग्रामीण), संजय सरग (जालना), बीना सावंत (इन्फ्रा), शुभांगी कटकधोंड (संचालन), वरिष्ठ व्यवस्थापक लक्ष्मीकांत राजेल्ली (वित्त व लेखा) यांच्यासह परिमंडल कार्यालयातील विभागप्रमुख, सर्व कार्यकारी अभियंते, उपविभागीय अभियंते, व्यवस्थापक (वित्त व लेखा) उपस्थित होते.

यावेळी मंडलनिहाय आढावा घेताना संचालक भादिकर म्हणाले की, वितरण हानी कमी करण्यासाठी महावितरणने ठरवून दिलेल्या कृती आराखड्यानुसार काम होणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्राहकांना वापरानुसार अचूक वीजबिल, ग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलणे, वीजचोरीला आळा घालण्यासाठी नियमित ग्राहक मीटर तपासणी मोहीम, वीजचोरी असलेल्या भागात कोटेड कंडक्टरचा वापर, ग्राहकांना विनाविलंब वीजजोडणी, ग्राहकांच्या विविध तक्रारींचा तातडीने निपटारा यांना प्राधान्य द्या, असे ते म्हणाले. नियामक आयोगाने निर्धारित केलेल्या कालावधीत ग्राहकांना सेवा न दिल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला.

वीजबिल वसुलीसाठी व्यापक प्रयत्न करा. थकबाकीदार कुणीही असो, त्याचा वीजपुरवठा तातडीने खंडित करा. तसेच कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित ग्राहकांसाठी महावितरणने अभय योजना जाहीर केलेली असून त्यामध्ये संपूर्ण व्याज व विलंब आकार माफ आहे. असे असतानाही ग्राहकांचा प्रतिसाद समाधानकारक नसल्याने सर्व थकबाकीदार ग्राहकांची प्राधान्याने तपासणी करणे, अनधिकृत वीजपुरवठा आढळल्यास त्यांच्यावर थेट पोलिसांत गुन्हे नोंदवणे, जर अन्य ग्राहकाच्या नावाने त्या जागेवर नवीन कनेक्शन दिलेले आढळल्यास जुनी थकबाकी त्या नवीन ग्राहकांकडे वळती करणे तसेच विभागवार पथके तयार करून वीजचोरी पकडण्याची मोहीम आखण्याचे निर्देश त्यांनी दिले.

## वाचन संस्कृती जपण्यासाठी 'चला वाचू' समूहवाचन अभिनव उपक्रमाचे आयोजन

पालक-पाल्यांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

वाचनसंस्कृती जपण्यासाठी 'चला वाचू' हा समूह वाचन उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या संकल्पनेत दररोज दहा मिनिटे वाचण्याचे पहिले उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. वाचनापासून दूर असलेले पालक आणि पाल्यांना उपक्रमाशी जोडून घेण्यात येत आहे.

वाचनामुळे माहिती आणि ज्ञानात भर पडून योग्य मार्गदर्शन होते. सद्यस्थितीत अवांतर वाचन करण्यासाठी वेळ काढण्याकडे पालक आणि पाल्यांचा कल नाही. पालकांना वाचनाची आवड नसल्याने पाल्यांनाही वाचनाची आवड निर्माण होत नाही. मोबाईलचा अतोनात वापर मुलांसाठी घातक ठरत आहे. एकाग्रता गमावण्यासोबत वाचनाची सवयही संपुष्टात आली आहे. लहानथोर वाचनापासून दूर जात असल्याचे चित्र आहे. अनेकदा वाचनाची इच्छा असूनही प्रत्यक्ष कृती घडत नाही. जास्त वेळ वाचन करण्याचीही इच्छा दिसत नाही. या पार्श्वभूमीवर शहरातील प्रतिती प्रतिष्ठानने 'चला वाचू' हा अभिनव उपक्रम सुरू केला आहे. श्रीकृष्ण मंदिर वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात ३१ डिसेंबर २०२५ पासून या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी महंत बाभूळगावकर बाबा, महंत नागराज बाबा, महंत न्यायंबास बाबा, महंत सुकीनेकर बाबा, महंत आवेराज बाबा, महंत फलटणकर बाबा, महंत मुकुंदराज बाबा महंत मयंकराज बाबा, साहित्याचार्य श्रीसंतोषमुनी शास्त्री, मुनिश्री सुदर्शन कपाटे आणि भाविक उपस्थित होते.

या संकल्पनेनुसार दररोज रात्री १० वाजता १० मिनिटे वाचन करणे अपेक्षित आहे. रात्री झोपताना चांगले वाचन केल्यास दिवसभरातील ताणतणाव कमी होण्यास मदत होऊ शकते. शिवाय वाचल्याचे समाधान मिळेल आणि वाचनसंस्कृती वाढीस लागेल, असे संयोजकांनी सांगितले.

दरम्यान, या उपक्रमात 'गुगल मीट'द्वारे वाचक एकत्र येतात. एक वाचक पुस्तक वाचत असताना तो भाग पीडीएफ स्वरूपात स्क्रीनवर दाखवला जातो. त्यामुळे सर्वजण वाचन करू शकतात किंवा ऐकू शकतात. या उपक्रमाला पंडित म्हाइंभट लिखित 'लीळाचरित्र' ग्रंथ वाचण्यात आला आहे.

१ पासून सार्वजनिक

दरम्यान, या उपक्रमाची प्रायोगिक सुरुवात १० डिसेंबर रोजी करण्यात आली. सलग २१ दिवस प्रयोग यशस्वी झाल्यानंतर १ जानेवारीपासून उपक्रम सार्वजनिक करण्यात आला आहे. त्यासाठी 'चला वाचू' नावाने व्हाटसएॅप ग्रुप स्थापन करण्यात आला आहे. संतपीठातील महानुभाव प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे आजी-माजी विद्यार्थी आणि तिरीप फाउंडेशनचे सभासद प्रयोगात सहभागी झाले होते. व्हॉट्सएॅप समूहात सहभागी होण्यासाठी ९४०५२७४३७७ या क्रमांकावर संदेश पाठवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# रामोत्सवानिमित्त संत तुकाराम महाराजांचे श्रीरामाविषयीचे चिंतन

दि. २२ जानेवारी २०२४ रोजी आयोध्या येथे प्रभूरामचंद्राची प्राणप्रतिष्ठा संपन्न झाली त्यावेळी पौष शुध्द द्वादशी तिथी होती. तिथीनुसार आज १० जानेवारी २०२५ रोजी प्राणप्रतिष्ठा होऊन एक पूर्ण होत आहे. यानिमित्ताने श्री संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या अभंग गाथेतील रामाविषयीच्या अभंगाचा अभ्यास केला असता त्यांचे द्रष्टेपण दिसून येते.

ऐसा कर घर आवे राम । सब धंदा छोर ही काम ।।

इतने होते काहे खाता । जब तू अपना भूल न जाता ।।

अंतरजामी जानत साचा । मन मे एक और उपर बाचा।।

तुका प्रभू देश बिदेश । भरिया खाली नही लेश ।। (३४९५)

हा अभंग संत श्रेष्ठ जगद्गुरु तुकाराम महाराज यांचे गाथेतील हिंदुस्तानी पदे या विभागातील ३४९५ क्रमांकाचा अभंग आहे. या अभंगातून संतश्रेष्ठ तुकाराम महाराज सूचित करीत आहेत भगवान श्रीरामाचे आयोध्येतील मंदिरात किती साली श्रीरामाची प्राणप्रतिष्ठा होणार? मंदिराचे निर्माण कार्य केव्हा पूर्ण होणार? याचे संकेत अभंगातील क्रमांकातून देत आहेत. तसेच राम मंदिर निर्माण करणेसाठी काय करणे आवश्यक आहे ते सुचित करीत आहेत.

संत तुकाराम महाराज हे दृष्टे महात्मे होते. त्यांना रिद्धी सिद्धी प्राप्त होत्या. त्यांचे त्यांनी अवडंबर केले नाही. परंतु छत्रपती शिवरायांच्या विषयी आवश्यकता भासली त्यावेळेस त्यांनी प्रचिती आणून दिली. वरील अभंगातील

ऐसा कर घर आवे राम । सब धंदा छोर ही काम ।।

या पहिल्या चरणात घरात राम येईल असं कर. यामध्ये आपल्या शरीरातील हृदय मंदिरात श्रीराम यावेत हा अध्यात्मिक अर्थ झाला. परंतु संत तुकाराम यांना आध्यात्मिक अर्थाबरोबर त्याचा वेगळा अर्थ सुचित करावयाचा आहे. आपल्या घरात श्रीरामाला बोलवायचे म्हणजे घरात श्रीरामाची मूर्ती स्थापन करावी असा त्याचा अर्थ नसून श्रीरामाचे घरात राम येण्यासाठी कार्य कर असा त्याचा अर्थ आहे.

श्रीरामाची मंदिरे सर्व गावात आहेत. तीर्थक्षेत्रात आहेत. तेथे त्याची मूर्तीही आहे. त्यामुळे श्रीरामांचे घर, मंदिर आहे ते आयोध्येतच आहे. जसे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे सर्व गावात आहेत परंतु मुख्य स्थान पंढरपूर हे आहे. त्यामुळे अयोध्येतील घरात मंदिरात श्रीराम यावे त्यासाठी संत तुकाराम महाराज म्हणतात,

सब धंदा छोर ही काम । याचा अर्थ सर्व धंदा इतर गोष्टी व 'काम' सोड. म्हणजे श्रीराम घरात येतील. आपल्या चित्तातील काम आपल्या नष्ट झाला म्हणजे हृदयात राम प्रकट होतो. सर्वांच्या हृदयात राम प्रकट व्हावा म्हणजे राम राज्य निर्माण होण्यास वेळ लागणार नाही. या ठिकाणी सब धंदा छोर ही काम असे तुकाराम महाराज म्हणत आहेत.

संत ज्ञानेश्वर माऊली हरिपाठातील अभंगात

असूनी संसारी जिव्हे वेगु करी । वेदशास्त्र उभारी बाह्या सदा ।।

ज्ञानदेव म्हणे व्यासाचीये खुणे । द्वारकेचा राणा पांडवा घरी ।।

नुसते नाम घेऊन परमेश्वर आपल्या घरी येतो असे ज्ञानदेव या अभंगात म्हणतात. दोन संतांच्या शिकवणीतून अंतर दिसून येत असले तरी त्यात संत तुकाराम महाराजांचा काळ आणि ज्ञानदेव महाराजांचा काळ यातील अंतर आहे. संत तुकाराम महाराजांना नुसता हृदयाची राम आणणे हे अभिप्रेत नव्हते तर अनुकरण करणारा समाज निर्माण होणे अपेक्षित होते. हिंदुस्थानभर यवनी सत्ता प्रस्थापित होत होती. त्याचा प्रतिकार करणारा समाज निर्माण व्हावा हा त्यांचा हेतू होता. सर्वच ठिकाणी मुस्लिम सत्ताधीश होते. त्यांना महाराष्ट्रात सत्ता स्थापन करावयाची होती.

आपण पारतंत्र्यात जाण्याचे कारण संत तुकाराम महाराज पुढच्या चरणात सांगतात

इतने गोते का हे खाता । जब तू अपना भूल ना जाता ।।

अध्यात्मिक अर्थाने इतक्या गटांगळ्या खातो आहे त्याचे कारण आपण आपले संस्कार, आपली परंपरा सर्व विसरलो. म्हणून ही दशा झाली आहे. समाजासाठी त्याचा अर्थ - असा हिंदू समाज आपली वीरवृत्ती विसरला, इतिहास पुराण सर्व विसरला, म्हणून यवनी सत्ता प्रस्थापित होऊ शकली. श्रीराम, श्रीकृष्ण यांचे आदर्श घेतले असते तर असे झाले नसते. त्यांना तू विसरलास श्रीरामांनी वाली वध करताना झाडामागून बाण मारला. त्याचा वध केला. तो वालीचा वध नसून दृष्टांचे निर्दालन रामाने केले आहे. यज्ञा सारख्या शुभकार्यात सुबाहू , मारीच, त्राटिका यासारख्यांचा वध केला. श्रीरामांनी महिला आहे म्हणून त्राटीकेला सोडून दिले नाही. या गोष्टी आपण म्हणजे त्या वेळचे राज्यकर्ते विसरले. १५२६ साली बाबराने हिंदुस्तानवर आक्रमण केले. रजपुतांशी युद्ध झाले. रजपूत



राजा राणासंगा याने बाबराचा पराभव केला. बाबर पळून गेला व तीर्थक्षेत्रात लपला म्हणून राणासंगाने त्याला सोडून दिला. बाबराने पुन्हा सैन्य जमवून राणासंगाचा वध केला आणि १५२८ मध्ये बाबराने अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या ढाच्यात मशीद निर्माण केली. काही रजपूत राजांच्या क्षमाशील वृत्तीचा फटका हिंदुस्तानला अनेक वर्ष भोगावा लागला. श्रीराम व श्रीकृष्णांनी शत्रूचे निर्दालन करण्यासाठी व धर्म संस्थापनेसाठी अवतार घेतला होता हे विसरले. आपण आपला सुवर्ण इतिहास विसरलो म्हणून ही वेळ आली. यासाठी आपल्यातीलच काही महाभाग संधी साधू कारणीभूत आहेत. त्यासाठी संत तुकाराम महाराज पुढील चरणात म्हणतात

आंतरजामी जानत साचा । मन मे एक और उपर बाचा ।।

वरपांगी सर्व देखावा केला जातो. धर्माच्या नावाने मनात एक असते वरपांगी वेगळेच असते जशी म्हण आहे.

मुह मे राम बगल मे छुरी ।

तुकाराम महाराज त्यावेळच्या सामाजिक राजकीय परिस्थितीवर भाष्य करत आहेत. रजपूत राजे असतील, हिंदुस्थानातील इतर सत्ताधीश असतील, महाराष्ट्रातील सत्ताधीश असतील हे सर्व हिंदू असूनसुद्धा मुस्लिम सत्ताधीशांशी जवळीक साधून होते. हिंदुस्थानातील सर्व राज्यांनी एकत्रितपणे मुस्लिमांविरुद्ध, इंग्रजांविरुद्ध युद्ध केले असते तर .... हा जर तर चा विषय झाला, परंतु एकत्रित झाले नाहीत, काही रजपुतराजांनी तर मुघलांशी नातेसंबंध जोडले. या सर्वात छत्रपती शिवाजी महाराजांनी मात्र रामाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवूनच स्वराज्य निर्माण केलेले दिसून येते.

सध्याच्या परिस्थितीतसुद्धा काही शिवभक्त, शिवमुद्रा संसदेत दाखवून अहिंसेचा उदो उदो करताना दिसतात. ते ज्यांची शिकवण म्हणून महात्मा गांधींचा उल्लेख करतात ते महात्मा गांधी अहिंसा परमो धर्माः। म्हणतात. महाभारतातील हा अर्धवट श्लोकच ते सांगतात. खरे म्हणजे हिंदूंचे सर्व देवी देवता सशस्त्रधारी आहेत. महाभारतातील मूळ श्लोक अहिंसा परमो धर्मः । धर्म हिंसा तदैवच । याचा अर्थ अहिंसा मानवाचा श्रेष्ठ धर्म आहे. परंतु धर्म रक्षणासाठी हिंसा करणे त्याहूनही श्रेष्ठ आहे. अर्धवट श्लोक घेऊन हिंदूंचे नुकसान करण्याचे कामच यामागे दिसून येते. परवा एका भा.ज.पा. च्या कार्यकर्मात या महात्मा गांधींची 'रामधून' म्हटली गेली. त्याला विरोध झाला. महात्मा गांधींनी मूळ लोकप्रिय रामधून राम भजनातील पहिली ओळच घेतली व त्यामध्ये आपल्या मानसिक मनवृत्तीचा समावेश केला. त्यामुळे आपले लोक मूळ रामधून, रामभजन विसरले. रघुपति राघव राजाराम पतित पावन सिताराम ।

या मूळ भजनात ईश्वर अल्ला तेरो नाम, सबको सन्मती दे भगवान।। ही ओळ जोडली आहे. त्यामुळे सर्व लोक मूळ रामभजन विसरले हीच रामधून समजून गाऊ लागले. याचा विरोध भाजपा कार्यक्रमात झाला. मीडियात याची चर्चा झाली. मूळ रामधून

रघुपती राघव राजाराम । पतित पावन सिताराम ।।

सुंदर विग्रह मेघश्याम । गंगा तुलसी शालिग्राम ।।

भद्र गिरीश्व र सीताराम । भगत जनप्रिय सीताराम ।।

जानकी रमणा सिताराम । जय जय राघव सीताराम ।।

अशी आहे. सध्याच्या काळात सुद्धा जनुवेधारी ब्राह्मण झाले आहेत. काही जण चुनावी हिंदू झाले आहेत. या सर्वांच्या तोंडी मुहमे राम बगल मे छुरी असा व्यवहार दिसून येतो.

अंतिम चरणामध्ये संत तुकाराम महाराज म्हणतात,

तुका प्रभू देश बिदेश । भरिया खाली नही लेश ।।

जळी स्थळी काष्टी पाषाणी सर्वच ठिकाणी प्रभू भगवान आहेत. कुठेही टिचभर जागा शिल्लक नाही. हे केव्हा शक्य आहे ज्यावेळी सर्व समाजामध्ये रामाचा आदर्श निर्माण होईल. राज्यकर्ते प्रभू रामचंद्राच्या आदर्शांचे अनुकरण करतील. समाज आपल्या मनातील काम नष्ट करतील यावेळेस समाजमनात, घरात श्रीराम अवतीर्ण होतील. हे संत तुकाराम महाराज आपल्या अभंगातून सांगत असताना अयोध्येतील श्रीराम मंदिराचे निर्माण केव्हा होणार हे त्यांनी ३५० वर्षांपूर्वी आपल्या अभंग क्रमांकातून सुचित केले असावे.

१५२८ साली मीर बाकी याने आयोध्येमधील श्रीराम मंदिराचे विवादीत ढाच्याचे मशीदीत रूपांतर केले. १५२८ सालापासून राम मंदिराचा लढा सुरू होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर सन १९४९ मध्ये श्रारामाची मुर्ती विवादीत ढाच्यामध्ये अवतीर्ण झाली. त्यावेळी न्यायालयात खटला सुरू झाला. त्यावेळेपासून विवादीत ढाच्यात श्रीरामाची पुजा सुरू झाली. सन १९२८ पासून एकूण ७६ लढाया झाल्या. त्यामध्ये ३ ते ४ लाख लोकांचे बलिदान झाले. १९८४ पासून विश्वहिंदू परिषद व धर्माचार्य यांनी राममंदिरासाठी आंदोलन सुरू केले. दि. ३० सप्टेंबर १९८९ पासून देशभरात ४० दिवस शिलापूजनाचे कार्यक्रम झाले. अडीच लाख गावांमध्ये शिलापूजन झाले. दि. ९ नोव्हेंबर १९८९ रोजी आयोध्येत शिलान्यास झाला आणि ६ डिसेंबर १९९२ रोजी विवादीत ढाचा उध्वस्त करणेत आला.

९ नोव्हेंबर २०१९ रोजा न्यायालयाने रामाच्या बाजूने निर्णय दिला. ५ ऑगस्ट २०२० रोजी श्रीराम मंदिराचे भूमिपूजन आदरणीय पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांच्या हस्ते संपन्न झाले.

संत तुकाराम महाराजांच्या अभंग क्र. ३४९५ यातील पहिले तीन अंक म्हणजे ३४९ हे 'शिवशकाचे साल' दाखवते. २२ जानेवारी २०२४ ला ३४९ हे शिवशक होते. शेवटचे तीन अंक ४९५ हे बाबरी मशीद निर्माण झालेले साल १५२८ मध्ये मिसळल्यास २०२३ हा आकडा येतो. सन २०२३ रोजी मंदिर निर्माणाचे काम पूर्ण झाले होते. मुहूर्त २२ जानेवारी २०२४ होता म्हणून त्या तिथीली प्राणप्रतिष्ठा केली.

३४९५ या अंकाची बेरी केली असता २१ येते. ५ ऑगस्ट २०२० रोजी श्रीराम मंदिराचे जरी भूमिपूजन झाले असले तरी सन २०२१ रोजी मंदिर निर्माण कार्यास सुरूवात झाली.

गायत्री मंत्रामध्ये २४ अक्षर आहेत. वाल्मिक रामायण हे २४ हजार श्लोकाचे आहे. वाल्मिकी रामायणातील दर हजार श्लोकातील आद्याक्षर हे गायत्री मंत्रातील आहे.

आता हा रामोत्सवाच्या वर्षपूर्ती निमित्त संत तुकाराम महाराज यांच्या दृष्टेपणाला शतशः नमन.

**काशिनाथ थिटे-पाटील**
**विश्वस्त - श्री विठ्ठल रूक्मिणी पादुका मंदिर**
**विसावा, पंढरपूर**

## विभागीय क्रीडा स्पर्धांमध्ये बीड जिल्ह्याचा नाव लौकिक वाढवा–जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

दिनांक ९ जानेवारी रोजी बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या अध्यक्षतेखाली जालना येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धा नियोजनासाठी पूर्वतयारी बैठक पार पडली . या बैठकीसाठी निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, महेंद्रकुमार कांबळे , अरविंद लाटकर, कविता जाधव , फातेमा शेख , ओंकार देशमुख , तहसीलदार चंद्रकांत शेळके, नरेंद्र कुलकर्णी , अविनाश शिंगटे , तेजस्विनी जाधव , शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे , माजलगावचे तहसीलदार संतोष रुईकर , शिरुरचे तहसीलदार सुरेश घोळवे व इतर अधिकारी , कर्मचारी उपस्थित होते . दरवर्षी महसूल विभागातर्फे विभागीय



क्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक स्पर्धा घेण्यात येतात . यावर्षीही फेब्रुवारी महिन्यात जालना येथे या स्पर्धा संपन्न होणार आहेत . या स्पर्धेसाठी पूर्वतयारी म्हणून आज ही बैठक आयोजित करण्यात आली होती .

जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या स्पर्धेसाठी प्रोत्साहन दिले व जेव्हा आपण स्पर्धांमध्ये भाग घेतो तेव्हा कोणी जिल्हाधिकारी नाही किंवा कोणी कोतवाल नाही , प्रत्येक पदाच्या व्यक्तीला या स्पर्धेमध्ये भाग घ्यावा व जिल्ह्याचा मान वाढवावा असे म्हणून प्रोत्साहन दिले . या बैठकीमध्ये सर्व तालुक्यातील सहभाग घेऊ इच्छिणारे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते . जालना येथे होणाऱ्या सांस्कृतिक व क्रीडा स्पर्धांमध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत . त्यामध्ये क्रिकेट , फुटबॉल , हॉलीबॉल , खो–खो , कबड्डी , थ्रो बॉल अशा वेगवेगळ्या प्रकारच्या खेळांचा समावेश करण्यात आला आहे.

## जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी भेटीसाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ म्हणून वेळ निश्चित केला



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

पोलीस अधीक्षक नवनित कॉंवत (भा.पो.से.) यांनी बीड पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर त्यांना भेटण्यासाठी येणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड वाढलेली आहे. त्यामुळे बऱ्याच वेळा सामान्य नागरिक हे पोलीस अधीक्षक यांना भेटण्यासाठी जिल्ह्यातील कान्या कोपऱ्यातून येतात. परंतु पोलीस अधीक्षक हे कामानिमीत्त बाहेर असतात किंवा इतर महत्वाच्या कामात व्यस्त असतात.

त्यामुळे भेटण्यासाठी आलेल्या नागरीकांची भेट होत नाही. किंवा त्यांना भेटीसाठी बराच वेळ वाट पाहावी लागते. त्यामुळे सामान्य नागरिकांची गैरसोय होते.भेटण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होवून त्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी पोलीस अधीक्षक नवनित कॉंवत यांनी पोलीस अधीक्षक यांना भेटण्यासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी सोमवार ते शनिवार दुपारी ४ ते ६ ही वेळ निश्चित केली आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील नागरिकांनी पोलीस अधीक्षक यांना भेटण्यासाठी येतांना दुपारी ४ ते ६ या वेळेतच यावे. जेणेकरुन भेटण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होणार नाही.

## तायक्वांदो अकॅडमी ऑफ अंबाजोगाई यांच्यातर्फे आयोजित कलर बेल्ट व व प्रमाणपत्र वितरण सोहळा



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० जानेवारी**

तायक्वांदो अकॅडमी अंबाजोगाई तर्फे आयोजित कलर बेल्ट परीक्षा २० नोव्हेंबर २०२४ रोजी घेण्यात आलेल्या होत्या . या परीक्षेसाठी अंबाजोगाईतील अकरा विद्यार्थी विद्यार्थिनींनी वेगवेगळ्या कलर बेल्ट साठी सदरील परीक्षा दिलेल्या होत्या . या कलर बेल्ट साठी विद्यार्थी व विद्यार्थिनींनी परिश्रम घेऊन हे यश संपादन केले.या या वितरण सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रमण सोनवळकर सर, तालुका क्रीडा संयोजक दत्ता देवकते सर , क्रीडा शिक्षक सतीश बलुतकर सर, राष्ट्रीय हॉलीबॉलपटू संतोष कदम सर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे सोनवळकर यांनी मुलांना शारीरिक परिश्रम या विषयावर माहिती देऊन मुलांनी यासाठी मैदानामध्ये वेगवेगळ्या खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी मार्गदर्शन केले. तसेच क्रीडा संयोजक दत्ता देवकते यांनी मुलांना ऑलिंपिक क्रीडा प्रकार व भारत सरकारकडून भेटणाऱ्या विविध क्रीडा सवलती व खेळाडूंसाठी असणाऱ्या सुविधांची माहिती पालकांना व विद्यार्थ्यांना दिली. सदरील कार्यक्रमात कलर बेल्ट व प्रमाणपत्र पाहुण्या तर्फे वितरित करण्यात आले. आभार प्रदर्शन तायक्वांदो प्रशिक्षक बालाजी कराड यांनी केले.

## आ सुरेश धस, आ संदीप क्षीरसागर यांना जशास तसे उत्तर देऊ म्हणून धमकी देणाऱ्या रा.कॉ.चे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण व मा.आ.संजय दौंड यांना काय त्यांचा खून करायचा आहे की काय?

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.९ जानेवारी**

अन्यायाच्या विरुद्ध आवाज उठवणाऱ्या आ सुरेश धस, आ संदीप क्षीरसागर यांना जशास तसे उत्तर देऊ म्हणणारे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण व मा आ संजय दौंड यांना नेमकं काय म्हणायचं आहे अशी धमकी देऊन त्यांना काय सुरेश धस यांचा खून करायचा आहे का?

असा सवाल शेतकरी संघटनेचे नेते कालिदास आपेट यांनी आयोजित पत्रकार परिषदे मध्ये केला.

या वेळी कालिदास आपेट यांच्या समवेत शिवसेनेचे मदन परदेशी, अ भा कॉंग्रेस ईश्वर शिंदे, कल्याण भगत, हनुमंत फड (रा कॉ तालुका अध्यक्ष परळी), उत्तमराव माने, अब्दुल फता पटेल, उत्तमराव माने, शाम जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.संतोष देशमुख यांच्या हत्येच्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूच्या अनुशंगाने घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदे मध्ये कालिदास आपेट हे बोलत होते.

या वेळी बोलताना कालिदास आपेट म्हणाले की, संतोष देशमुख यांची हत्या राजकीय कार्यकर्त्यांची हत्या असून रा कॉ अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, संजय दौंड यांनी अंबाजोगाई मध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदे मध्ये खा बजरंग सोनवणे, आ सुरेश धस, आ संदीप क्षीरसागर, आ नमिताताई मुंदडा, आ प्रकाश सोळंके, आ विजय सिंह पंडित ही मंडळी संतोष देशमुख यांच्या हत्येच्या विरोधात आवाज उठवत असताना त्यांच्यावर आक्षेप नोंदवला. अन्यायाच्या विरुद्ध या मंडळीने फक्त सभागृहात आवाज उठवावा त्यांनी बाहेर भूमिका मांडू नये का? धस यांनी पीक विमा, राख, वाळू, वीट भट्ट्या, मुरुम, या बाबत भूमिका मांडली, सभागृहात जी भूमिका तीच भूमिका बाहेर ही ते मांडत आहेत. सुरेश धस यांचा आवाज दाबणार असाल आमचं तर नरडे दाबणार का? शेतकऱ्यांनी आत्महत्या केली त्यावेळी राजेश्वर चव्हाण गप्प का? मुंडे यांच्या कार्यकर्त्या कडून लक्ष विचलित करण्या साठी प्रयत्न सुरू आहेत. आरोप घेणारे संतोष देशमुख यांच्या बाजूने नाहीत का? सामान्य शेतकऱ्यांना पीक विमा, नुकसान भरपाई मिळावी ही भूमिका आपली नाही का?



या वेळी आपेट यांनी आत्महत्या ग्रस्त शेतकऱ्यांना मदत केली का? निवडणूक काळात सर्व गावात पैसे दिले मग आत्महत्या गस्त शेतकऱ्यांना मदत का दिली नाही असा सवाल ना मुंडे यांना केला.या वेळी बोलताना मदन परदेशी म्हणाले की, सत्ताधारी मंडळींचे आरोप म्हणजे वयक्तिक स्वातंत्रावर गधा आणण्याचा प्रयत्न असून आम्ही सर्व संतोष देशमुख यांना न्याय देणाऱ्याच्या सोबत आसून धमक्या देणारावर शासनाने कठोर भूमिका घ्यावी.या वेळी बोलताना उत्तम माने म्हणाले की, बीड हा गुंडांचा जिल्हा म्हणून देशभर ओळखला जात आहे. सत्तेतून पैसा व पैशातुन सत्ता हे गणित बनल्या गेले आहे. कुठलाही उद्योग जिल्ह्यात आला तर अगोदर आमची भेट घ्या असे फर्मान काढले जाते.आमच्या परळीत आम्हाला जगण्याचा अधिकार राहिलेला नाही. ट्रॅक्टर, गाडी खाली घालुन लोक मारल्या जात आहेत. वंजारा समाजात १० टक्के लुटारू आसले तरी ९० टक्के लोक चांगले आहेत.या वेळी बोलताना ईश्वर शिंदे यांनी राजेश्वर चव्हाण यांच्यावर तोफ डागली. आबा आपली ही भूमिका पाहता येणाऱ्या काळात प्रति वाल्मिक अण्णा म्हणून आम्ही तुमच्या कडे पहायचं आहे का? आबा मराठा आरक्षण मुद्यावर जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला होता मात्र परत जिल्हाध्यक्ष पद घेऊन मराठ्यांच्या जीवावरच उठला आहात. आपण शरद पवार यांना धोका दिलात आपल्या धमक्याला आम्ही आणि कोणीही घाबरणार नाहीत असेही शिंदे म्हणाले.

## राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे नतून जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्केंवर शुभेच्छांचा वर्षाव
### आगामी निवडणुकांमध्ये प्रामाणिक कार्यकर्त्यांना न्याय देऊ–राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

काल सायंकाळी मुंबई येथे मा.शरदचंद्र पवार साहेब व पक्ष श्रेष्ठींच्या साक्षीने

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष पदाचे नियुक्तीपत्र देण्यात आले. बीड मध्ये त्यांचे दुपारी आगमन झाले .संघर्षयोद्धा जनसंपर्क कार्यालय बीड येथे पदाधिकारी, कार्यकर्ते, आणि शेकडो हितचिंतकांनी सत्कार करून अभिनंदन केले.यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांना राजेंद्र मस्के यांनी संबोधित करून त्यांचे आभार व्यक्त केले.आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत सर्वांना सोबत घेऊन काम करू.बीड शहर व ग्रामीण भागातील सर्व जाती धर्मातील कार्यकर्त्यांची सांगड घालून पक्ष मजबुतीचे काम सर्वांना मिळून करावे लागेल.जिल्हा परिषद पंचायत समिती नगरपालिका निवडणुकांमध्ये परिश्रम घेऊन प्रामाणिक व सक्षम कार्यकर्त्यांला न्याय देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले,यावेळी,बीड जिल्हा ग्रामसेवक संघटनेचे मधुकर शेळके, सखाराम



काशीद, अशोक चव्हाण, नितीन काकडे, गणेश शिंदे, प्रवीण घरत, प्रवीण तेलप, विजय शिंदे, अच्युत चाळक, रवींद्र हावळे, दुष्यंत डोगरे,भाऊसाहेब डावकर माजी नगरसेवक रमेश चव्हाण, शिवसेनेचे सुनील सुरवसे, सरपंच पांडुरंग कानडे,सुभाष पितळे,अनुरथ मस्के विलास काकडे ,अजय ढाकणे ,अश्विन शेळके ,वसंत गुंदेकर,नाना शिंदे,महादेव बहीरवाळ,नितीन आमटे,महेश भिसे,भागवत खाकरे,सरपंच सुशांत खरसाडे,शफीक काझी,शफीक पेंटर,महेश सावंत,सरपंच महादेव नेहराळे,गणेश सांगुळे,हरिदास तकीक,अनिल शेळके,युवराज मस्के,अण्णासाहेब मस्के,शिवराम शिरगीरे,शरद बहिरवाळ,हनुमान मस्के,चव्हाण टेलर,वैभव घुमरे,प्रल्हाद धनगुडे,कल्याण पवार,बद्रीनाथ जटाळ,अंगतराव काशीद, संतोष मंडप गोरे पा.अशोक फाळके,सुरेश माने,बाबासाहेब गात,राकेश बिराजदार,सरपंच ज्ञानेश्वर जोगदंड,भारत खोड, डीसीसी बँकेचे संभाजी मस्के,अविनाश जाधव,प्रताप माने,शिवाजी तुपे,महेश दहे,शरद घोलप,हरिदास तकिक,गणेश सांगुळे,सुग्रीव डोके,महेश सावंत,लक्ष्मण भिंगले,शेषराव बहीरवाळ,मधुकरराव काशीद,गणेश कुडके,त्रिंबक शेळके,जयराम सपकाळ,राहुल चौरे,देवदत्त चौरे,समीर पठाण,आशेफ पठाण,बाबुराव धसे,अण्णासाहेब राठोड,साहेबराव राठोड,शहादेव घोडके,सह आदी उपस्थित होते.




## सर्व कार्यालयानी गतिमानता अभियाना अंतर्गत सप्तसुत्री कार्यक्रम राबविण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

प्रशासनाच्या सेवांच्या गुणवतेमध्ये वाढ, लोकाभिमुखता, निर्णयशिलता आण्याण्यासाठी सर्वांच्या सहकार्यातुन उत्तम प्रशासन कार्यान्वित कार्यालयीन गतिमानता अभियान १ जानेवारी ते ३० एप्रिल २०२५ या कालावधीत बीड जिल्हयातील सर्व शासकीय, निमशासकीय,स्थानिक स्वराज्य संस्था, शासन अंगीकृत उपक्रम सप्तसुत्री कार्यक्रम कार्यालयात राबवावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी केले आहे.

सप्तसुत्री कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.वेबसाईट सुगमीकरण, कार्यालयीन स्वच्छता, पिण्याचे पाणी उपलब्धता, स्वच्छतागृहाची स्वच्छता, नागरिकांना सेवा सुलभ मिळण्याच्या दृष्‍ीने शासनाच्या २ महत्वकांक्षी योजनांची अमंलबजावणी, अर्धनयायिक प्रकरणे चौकशी प्रकरणे, दंडाधिकारीय प्रकरणे विविध पोर्टलवरील प्राप्त तक्रारी निर्गत करणे, अभ्यांगताना भेटीसाठी वेळ सुनिश्चित करुन देणे, लोकशाही दिनाची अंमलबजावणी, गुंतवणुकीला प्रोतसाहन देणे. कार्यालयाची आवश्यक डागडुजी व निगा राखणे, क्षेत्रीय भेटीचे पूर्व नियोजन करुन त्यानुसार क्षेत्र भेटी करणे. प्रत्येकी विभागाने कार्यालयीने आपल्या विभाग कार्यालयां अंतर्गत अधिकारी कर्मचारी, कर्मचारी यांच्या संवाद कार्यक्रमाचे करावे त्यात कर्मचारी यांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविणे विषयक सकरात्मक प्रयत्न विभाग, कार्यालय प्रमुखाने यांनी आयोजन करावे.शासनाच्या विविध महत्वकांक्षी योजंनाची परिणमकारक अमंलबजावणी करुन नागरिकांना शासकीय कामात गुणात्मक बदल दृश्य स्वरुपात दिसावा यासाठी सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी प्रयत्न करावेत असेही आवाहन करण्यात आले आहे.



## पी.एम. किसान आणि निराधार योजनेतील लाभार्थ्यांचे अनुदान आठवडाभरात मिळणार
**आ.विजयसिंह पंडित यांनी आयोजित केलेल्या बैठकीत निर्णय**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने पात्र केलेल्या १२ हजार लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देवून नियमित अनुदान सुरु करावे, कृषी आणि महसुल विभागाच्या अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे प्रलंबित राहिलेल्या पी.एम.किसान योजनेतील ३ हजार पात्र लाभार्थ्यांना तात्काळ अनुदान सुरु करण्यासह ग्रामपंचायत विभक्तीकरण, प्रलंबित मावेजा प्रकरणे यांसह विविध विषयासंदर्भात आ.विजयसिंह पंडित यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेतली. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी या प्रश्नाच्या अनुषंगाने संबंधित अधिकार्यांना सूचना देवून पात्र लाभार्थ्यांना आठवडाभरात अनुदान मिळेल असे आश्वासन दिले. विविध विषयात येणार्या अडचणीच्या अनुषंगाने प्रशासकीय पातळीवर मार्ग काढण्याच्या सूचना त्यांनी यावेळी केल्या. बैठकीला जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

गेवराई विधानसभा मतदार संघातील विविध विषयांच्या अनुषंगाने आ.विजयसिंह पंडित यांनी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांची भेट घेतली. संजय गांधी निराधार अनुदान योजना समितीने गेवराई तालुक्यातील सुमारे १२ हजार पात्र लाभार्थ्यांचे अर्ज मंजुर केले आहेत. मात्र तहसिल कार्यालयातील दफ्तर दिरंगाईमुळे पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप न केल्यामुळे मागील चार महिण्यांपासुन निराधार लाभार्थी अनुदानापासुन वंचित होते. कृषी आणि महसुल अधिकार्यांमध्ये समन्वय नसल्यामुळे शुल्लक त्रुटी काढुन तालुक्यातील तीन हजार लाभार्थी पी.एम. किसान योजनेच्या रास्त लाभापासुन वंचित आहेत. या दोन्ही प्रश्नांबाबत आ. विजयसिंह पंडित यांनी बैठकीत विचारणा केली. त्याच बरोबर या बैठकीत ग्रामपंचायत विभक्तीकरण करुन बंजारा तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देणे, प्रलंबित भुसंपादनाची प्रकरणे, श्रीक्षेत्र राक्षसभुवन येथील तिर्थक्षेत्र विकास आराखडा यासह विविध विषयांवर या बैठकीत चर्चा होवुन अनेक प्रलंबित प्रश्न मार्गी लावले.

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना (पी.एम. किसान) मधील अपात्र झालेल्या सुमारे तीन हजार लाभार्थी शेतकर्यांना आवश्यक असलेले महसुली पुरावे उपलब्ध करुन देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी तहसिलदारांना दिल्या. कृषी विभागाचे उपसंचालक आणि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा निपटारा तात्काळ करुन कृषी आयुक्त कार्यालयाला सादर करणार आहेत. सुमारे २१०० लाभार्थ्यांना पुढील आढवडेभरात अनुदान सुरु करणार असल्याचे या बैठकीत नियोजन करण्यात आले. संजय गांधी निराधार अनुदान योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेश देण्यासाठी लागणार्या मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या याद्या उपलब्ध करुन देण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांनी दिले. त्यामुळे पुढील पाच दिवसात योजनेतील पात्र लाभार्थ्यांना मंजुरी आदेशाचे वाटप करुन अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरु करणार असल्याचे तहसिलदार खोमणे यांनी सांगितले. त्यामुळे गेवराई तालुक्यातील गोर–गरीब लाभार्थ्यांचे प्रश्न मार्गी लावण्यात आ. विजयसिंह पंडित यांना यश आले आहे.

या बैठकीला निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेश सुर्यवंशी, जिल्हा परिषदेचे उप मुख्यकार्यकारी अधिकारी ज्ञानेश्वर मोकाटे, तहसिलदार संदिप खोमणे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे, कृषी उपसंचालक जाधवर, तंत्र अधिकारी खेडकर, तालुका कृषी अधिकारी अभयकुमार वडकुते यांच्यासह संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# ना.पंकजाताई मुंडे मंत्री झाल्यानंतर प्रथमच परळीत ;यशःश्री निवासस्थान गर्दीने फुलले

## जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१० जानेवारी**

राज्याच्या पर्यावरण, वातारणीय बदल आणि पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे मंत्री झाल्यानंतर प्रथमच शहरात आगमन झाले,त्यांना भेटून समस्या मांडण्यासाठी यशःश्री निवासस्थान अक्षरशः गर्दीने फुलून गेले होते. ना. पंकजाताईंनी प्रत्येकाला वैयक्तिक भेटून त्यांची गाऱ्हाणी ऐकली व त्यांच्या प्रश्नांचा जागेवरच निराकरण केले.

ना. पंकजाताई मुंडे यांचे बुधवारी रात्री उशीरा शहरात आगमन झाले. मंत्री झाल्यानंतर प्रथमच आल्या तरी कुठलाही गाजावाजा, मोठा सत्कार करू नये अशा सूचना त्यांनी कार्यकर्त्यांना केल्या होत्या. आज सकाळपासूनच यशःश्री निवासस्थानी त्यांना भेटण्यासाठी जिल्हयातील तसेच जिल्हया बाहेरून नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठी गर्दी केली होती. आलेल्या प्रत्येकांना भेटत, त्यांची गाऱ्हाणी ऐकून घेत त्यांनी जनतेच्या समस्यांचे जागेवरच निराकरण केले.

लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांच्या पुण्याईचा वसा अन् वारसा जबाबदारीने पुढे नेण्याची प्रेरणा देणारी ही गर्दी होती.

परळीकर नागरिकांनी केलेले स्वागत नम्रतापूर्वक स्वीकारून पक्षाने सोपवलेल्या दायित्वाचा वापर तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करेल असं त्या यावेळी म्हणाल्या.

सांत्वनपर भेट

भाजपचे कार्यकर्ते किशोर केंद्रे यांच्या वडिलांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते.ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी आज त्यांच्या पदमावती भागातील निवासस्थानी जाऊन केंद्रे परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.



# 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला–सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील

## सहकार मंत्री ना.पाटील यांची दीनदयाळ बँकेच्या अहमदपूर शाखेस सदिच्छा भेट

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.१० जानेवारी**

'विश्वास, विकास आणि विनम्रता' या त्रिसूत्रीने आर्थिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार बँकींग सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला असे प्रशंसोद्धगार महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी काढले. ते दीनदयाळ नागरी सहकारी बँकेच्या अहमदपूर शाखेस दिलेल्या सदिच्छा भेट प्रसंगी बोलत होते.

महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील यांनी नुकतीच दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाईच्या अहमदपूर शाखेस सदिच्छा भेट दिली. बँकेच्या सर्वांगिण कार्याची माहिती घेतली. मनोगत व्यक्त करताना मंत्री महोदयांनी बँकेचे मनःपूर्वक कौतुक केले. अल्प कालावधीत बँकेने केलेल्या शाश्वत प्रगतीचा अहवाल घेऊन समाधान ही व्यक्त केले. पारदर्शकता, स्वयंनिष्ठा, भारतीय रिझर्व बँकेचे नियम निकष कायदे कानून याचे पालन करीत संस्था आपली प्रगती साधत असल्याबाबत प्रशंसोद्गार काढले. मागील २८ वर्षांतील प्रगती अत्यंत आदर्श असून ८५० कोटींचा व्यवसाय अल्प कालावधीत करणे तेही सर्व निकषांचे पालन करून ही तारेवरची कसरत असतानाही बँकेने आपला ठसा उमटविला व अहमदपूर शहरात बँकेने चांगले नांव कमावले असल्याचे त्यांनी म्हटले. भांडवल पर्यक्तता अन् उत्पादक कर्ज ठेव संकलन कर्ज वितरण यासाठी योग्य तंत्रज्ञानाचा वापर व एकसंघ काम करणारे संचालक मंडळ हे या प्रगतीचे गमक असून हे संचालक मंडळ बँकेचे उत्तरोत्तर प्रगती करेल बाबत त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. मात्र सध्याच्या युगात 'सायबर सिक्युरिटी' हा चिंतेचा विषय असून या सुरक्षा संदर्भात बँकेने काटेकोरपणे लक्ष देऊन लोकहित जोपासावे बाबत अश्वस्थ केले. राज्याचा सहकार मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आपण ही दीनदयाळ बँकेला दिलेली पहिलीच भेट असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात नमूद केले. तर शासकीय पातळीवरील सहकार विभागाचे अखत्यारीत येणाऱ्या सर्व विषयांबाबत मंत्री महोदयांनी दीनदयाळ बँकेस सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल बाबत आश्वासीत ही केले. तसेच यावेळी त्यांनी 'दीनदयाळ' बँकेच्या कार्यप्रणाली बाबत प्रशंसोद्धगार काढून माननीय संचालक मंडळाचे कौतुक केले. व 'दीनदयाळ' बँकेने दर्जेदार, तत्पर, अद्ययावत, गतिमान बँकींग सेवा देत ग्राहक, ठेविदारांचा विश्वास संपादन केला आहे असे ते म्हणाले. बँकेचे स्थानिक सल्लागार देवेंद्र देवणीकर यांनी आग्रहाने मा.मंत्री महोदयांनी अन्य कार्यक्रमातून वेळ काढून आमंत्रण स्वीकारले व बँकेच्या शाखेस भेट दिली. त्याबद्दल बँकेच्या वतीने आभार मानले.प्रारंभी भारतमाता व दीनदयाळजी उपखध्याय यांच्या प्रतिमापूजन करून कार्यक्रमास सुरूवात झाली. समारोपपर भाषणात बँकेचे अध्यक्ष ॲड.मकरंद पत्की यांनी बँकेच्या एकूण कार्यप्रणालीचा व एकसंघ सकारात्मक काम करण्यास संचालक मंडळ कार्यरत असल्याबाबत माहिती दिली. सोबत बँकेच्या सांख्यिकीय प्रगतीचा आलेख ही उपस्थितांसमोर मांडला. मंत्री महोदयांनी अगदी अल्पावधीतच केलेल्या विनंतीला मान देत आपले निमंत्रण स्वीकारून दीनदयाळ बँकेस भेट दिल्याबाबत ऋण व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे औचित्य साधून सहकार भारतीच्या वतीने प्रदेश कार्यकारणी सदस्य सौ.शरयूताई हेबाळकर (माजी अध्यक्ष व संचालिका) व कार्यकर्ते सनतकुमार बनवसकर यांनी मंत्री महोदयांचा सहकार भारतीची पुस्तके भेट देऊन सत्कार केला. सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बँकेचे संचालक मकरंद कुलकर्णी (सोनेसांगवीकर) यांनी केले तर प्रास्ताविक देवेंद्र देवणीकर यांनी केले. उपस्थितांचे आभार बँकेचे मुख्यकार्यकारी अधिकारी सनतकुमार बनवसकर यांनी मानले. कार्यक्रमासाठी बँकेच्या संचालिका सौ.शरयूताई हेबाळकर, संचालक मकरंद कुलकर्णी, किरण सुरेशकांबळे हे उपस्थित होते. तर अहमदपूर शहरातील प्रतिष्ठित दिलीपराव देशमुख, भरतराव चामे, शिवानंद हिंगणे, प्रताप पाटील, यशवंत केंद्रे, खेडकर व बँकेचा ग्राहकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी स्थानिक सल्लागार देवेंद्र देवणीकर, श्रीकांत भुतडा, तातोडे साहेब, बँकेचे शाखाधिकारी विनोद कान्हेगावकर, अधिकारी नवाडे व कर्मचारीवृंद यांनी पुढाकार घेतला.



# राजेंद्र मस्के यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती

## आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीत विजयासाठी प्रयत्न करणार–राजेंद्र मस्के

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदावर शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांची नियुक्ती करण्यात आली. यापूर्वी जिल्हाध्यक्ष पद आमदार संदीप क्षीरसागर यांच्याकडे होते. बीड विधानसभा निवडणुकीतील विजयानंतर खासदार बजरंग बाप्पा सोनवणे व आमदार संदीप क्षीरसागर यांनी पक्षश्रेष्ठीकडे मागणी करून जिल्हाध्यक्ष पदाची धुरा राजेंद्र मस्के यांच्याकडे सोपवली.

राज्य विधानसभा निवडणुकी नंतर प्रथमच गेली दोन दिवसापासून मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठका चालू होत्या. आज पक्षाचे सर्वेसर्वा खा.शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती जाहीर करून नियुक्तीपत्र देण्यात आले.



यावेळी प्रदेशाध्यक्ष आ. जयंत पाटील, बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग बाप्पा सोनवणे, बीडचे आ. संदीप भैय्या क्षीरसागर, खा.निलेश लंके, प्रदेश युवा अध्यक्ष महेबूब शेख,माजी आ.पृथ्वीराज साठे,राजेसाहेब देशमुख, आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नियुक्तीपत्र देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.लोकसभा निवडणुकीनंतर राजेंद्र मस्के यांनी भाजपा जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा देऊन शरद पवार साहेबांचे नेतृत्व स्वीकारले. अत्यंत चुरशीच्या बीड विधानसभा निवडणुकीत आ. संदीप क्षीरसागर यांच्या विजयासाठी अथक परिश्रम घेतले. बीड जिल्ह्यात शरदचंद्र पवार साहेबांच्या राष्ट्रवादीने बीडचा गड राखला.या विजयात राजेंद्र मस्के व त्यांच्या मित्रमंडळाचे योगदान आहे.आगामी काळात मजबूत संघटन आणि पक्ष विस्तारासाठी राजकीय व सामाजिक कामाचा अनुभव लक्षात घेऊन राजेंद्र मस्के यांची बीड जिल्हा अध्यक्ष पदावर नियुक्ती करण्यात आली.या नियुक्ती मुळे जिल्हाभरात पदाधिकारी कार्यकर्ते हितचिंतक यांच्या कडून राजेंद्र मस्के यांचे अभिनंदन केले जात आहे.

# शिवछत्र परिवाराने क्रीडा क्षेत्राला न्याय दिला–शंकरराव देशमुख

## जयभवानी शिक्षण संकुलात खो –खो आणि बॅडमिंटन स्पर्धेचे शानदार उद्‌घाटन

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१० जानेवारी**

शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर अमरसिंह पंडित यांनी क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून गेवराई विधानसभा मतदारसंघाची एक वेगळी ओळख निर्माण करून दिली आहे. माजी मंत्री शिवाजीराव पंडित यांचा शिवछत्र परिवार कायम राजकारणासोबतच समाजकारण आणि क्रीडा क्षेत्रामध्ये सक्रिय आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्यांच्या मुलांमध्ये क्रीडा गुणांना चालना देण्याचे काम या परिवाराने केलेले आहे रणवीर पंडित यांनी या क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून गेवराई तालुक्याची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. गेवराई तालुक्यातील विद्यार्थी खेळाडू क्रीडा क्षेत्रामध्ये करिअर करिअर करुन या तालुक्याचे नाव मोठे करतील असा विश्वास भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख यांनी व्यक्त केला. क्रीडा महोत्सवाच्या खो–खो आणि बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन करताना ते बोलत होते.



शारदा स्पोर्ट्स अकॅडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली गेवराई तालुक्यात होत असलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये आज पाचव्या दिवशी मुलांच्या खो–खो स्पर्धेचे आणि बॅडमिंटन स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, मतदार नोंदणी विभागाचे विधानसभा प्रभारी सुभाष कदम, विधानसभा समन्वयक विक्रम सानप, व्यापारी युनियनचे अध्यक्ष शरद खरात, ड. उद्धव रासकर, सरपंच विष्णूपंण घोंगडे, माजी सरपंच अंकुश गायकवाड, सरपंच गोपाळ शिंदे मोहनराव काकडे, सुदाम पवार, रामेश्वर गरड, नंदू गरड यांच्यासह मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते

**खेळाडूंचे मैदानासी नाते जोडले**
**– रणवीर पंडित**

जयभवानी जगदंबा शिक्षण संस्था अंतर्गत गेल्या तीन वर्षापासून हा क्रीडा महोत्सव यशस्वीपणे होत आहे. महोत्सवामध्ये वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्यामुळे शाळेतील विद्यार्थी खेळाडू जिंकण्याची उर्मी ठेवून मैदानावर सराव करताना दिसून येत आहेत. विद्यार्थी खेळाडूंचे मैदानाशी नाते जोडले गेले आहे. यातूनच उत्कृष्ट खेळाडू तयार होतील. शारदा स्पोर्ट्स अकॅडमी आणि जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्था त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे असे क्रीडामहोत्सवाचे आयोजक रणवीर पंडित यांनी यावेळी सांगितले.

जयभवानी विद्यालयाच्या भव्य मैदानावर या खो–खो च्या स्पर्धा होत आहेत. बॅडमिंटन स्पर्धा इंडोर स्टेडियम मध्ये होत असून या स्पर्धेमध्ये संस्थेचे १८ संघातील विद्यार्थी खेळाडू सहभागी झाले आहेत. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी रणवीर पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली जयभवानी शिक्षण संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रमोद गोरकर, सहप्रशासन अधिकारी प्रा.गोगुले, मुख्याध्यापक वसंत राठोड प्राचार्य डॉ.सरकटे, पर्यवेक्षक हरिभाऊ हाकाळे यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी परिश्रम घेत आहेत यावेळी जयभवानी आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे सर्व मुख्याध्यापक क्रीडा शिक्षक आणि विद्यार्थी खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# किल्ले रायगडावर संपन्न होणार क्रांतीसुर्य शंभूराजांचा राज्याभिषेक सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१० जानेवारी**

पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी महाराजांचे जेष्ठ सुपूत्र युवराज संभाजी राजांचा १६ जानेवारी १६८१ रोजी किल्ले रायगडावर राज्याभिषेक संपन्न झाला आणि कर्तव्यनिष्ठ शंभूराजे स्वराज्याचे दुसरे छत्रपती म्हणून सिंहासनाधिष्टीत झाले.

मागील अनेक वर्षे विस्मरणात गेलेल्या या राज्याभिषेक सोहळ्याला पुनश्च दिव्यत्व प्राप्त करून देण्यासाठी काही मोजके शिवशंभू पाईक एकत्र येत दि. १६ जानेवारी २०१४ रोजी शंभूछत्रपतींच्या या राज्याभिषेक सोहळ्याचा श्री गणेशा केला आणि तो आजही अव्याहत पणे शिवशंभू पाईक तसेच पुरातत्व विभागाच्या सहकार्याने चालू आहे. यंदा राज्याभिषेक सोहळ्याचे दशकपुर्ती महोत्सव, या नमित्ताने एका विशेष संकल्पनेच्या माध्यमातून हा सोहळा साजरा केला जाणार आहे तो म्हणजेच क्रांतीसुर्य शंभूराजा. स्वातंत्र्यलढ्यात आपल्या जिवाची तमा न बाळगता लढा देणाऱ्या क्रांतीकारकांच्या वंशजाच्या हस्ते भारताच्या विविध राज्यातील पवित्र नद्यांच्या जलाभिषेकांने हा सोहळा संपन्न होणार आहे.

मागील दहा वर्षात स्वराज्यातील सरदारांचे वंशज, समाजातील कर्तृत्ववान महिला, वारकरींच्या भक्ती–शक्ती स्वरूप, रायगडावर वर्षानुवर्ष वास्तव्यास असलेले मावळे,कुस्तीचा फड गाजविणाऱ्या मल्लांचा 'मर्दानी राजा',




शेतकऱ्यांचा 'पोशिंदा राजा' या समाजातील विविध घटकातील मान्यवरांच्या हस्ते हा सोहळा संपन्न होत आहे.

श्री शंभूछत्रपती राज्याभिषेक सोहळा समिती फक्त १६ जानेवारीला रायगडावर संपन्न होणाऱ्या सोहळ्यापुरते मर्यादित नसून या माध्यमातून वर्षभर राज्यातील विविध भागात होणाऱ्या सामाजिक कार्यातही अग्रस्थानी आहे, यामाध्यमातून होणारे रक्तदान शिबीर, शैक्षणिक साहित्य वाटप, पूरपरिस्थित अन्नधान्याचे वाटप, वृक्षलागवड आणि संवर्धन हि सगळी सामाजिक कामे वाखाणण्याजोगी आहेत.

जलाभिषेकांचे मानकरी

१)श्री.किरण जीत सिंग हुतात्मा सरदार भगत सिंग यांचे पुतणे

२)श्री.अँड.भाई सुभाष भगवानराव पाटील क्रांतीसिंह नाना पाटील यांचे नातू

३)श्री. सत्यशिल कमलाकर राजगुरू हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांचे नातू

४)श्री. सज्ञनराव शामराव पाटील स्वातंत्र्य सैनिक गोवा मुक्ती संग्राम १९५५

५)श्री. गौरव किरण नायकवडी क्रांतिवीर डॉ. नागनाथ अण्णा नायकवडी यांचे नातू

६)श्री. दिग्विजय सर्जेराव जेधे स्वातंत्र्यसैनिक देशभक्त केशवराव जिथे यांचे पणतू

७)श्री.संजीव जावळे सशस्त्र क्रांतिकारक सार्वजनिक गणेशोत्सवाचे आद्य संस्थापक श्रीमंत भाऊसाहेब रंगारी उर्फ भाऊ लक्ष्मण जावळे यांचे पणतू

# सायबर जनजागृती कार्यक्रमाचे स्वा.सावरकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१० जानेवारी**

आजच्या युगात मोबाईलचा वापर आवश्यक तसेच प्रत्येकजण सोशल मीडियाचा वापर करतो यामध्ये आपली फसवणूक होऊ शकते याबाबतीत सायबर जनजागृती व्हावी या उद्देशाने माननीय पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, पोलीस निरीक्षक गात साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बीड पोलीस दलाच्या वतीने स्वा.सावरकर माध्यमिक विद्यालय सायबर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी प्रमुख मा.पोलीस हेड कॉन्स्टेबल पंचम वडमारे साहेब यांनी मार्गदर्शन करताना विविध प्रकारचे होणारे फसवणुकीचे प्रकार यामध्ये आर्थिक बाबतीत घडतात यासंबंधी माहिती दिली व प्रत्येकाने काळजीपूर्वक मोबाईलचा वापर करावा विविध प्स वापर सजगपणे करावा असे आवाहन त्यांनी केले तसेच पोलिस निरीक्षक मा.

संतोष घोडके साहेब यांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी व प्रत्येकाने मोबाईलचा वापर काळजीपूर्वक करावा अशा आवाहन केले यावेळी व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती संतोष घोडके साहेब,पंचम वडमारे साहेब,पोलीस आमलदार अजय जाधव,अमोल दरेकर,कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्राचार्य विठ्ठल दत्तात्रय काळे, विभाग प्रमुख प्रा. बाळासाहेब साळवे,प्रा.दीपक देशमुख यांची उपस्थिती होती.अध्यक्ष समारोप प्रा.विठ्ठल काळे यांनी केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. बाळासाहेब साळवे यांनी केले व आभार प्रदर्शन दीपक देशमुख यांनी केले. या कार्यक्रमास विद्यार्थी प्राध्यापक व इतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.